महाराष्ट्र शासन

विधी व न्याय विभाग

## सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६०

# मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८

( दिनांक ३० एप्रिल १९९० पर्यंत सुधारल्याप्रमाणे )

## THE BOMBAY ACT No. LX OF 1958

# BOMBAY STAMP ACT, 1958

*(As modified up to 30th April 1990)*

*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर, यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याद्वारे प्रकाशित

१९९१

[किंमत—रु. ५-५०]

# मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८

## अनुक्रमणिका


उद्देशिका

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ .. .. .. .. | २ |
| २. | व्याख्या. .. .. .. .. .. | २ |
| ३. | शुल्क आकारण्यास पात्र असलेले संलेख. .. .. .. | ७ |
| ४. | विक्री, गहाण किंवा संव्यवस्था अशा एकाच संव्यवहारामध्ये उपयोगात आणलेले अनेक संलेख. | ७ |
| ५. | अनेक वेगवेगळ्या बाबींच्या संबंधातील संलेख. .. .. .. | ८ |
| ६. | अनुसूची एकमधील अनेक वर्णनांमध्ये मोडणारे संलेख. .. .. | ८ |
| ७. | विवक्षित संलेखांच्या बाबतीत उच्चतर शुल्क भरणे. .. .. | ८ |
| ८. | सन १९१४ चा अधिनियम क्रमांक ९ खाली किंवा इतर कायद्याखाली कर्जासाठी काढलेल्या ऋणपत्रांहून अन्य बंधपत्रे किंवा रोखे. | ९ |
| ९. | शुल्के कमी करण्याचा किंवा त्यांची सूट देण्याचा किंवा त्याबाबत आपसाती करण्याचा अधिकार. | ९ |
| १०. | शुल्के कशा रीतीने भरावीत. .. .. .. .. .. | ९ |
| ११. | चिकटमुद्रांकांचा वापर. .. .. .. .. .. | ११ |
| १२. | चिकटमुद्रांक रद्द करणे. .. .. .. .. .. | ११ |
| १३. | उमटमुद्रांक लावलेले संलेख कसे लिहावेत. .. .. .. | ११ |
| १४. | त्याच मुद्रांकानिशी तो एकच तेवढा संलेख निष्पादित करणे. .. .. | १२ |
| १४-अ. | संलेखांमधील फेरफारांबाबत आकारणी कशी करावयाची. .. .. | १२ |
| १५. | कलम १३, १४ किंवा १४-अ याविरुद्ध लिहिलेला संलेख रीतसर मुद्रांकित नाही असे मानले जाईल. | १२ |
| १६. | शुल्क दर्शविणे. .. .. .. .. .. | १२ |
| १७. | राज्यात निष्पादित केलेले संलेख. .. .. .. .. | १३ |
| १८. | राज्याबाहेर निष्पादित करून दिलेले संलेख. .. .. .. | १३ |
| १९. | महाराष्ट्र राज्यात वाढीव शुल्क देण्यास पात्र असलेल्या विवक्षित संलेखांवरील शुल्क भरणे. | १३ |
| २०. | परकीय चलनांत दर्शविलेल्या रकमेचे रूपांतर. .. .. .. | १४ |
| २१. | पुंजरोखा व विक्रेय रोखे यांचे मूल्यांकन कसे करावे. .. .. | १४ |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| २२. | विनिमयाचा दर किंवा सरासरी किंमत यांबाबतच्या विधानाचा परिणाम. | १४ |
| २३. | व्याजरक्षी संलेख. .. .. .. .. .. | १४ |
| २४. | विक्रेय रोख्यांच्या गहाणांशी संबंधित असलेले विवक्षित संलेख, करारनामे म्हणून शुल्क आकारण्यास पात्र असणे. | १४ |
| २५. | ऋणाच्या प्रतिफलार्थ किंवा भावी भरणा, इत्यादींच्या अधीनतेने केलेल्या हस्तांतरणावर शुल्क कसे आकारावे. | १४ |
| २६. | वार्षिकी वगैरेच्या बाबतीत मूल्यांकन. .. .. .. .. | १५ |
| २७. | विषयवस्तूचे मूल्य अनिश्चित असेल तेव्हा लावावयाचा मुद्रांक. .. | १६ |
| २८. | ज्यांचा शुल्कावर परिणाम होणार असेल अशी तथ्ये संलेखात मांडणे. .. | १६ |
| २९. | विवक्षित अभिहस्तांतरणपत्रांच्या बाबतीत शुल्कास अनुलक्षून निदेश. .. | १६ |
| ३०. | शुल्के कोणी द्यावीत. .. .. .. .. .. | १८ |
| ३१. | उचित मुद्रांकांबाबत अभिनिर्णय. .. .. .. .. | १९ |
| ३२. | जिल्हाधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र. .. .. .. .. | २० |
| ३२-अ. | अभिहस्तांतरणपत्र, इत्यादी संलेखाचे कमी मूल्य दर्शविल्यास त्यासंबंधात कोणती कार्यवाही करावी. | २१ |
| ३२-ब. | अपील. .. .. .. .. .. .. | २२ |
| ३२-क. | पुनरीक्षण. .. .. .. .. .. .. | २३ |
| ३३. | संलेखांची तपासणी करणे व ते अवरुद्ध करणे. .. .. .. | २३ |
| ३३-अ. | नोंदणी झाल्यानंतर संलेख अवरुद्ध करून ठेवणे. .. .. .. | २४ |
| ३४. | रीतसर मुद्रांकित नसलेले संलेख हे, पुराव्यात अस्वीकारार्ह असणे, इत्यादी. | २४ |
| ३५. | संलेखाचा स्वीकार केव्हा प्रश्नास्पद करता येणार नाही. .. .. | २५ |
| ३६. | अयोग्यरीत्या मुद्रांकित केलेले संलेख स्वीकृत करणे. .. .. | २५ |
| ३७. | अवरुद्ध करून ठेवलेल्या संलेखांच्या संबंधात काय कार्यवाही करावी. .. | २६ |
| ३८. | कलम ३७, पोटकलम (१) खाली दिलेली शास्तीची रक्कम परत करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार. | २६ |
| ३९. | अवरुद्ध करून ठेवलेले संलेख मुद्रांकित करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार. | २६ |
| ४०. | अभावितपणे रीतसर मुद्रांकित न केलेले संलेख. .. .. .. | २७ |
| ४१. | ज्या संलेखांवर कलम ३४, ३९ आणि ४० खाली शुल्क भरलेले असेल त्यांवर पृष्ठांकन करणे. | २७ |
| ४२. | मुद्रांक कायद्याविरुद्धच्या अपराधाबद्दल खटला भरणे. .. .. | २८ |
| ४३. | शुल्क किंवा शास्ती भरणाऱ्या व्यक्तींना ती विवक्षित बाबतीत वसूल करता येईल. | २८ |

| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ४४. | विवक्षित बाबतीत शास्ती किंवा जादा शुल्क परत करण्याचा महसूल प्राधिकाऱ्याचा अधिकार. | २९ |
| ४५. | कलम ३७ खाली पाठवलेले संलेख गहाळ झाल्याबद्दल दायित्व नसणे. . . | २९ |
| ४६. | शुल्के व शास्ती यांची वसुली. . . . . . . . . | २९ |
| ४७. | खराब झालेल्या मुद्रांकांबाबत सवलत देणे. . . . . . . | २९ |
| ४८. | कलम ४७ खाली सूटमोकळ मिळण्यासाठी अर्ज केव्हा करावा. . . . . | ३१ |
| ४९. | निगमांना पुढे जरूरी नसलेल्या छापील नमुन्यांच्या बाबतीत सवलत. . . | ३१ |
| ५०. | चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांबाबत सवलत. . . . . . . | ३१ |
| ५१. | खराब झालेल्या किंवा चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांबाबत सवलत कशी द्यावी. | ३२ |
| ५२. | वापरासाठी न लागणाऱ्या मुद्रांकांबाबत सवलत. . . . . . . | ३२ |
| ५२-अ. | शुल्काबाबत सवलत देणे. . . . . . . . . . . | ३३ |
| ५२-ब | मुद्रांक विधिअग्राह्य ठरवणे व व्यावृत्ती. . . . . . . . | ३३ |
| ५३. | मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याचे नियंत्रण व त्यांच्याकडे परिकथन पाठवणे. | ३३ |
| ५३-अ. | कलमे ३२, ३९ व ४१ खालील जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयाचे पुनरीक्षण. | ३४ |
| ५४. | मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडून उच्च न्यायालयाकडे पाठवण्यात येणारे प्रकरणाचे परिकथन. | ३४ |
| ५५. | परिकथित प्रकरणासंबंधी अधिक तपशील मागवण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार. | ३४ |
| ५६. | परिकथन केलेले प्रकरण निकालात काढण्याची कार्यपद्धती. . . . . | ३५ |
| ५७. | इतर न्यायालयांनी उच्च न्यायालयाकडे प्रकरणाचे परिकथन पाठवणे. . . | ३५ |
| ५८. | मुद्रांकांच्या पुरेसेपणाच्या संबंधाने न्यायालयाच्या विवक्षित निर्णयांचे पुनरीक्षण. | ३५ |
| ५९. | रीतसर मुद्रांकित नसलेला संलेख निष्पादित करून देणे वगैरेबद्दल शास्ती. | ३७ |
| ५९-अ. | संलेख न्यायालयाने दाखल करून घेतला असेल तर, कलम ५९ खाली खटला भरता येणार नाही. | ३७ |
| ६०. | निपटारा यादीत खोटे अधिकथन केल्याबद्दल शास्ती. . . . . | ३७ |
| ६१. | चिकट मुद्रांक रद्द न करण्याबद्दल शास्ती. . . . . . . | ३७ |
| ६२. | कलम २८ च्या तरतुदींचे अनुपालन न करण्याबद्दल शास्ती. . . | ३७ |
| ६३. | मुद्रांकांच्या विक्रीसंबंधीच्या नियमांचा भंग करण्याबद्दल आणि अनधिकृत विक्री करण्याबद्दल शास्ती. | ३८ |
| ६४. | खटले भरणे व चालवणे. . . . . . . . . . . | ३८ |
| ६५. | वगळण्यात आले. . . . . . . . . . . | ३८ |

अनुक्रमणिका


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ६६. | संपरीक्षेची जागा. .. .. .. .. .. | ३८ |
| ६७. | निरीक्षणासाठी पुस्तके वगैरे खुली असणे. .. .. .. | ३९ |
| ६८. | परिवास्तूमध्ये प्रवेश करण्यास व विवक्षित दस्तऐवजांचे निरीक्षण करण्यास अधिकाऱ्यास प्राधिकृत करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार. | ३९ |
| ६९. | नियम करण्याचा अधिकार. .. .. .. .. .. | ३९ |
| ७०. | प्रदेय शुल्क किंवा सवलत द्यावयाची रक्कम यातील अपूर्णांक पूर्णांकित करणे. | ४० |
| ७१. | वगळण्यात आले. .. .. .. .. .. | ४० |
| ७२. | विवक्षित अधिकारांचे प्रत्यायोजन. .. .. .. .. | ४१ |
| ७३. | न्यायालय फीबाबत व्यावृत्ती. .. .. .. .. | ४१ |
| ७३-अ. | वगळण्यात आले. .. .. .. .. .. | ४१ |
| ७३-ब. | वगळण्यात आले. .. .. .. .. .. | ४१ |
| ७४. | विनिमयपत्रे वगैरेवरील मुद्रांक शुल्काच्या दरास हा अधिनियम लागू नसणे. | ४१ |
| ७५. | अधिनियमाचा अनुवाद करून त्याची स्वस्त दराने विक्री करणे. .. | ४१ |
| ७६. | अधिनियमितींचे निरसन. .. .. .. .. .. | ४१ |
| | अनुसूची एक. .. .. .. .. .. .. | ४३ |
| | अनुसूची दोन. .. .. .. .. .. .. | ७६ |

# [1] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६०

## [मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८]

[या अधिनियमाला राष्ट्रपती यांची दिनांक ४ जून १९५८ रोजी अनुमती मिळाली आणि ही अनुमती मुंबई शासन राजपत्र, भाग चार (इंग्रजी) मध्ये ११ जून १९५८ रोजी प्रथम प्रसिद्ध करण्यात आली.]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम, याअन्वये अनुकूलन, फेरफार व सुधारणा करण्यात आल्या आहेत:—

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९५

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०

सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ (१–५–१९७४)*

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ (४–७–१९८०)*

सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ (१०–१२–१९८५)*

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७@ (२९–८–१९८८)*

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ (१–१२–१९८९)*

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ † § (७–२–१९९०)*

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता मुंबई शासन, १९५८ चे अतिरिक्त राजपत्र, भाग पाच, पृष्ठ १२२ (इंग्रजी) पहा.

*ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

@ सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ (एक) अन्वये सन १९८८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक सहा निरसित करण्यात आला.

† सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ४ अन्वये सन १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक दोन निरसित करण्यात आला.

§ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३ याचे पोटकलम पुढीलप्रमाणे आहे:—

(२) अधिनियमाच्या कलम ३, खंड (ब) याच्या उपखंड (एक) व (दोन) अन्वये अनुक्रमे, खंड (ड) च्या उपखंड (एक) ऐवजी नवीन उपखंड आणि **स्पष्टीकरण दोन** ऐवजी **नवीन स्पष्टीकरण** दाखल करून मुख्य अधिनियमाच्या अनुसूची एकच्या अनुच्छेद २५ मध्ये करण्यात आलेल्या **सुधारणा** या मुख्य अधिनियमात १७ मार्च १९८८ रोजी करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल.

## मुंबई राज्यातील मुद्रांक व मुद्रांक शुल्क यासंबंधीचा कायदा एकत्रित करण्याबाबत व त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थी, मुंबई राज्यातील मुद्रांकांसंबंधीचा व भारताचे संविधान याच्या सातव्या अनुसूचीतील सूची एक, नोंद क्रमांक ९१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजाच्या संबंधात असेल त्याहून अन्य बाबतीतील मुद्रांकांच्या व मुद्रांक शुल्काच्या दरांच्या संबंधातील कायदा एकत्रित करणे व त्यात सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या नवव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे:—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण [१][महाराष्ट्र राज्यास] लागू आहे.

(३) तो, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निदेश देईल अशा तारखेस अंमलात येईल.

व्याख्या.

२. विषयात किंवा संदर्भात या विरुद्ध काही नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "अधिसंघ" म्हणजे कोणत्याही मालाच्या किंवा विक्रेय रोख्यांच्या विक्रीच्या किंवा खरेदीच्या धंद्याचे किंवा त्यांच्या संबंधातील इतर संव्यवहारांचे विनियमन करण्याच्या किंवा त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या प्रयोजनासाठी स्थापन करण्यात आलेला कोणताही अधिसंघ, विनिमय केंद्र (एक्सचेंज), संघटना किंवा व्यक्तिनिकाय—मग तो कायद्याने संस्थापित असो किंवा नसो;

[२][(ब) "बँक व्यवसायी" म्हणजे जो अधिसंघ कंपनी अथवा व्यक्ती कर्जे देण्याच्या किंवा गुंतवणूक करण्याच्या प्रयोजनास्तव, मागणीदेय किंवा अन्यथा परत करण्याजोग्या आणि धनादेश, धनाकर्ष, प्रेष यांद्वारे, किंवा अन्यथा काढण्याजोग्या पैशाच्या ठेवी जनतेकडून स्वीकारतो तो अधिसंघ, कंपनी अथवा व्यक्ती;].

(क) "बंधपत्र" यात पुढील संलेखांचा समावेश होतो—

(एक) ज्या संलेखाद्वारे, एखादी व्यक्ती, विनिर्दिष्ट कृती, यथास्थिति केल्यास किंवा न केल्यास आबंधन शून्य ठरेल अशा शर्तीवर दुसरीस पैसा देण्याच्या बाबतीत स्वत:ला आबद्ध करून घेते असा कोणताही संलेख**;**

(दोन) ज्या कोणत्याही लेखावरून एखादी व्यक्ती दुसरीस पैसा देण्यास स्वत:स आबद्ध करून घेते असा, साक्षीदाराने साक्षांकित केलेला आणि आदिष्टप्रदेय किंवा वाहकप्रदेय नसेल असा संलेख**;** आणि

(तीन) याप्रमाणे साक्षांकित केलेल्या ज्या कोणत्याही संलेखाद्वारे एखादी व्यक्ती दुसरीस धान्य किंवा इतर कृषि उत्पन्न देण्यास स्वत:स आबद्ध करून घेते असा संलेख**;**

---

[१] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये "मुंबई राज्यास" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ च्या कलम २ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी खंड (ब) दाखल करण्यात आला.

[१][स्पष्टीकरण :—त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, या खंडाच्या प्रयोजनास्तव, एखाद्या संलेखाच्या संबंधात "साक्षांकित" म्हणजे, ज्यांच्यापैकी प्रत्येकाने निष्पादकाला सही करताना अथवा आपली निशाणी संलेखावर लावताना पाहिले असेल अथवा निष्पादकाच्या समक्ष व त्याच्या निदेशानुसार दुसऱ्या एखाद्या व्यक्तीने त्या संलेखावर सही केली असल्याचे त्याने पाहिले असेल अथवा त्याच्या सहीची किंवा लावलेल्या निशाणीची अथवा अशा इतर व्यक्तीच्या सहीची वैयक्तिक अभिस्वीकृती निष्पादकाकडून त्याने मिळवली असेल आणि ज्यांच्यापैकी प्रत्येकाने निष्पादकाच्या समक्ष संलेखावर सही केलेली असेल अशा एका किंवा अधिक साक्षीदारांकडून साक्षांकित, असा असेल; मात्र, अशा साक्षीदारांपैकी एका पेक्षा अधिक साक्षीदारांनी एकाचवेळी हजर असणे आवश्यक असणार नाही आणि साक्षांकनाचा विशिष्ट नमुना असण्याची आवश्यकता असणार नाही.]

(ड) "आकारणीपात्र" ही संज्ञा या अधिनियमाच्या प्रारंभानंतर निष्पादित केलेल्या किंवा प्रथमत: निष्पादित केलेल्या संलेखास लागू असेल तेव्हा तिचा अर्थ, या अधिनियमाखाली आकारणीपात्र असा आहे, आणि जेव्हा ती संज्ञा इतर कोणत्याही संलेखांना लागू असेल तेव्हा तिचा अर्थ, असा संलेख निष्पादित करून दिल्याचे वेळी, किंवा तो अनेक व्यक्तींनी निरनिराळ्या वेळी निष्पादित केला असल्यास तो प्रथमत: निष्पादित करून दिल्याचे वेळी राज्यात अंमलात असलेल्या कायद्यान्वये आकारणीपात्र असा आहे;

[२][ (डड) "मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी" म्हणजे, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, संपूर्ण [३][महाराष्ट्र राज्यासाठी किंवा महाराष्ट्र राज्याच्या] कोणत्याही भागासाठी याबाबत नेमील असा अधिकारी];

(ई) "निपटारा यादी" म्हणजे, अधिसंघाच्या नियमांना किंवा उपविधींना अनुसरून एखाद्या अधिसंघाच्या वटवणीगृहास संविदेसंबंधीच्या संव्यवहारांची जी यादी सादर करणे आवश्यक असते अशी यादी, असा होतो :

परंतु, ज्या संलेखात असे संव्यवहार करणाऱ्या व्यक्तीने किंवा तिच्या वतीने योग्यरीत्या नेमलेल्या मुखत्याराने सही केलेले पुढील अधिकथन नसेल असा कोणताही संलेख, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, निपटारा यादी असल्याचे मानण्यात येणार नाही:—

"मी/आम्ही, याद्वारे, गांभीर्यपूर्वक जाहीर करतो की, वरील यादीत माझ्या/आमच्या [४][(रद्द केलेल्या संव्यवहारांचा आणि अधिसंघाच्या नियमांना/उपविधींना अनुसरून वटवणीगृहास सादर कराव्या लागणाऱ्या संव्यवहारांचा समावेश करून )] संव्यवहारांचे परिपूर्ण व खरे निवेदन अंतर्भूत आहे. मी/आम्ही, आणखी असे जाहीर करतो की, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ याच्या अनुसूची एक मधील, यथास्थिति, अनुच्छेद ५ किंवा अनुच्छेद ४३ खाली ज्याच्याबाबत माफी मिळावी म्हणून मागणी करण्यात आली आहे असा कोणताही संव्यवहार वगळण्यात आलेला नाही."

१९५८ चा मुंबई ६०.

**स्पष्टीकरण** :—या खंडाच्या प्रयोजनासाठी "संव्यवहार" या संज्ञेत विक्री व खरेदी या दोन्ही गोष्टींचा समावेश असेल.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम (२) (ब) अन्वये हे स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९५, याच्या कलम २ अन्वये खंड (डड) जादा दाखल करण्यात आला.

[३] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० या अन्वये "मुंबई राज्यासाठी किंवा मुंबई राज्याच्या" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २ अन्वये "आणि तीत संघांच्या" या शब्दांनी सुरू होऊन, "समावेश करण्यात आला आहे" या शब्दांनी शेवट होणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(फ) "जिल्हाधिकारी" म्हणजे[१] * * * * * जिल्ह्याच्या महसुली प्रशासनाचा प्रभारी असलेला मुख्य अधिकारी आणि यामध्ये राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ज्या कोणत्याही अधिकाऱ्यास याबाबतीत नेमील [२][व ज्या अधिकाऱ्याला त्याच अधिसूचने अन्वये किंवा कोणत्याही इतर तत्सम अधिसूचने अन्वये, या अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्याचे कोणतेही किंवा सर्व अधिकार प्रदान करण्यात आले असतील] त्या अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

[३][(ग) "अभिहस्तांतरणपत्र" यात,—

ज्याद्वारे मालमत्ता—मग ती जंगम असो की स्थावर असो,—अथवा कोणतीही संपदा किंवा कोणत्याही मालमत्तेतील हितसंबंध, दोन हयात व्यक्तींच्या दरम्यान एकीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित करण्यात येईल किंवा तिच्यात निहित होईल आणि ज्यांसाठी अन्यथा अनुसूची एकमध्ये विनिर्दिष्टपणे तरतूद केलेली नसेल अशा पुढील संलेखाचा समावेश होतो :—

(एक) विक्रीनंतरचे अभिहस्तांतरणपत्र,

(दोन) प्रत्येक संलेख, आणि

(तीन) कोणत्याही दिवाणी न्यायालयाचा प्रत्येक हुकूमनामा किंवा अंतिम आदेश ;

**स्पष्टीकरण**:—ज्याद्वारे कोणत्याही मालमत्तेचा सहमालक आपला हितसंबंध मालमत्तेच्या दुसऱ्या सहमालकाकडे हस्तांतरित करतो आणि जो वाटणीपत्र नसेल असा संलेख हा, या खंडाच्या प्रयोजनास्तव, ज्याद्वारे दोन हयात व्यक्तींच्या दरम्यान मालमत्तेचे हस्तांतरण करण्यात आले आहे असा संलेख असल्याचे मानण्यात येईल ;]

(ह) "रीतसर मुद्रांकित" हे शब्द संलेखास लागू केले असता त्यांचा अर्थ, त्या संलेखावर उचित रकमेहून कमी नाही इतक्या किंमतीचा चिकटमुद्रांक किंवा उमटमुद्रांक आहे आणि असा मुद्रांक राज्यात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यास अनुसरून लावण्यात किंवा वापरण्यात आला आहे, असा आहे;

(आय) "निष्पादित करून दिलेला" व "निष्पादन" या संज्ञांचा संलेखाच्या संदर्भात वापर केला असेल तेव्हा त्यांचा अर्थ "सही केलेला" व "सही" असा आहे.

(ज) "सरकारी रोखे" म्हणजे, लोक ऋण अधिनियम, १९४४ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले सरकारी रोखे; १९४४ चा १८.

[४][(जअ) "स्थावर मालमत्ता" यात जमीन, जमिनीमुळे उद्‌भवणारे लाभ आणि भूसंलग्न असलेल्या कोणत्याही गोष्टी, किंवा भूसंलग्न असलेल्या कोणत्याही गोष्टीला कायम जखडलेली कोणतीही गोष्ट, यांचा समावेश असेल ;]

(के) "उमटमुद्रांक" यामध्ये,—

(एक) योग्य अधिकाऱ्याने लावलेल्या व उमटवलेल्या खूणचिठ्ठ्या,

(दोन) मुद्रांकित कागदावर उमटरेखन केलेले किंवा कोरलेले मुद्रांक—यांचा समावेश होतो ;

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३२ (अ) अन्वये "बृहन्मुंबईत मुंबईचा जिल्हाधिकारी व इतरत्र" हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाचे कलम ३२ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (क) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (ग) दाखल करण्यात आला.

[४] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ड) अन्वये खंड (जअ) समाविष्ट करण्यात आला.

(ल) "संलेख" यात, ज्या दस्तऐवजाच्या योगाने कोणताही हक्क किंवा दायित्व निर्माण करण्यात, हस्तांतरित करण्यात, मर्यादित करण्यात, विस्तारित करण्यात, नष्ट करण्यात किंवा अभिलिखित करण्यात आले असेल किंवा तसे करणे दिसून येत असेल अशा प्रत्येक दस्तऐवजाचा समावेश होतो ; मात्र, त्यात विनिमयपत्र, धनादेश, वचनचिठ्ठी, पतपत्र, भरणपत्र, विमापत्र, शेअर हस्तांतरणपत्र, ऋणपत्र, प्रतिपत्र व पावती यांचा समावेश होत नाही ;

[1][(लअ) "दानसंलेख" यामध्ये, दान हे कोणत्याही जंगम [2][किंवा स्थावर] मालमत्तेचे असेल, पण ते लेखी करण्यात आलेले नसेल त्याबाबतीत, अशा रीतीने तोंडी दान देण्यात आले असल्याचे किंवा स्वीकारण्यात आले असल्याचे अधिकथनाच्या स्वरूपात किंवा अन्यथा अभिलिखित करणाऱ्या कोणत्याही संलेखाचा समावेश होतो; ]

(म) "वाटणी संलेख" म्हणजे, ज्या संलेखाद्वारे कोणत्याही मालमत्तेचे सहमालक अशा मालमत्तेचे पृथक्पणे विभाजन करतील किंवा तिच्या विभाजनाचा करार करतील असा कोणताही संलेख; आणि तीत पुढील गोष्टींचा समावेश होतो—

(एक) विभाजन घडवून आणण्याविषयी कोणत्याही महसूल प्राधिकाऱ्याने किंवा कोणत्याही दिवाणी न्यायालयाने दिलेला अंतिम आदेश,

(दोन) ज्यात विभाजन करण्याचा निदेश देण्यात आला असेल अशा लवादाचा निवाडा, आणि

(तीन) असा कोणताही संलेख केल्यावाचून कोणतेही विभाजन करण्यात आले असेल तेव्हा सहमालकांनी सही केलेला आणि अशा विभाजनाच्या अधिकथनाच्या रूपाने किंवा अन्यथा सहमालकांमधील अशा विभाजनाच्या अटी अभिलिखित करणारा असा कोणताही संलेख किंवा असे कोणतेही संलेख;

(न) "भाडेपट्टा" म्हणजे, स्थावर मालमत्तेचा भाडेपट्टा व त्यात पुढील दस्तऐवजांचाही समावेश होतो,—

(एक) पट्टा ;

(दोन) कबुलायत किंवा स्थावर मालमत्तेची मशागत करण्याविषयी, तिचा भोगवटा करण्याविषयी किंवा तिचे भाडे देण्याविषयी किंवा ते सुपूर्द करण्याविषयी दिलेली, भाडेपट्ट्याचे प्रतिरूप नसलेली इतर लेखी हमी;

(तीन) ज्या संलेखाद्वारे कोणत्याही वर्णनाचे पथकर बसवण्याचे हक्क भाड्याने दिले जातात असा कोणताही संलेख;

(चार) भाडेपट्ट्यासाठी केलेला अर्ज मंजूर झाला आहे हे दर्शविण्याच्या उद्देशाने त्यावर लिहिलेला कोणताही मजकूर;

[3][(नअ) "बाजारमूल्य" याचा एखाद्या संलेखाची विषयवस्तू असणाऱ्या मालमत्तेच्या संदर्भातील अर्थ, असा संलेख ज्या तारखेस निष्पादित करण्यात आला असेल त्या तारखेस ती मालमत्ता खुल्या बाजारात विकली असता जी किंमत आली असती ती किंमत] [4][किंवा संलेखात नमूद करण्यात आलेली मोबदल्याची रक्कम, यांपैकी जी अधिक असेल ती] असा होतो;

---

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम २ अन्वये खंड (लअ) समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २ अन्वये खंड (नअ) समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (इ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(ओ) "विक्रेय रोखा" म्हणजे भारतातील [1]* * * * * * कोणत्याही रोखे बाजारात विक्री करण्याजोगा असेल अशा प्रकारचा रोखा ;

(प) "गहाणखत" यामध्ये, कर्ज म्हणून दिलेला किंवा द्यावयाचा पैसा किंवा एखादे विद्यमान किंवा भावी ऋण किंवा एखाद्या अभिसंकेतांचे पालन प्रतिभूत करण्याच्या प्रयोजनासाठी ज्या संलेखाद्वारे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीस किंवा तिच्या प्रीत्यर्थ एखाद्या विनिर्दिष्ट संपत्ती-वरील किंवा तिच्या संबंधातील अधिकार हस्तांतरित करते किंवा निर्माण करते अशा प्रत्येक संलेखाचा समावेश होतो ;

(क्यू) "कागद" यामध्ये, ज्यावर एखादा संलेख लिहिता येईल असे वस्त्रपत्र, चर्मपत्र किंवा अन्य कोणतीही सामग्री यांचा समावेश होतो ;

(र) "मुखत्यारनामा" यामध्ये, ज्या संलेखावरून तो निष्पादित करून देणाऱ्या व्यक्ती-करिता व तिच्या नावाने एखाद्या विनिर्दिष्ट व्यक्तीस काम चालविण्याचा अधिकार प्रदान करण्यात येतो अशा (न्यायालय फी संबंधीच्या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये फी आकारण्यास पात्र नसलेल्या) कोणत्याही संलेखाचा समावेश होतो [2][आणि त्यात, विधि-व्यवसायी नसेल अशा व्यक्तीला ज्याद्वारे, कोणत्याही पक्षकाराच्या वतीने, कोणत्याही कार्यवाही-बाबत कोणत्याही न्यायालयात, न्यायाधिकरणापुढे किंवा प्राधिकरणापुढे हजर राहण्यास प्राधिकृत करण्यात आले असेल त्या संलेखाचा यात समावेश होतो].

[3][(रअ) "लोक अधिकारी" म्हणजे, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम २ मधील खंड (१७) मध्ये व्याख्या केल्यानुसार लोक अधिकारी ;] १९०८ चा ५.

(स) "अनुसूची" म्हणजे, या अधिनियमास जोडलेली अनुसूची ;

(ट) "संव्यवस्था" म्हणजे, स्थावर किंवा जंगम मालमत्तेची,—

(एक) विवाहाच्या प्रतिफलार्थ;

(दोन) संव्यवस्थाकर्त्याची मालमत्ता, त्याच्या कुटुंबात किंवा ज्यांच्याकरिता तरतूद करण्याची त्याची इच्छा असेल त्यांच्यामध्ये वाटून देण्याच्या प्रयोजनार्थ किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्या एखाद्या व्यक्तीसाठी तरतूद करण्याच्या प्रयोजनार्थ, किंवा

(तीन) कोणत्याही धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी,

लेखी केलेली कोणतीही मृत्युपत्रेतर व्यवस्था, आणि या संज्ञेत अशी व्यवस्था करण्याविषयीच्या एखाद्या लेखी कराराचा समावेश होतो आणि जेथे अशी कोणतीही व्यवस्था लेखी करण्यात आलेली नसेल तेथे विश्वस्तव्यवस्था जाहीर करून त्याद्वारे किंवा अन्यथा अशा कोणत्याही व्यव-स्थेच्या अटी अभिलिखित करणाऱ्या कोणत्याही संलेखाचा समावेश होतो ;

(यू) "सैनिक" या संज्ञेत सेना अधिनियम, १९५० अन्वये जिचे नाव नोंदलेले आहे अशा अराजादिष्ट अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा खालच्या दर्जाच्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो. १९५० चा ४६.

---

[1] वरील अधिनियमाच्या कलम २ (फ) अन्वये "किंवा युनायटेड किंगडम मधील" हा मजकूर वगळण्यात आला.

[2] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ग) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[3] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ह) अन्वये खंड (रअ) समाविष्ट करण्यात आला.

## प्रकरण दोन

## मुद्रांक शुल्क

**(अ) संलेखांची शुल्कपात्रता**

३. या अधिनियमाच्या तरतुदी व अनुसूची एकमधील माफी यांच्या अधीनतेने, पुढील संलेख, त्या त्या संलेखाकरिता उचित शुल्क म्हणून जी रक्कम अनुसूची एकमध्ये अनुक्रमे दर्शविण्यात आली असेल तितक्या रकमेचे शुल्क आकारले जाण्यास पात्र असतील :— शुल्क आकारण्यास पात्र असलेले संलेख.

(अ) पूर्वी कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करून न दिलेला जो संलेख, अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस किंवा तारखेनंतर राज्यात निष्पादित करून देण्यात आला असेल असा अनुसूची एक मध्ये उल्लेखलेला प्रत्येक संलेख;

(ब) पूर्वी कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करून न दिलेला जो संलेख उक्त तारखेस किंवा त्या तारखेनंतर, राज्याबाहेर निष्पादित करून दिलेला आला असेल व जो या राज्यात असलेल्या कोणत्याही मालमत्तेसंबंधीचा किंवा राज्यात केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही बाबीसंबंधीचा किंवा गोष्टीसंबंधीचा असेल व या राज्यात प्राप्त झालेला असेल असा अनुसूची एकमध्ये उल्लेख केलेला प्रत्येक संलेख .

परंतु, पुढील संलेखाच्या संबंधात कोणतेही शुल्क आकारणीपात्र असणार नाही :—

(१) ही माफी देण्यात आली नाही तर ज्या बाबतीत, शासनाने किंवा शासनाच्या वतीने किंवा शासनाच्या प्रीत्यर्थ निष्पादित करून दिलेल्या कोणत्याही संलेखाच्या संबंधात आकारण्यास पात्र असे शुल्क भरण्यास शासन पात्र होईल अशा बाबतीतील [१][अथवा ज्या बाबतीत शासनाने शुल्क प्रदानाच्या संबंधातील खर्च सोसण्याचे अभिवचन दिले असेल] अशा बाबतीतील असा कोणताही संलेख ;

१८३८ चा१९. (२) मुंबई समुद्रकिनारी जलयान अधिनियम, १८३८ याअन्वये किंवा [२][व्यापारी जहाज वाहतूक अधिनियम, १९५८] या अन्वये नोंदणी केलेल्या कोणत्याही जहाजाच्या किंवा जलयानाच्या किंवा त्याचा किंवा त्यातील एखादा भाग, हितसंबंध, हिस्सा किंवा मालमत्ता यांच्या कायम किंवा गहाणाच्या रूपाने किंवा अन्यथा करण्यात येणाऱ्या विक्रीबाबतचा, हस्तांतरणाबाबतचा किंवा इतर व्यवस्थेबाबतचा कोणताही संलेख. १९५८ चा४४.

४. (१) जेव्हा कोणतीही विक्री, गहाण किंवा संव्यवस्था यांच्या बाबतीत, संव्यवहार पूर्ण करण्यासाठी अनेक संलेखांची योजना केली असेल, तेव्हा अभिहस्तांतरण, गहाण, किंवा संव्यवस्था यांसाठी अनुसूची एकमध्ये विहित केलेले शुल्क फक्त प्रमुख संलेखावरच आकारण्यात येईल, आणि इतर संलेखांपैकी प्रत्येक संलेखावर त्या अनुसूचीत त्यासाठी जे शुल्क (कोणतेही असल्यास) विहित केले असेल त्याऐवजी [३][दहा रुपये] शुल्क आकारण्यात येईल. विक्री, गहाण किंवा संव्यवस्था अशा एकाच संव्यवहारामध्ये, उपयोगात आणलेले अनेक संलेख.

(२) याप्रमाणे उपयोगात आणलेल्या संलेखांपैकी कोणता संलेख पोट-कलम (१) च्या प्रयोजनांकरिता प्रमुख संलेख मानावयाचा ते पक्षकारांना स्वतःच ठरविता येईल.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ (अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ (ब) अन्वये "भारतीय जहाज नोंदणी अधिनियम, १८४१" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४ (अ) अन्वये "तीन रुपये" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[1][(३) प्रमुख संलेख कोणता हे पक्षकार आपापसात ठरविण्यात कसूर करतील त्या बाबतीत ज्याच्या-समोर तो संलेख सादर करण्यात आला असेल अशा अधिकाऱ्याला, प्रमुख संलेख कोणता हे या कलमाच्या प्रयोजनार्थ निर्धारित करता येईल: ]

परंतु, याप्रमाणे निर्धारित केलेल्या संलेखावर आकारावयाचे शुल्क हे ज्यांची योजना केली असेल त्या उक्त संलेखांपैकी कोणत्याही संलेखावर आकारल्या जाणाऱ्या सर्वाधिक शुल्काइतके असेल.

अनेक वेगवेगळ्या बाबींच्या संलेखावर संबंधातील संलेख.

५. अनेक वेगवेगळ्या बाबी समाविष्ट असलेल्या किंवा अशा बाबींसंबंधीच्या कोणत्याही संलेखावर, अशा बाबींपैकी एकेक बाब समाविष्ट असलेल्या किंवा अशा एकेका बाबीसंबंधीच्या प्रत्येक वेगवेगळ्या संलेखावर या अधिनियमाखाली जे जे शुल्क आकारता येईल त्याच्या एकूण रकमेइतके शुल्क आकारले जाईल.

अनुसूची एकमधील अनेक वर्णनांमध्ये मोडणारे संलेख.

६. कलम ५ च्या तरतुदींच्या अधीनतेने, अनुसूची एकमधील दोन किंवा अधिक वर्णनांमध्ये मोडेल अशा तऱ्हेने तयार केलेल्या संलेखावर, त्या अनुसूचीखाली आकारणीपात्र अशी शुल्के निरनिराळी असल्यास, त्यांपैकी जे सर्वाधिक असेल तेवढे शुल्क आकारण्यात येईल :

परंतु, शुल्क आकारणीला पात्र असून व ज्याबाबत योग्य ते शुल्क देण्यात आले आहे अशा कोणत्याही संलेखाचा प्रतिसंलेख किंवा दुसरी प्रतिलिपी या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे [2][ दहा रुपयांहून ] अधिक शुल्क आकारले जाण्यास पात्र होणार नाही.

विवक्षित संलेखांच्या बाबतीत उच्चतर शुल्क भरणे.

७. (१) कलम ४ किंवा ६ यात किंवा इतर कोणत्याही अधिनियमितीत काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये आकारण्यास पात्र असे शुल्क,—

(अ) यथास्थिति, प्रमुख संलेखावर किंवा मूळ संलेखावर, किंवा

(ब) या कलमाच्या तरतुदीअनुसार भरण्यात आले आहे असे सिद्ध झाले नसेल तर प्रमुख संलेखाहून अन्य विक्रीच्या, गहाणाच्या किंवा संव्यवस्थेच्या संलेखावर किंवा कोणत्याही प्रतिसंलेखावर प्रतिलिपीवर किंवा नकलेवर आकारण्यास पात्र असे शुल्क हे, प्रमुख किंवा मूळ संलेख या राज्यात प्राप्त झाला त्यावेळी, या अधिनियमान्वये उच्चतर दराने शुल्क आकारण्यास तो पात्र झाला असता तर प्रमुख किंवा मूळ संलेखावर कलम १९ खाली जे शुल्क आकारता आले असते असे शुल्क असेल.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीत, काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाखाली शुल्क आकारण्यास पात्र असलेला कोणताही संलेख, प्रतिसंलेख, प्रतिलिपी किंवा नक्कल ही, या कलमान्वये त्यावर आकारण्यास पात्र असे शुल्क भरण्यात आलेले असल्याखेरीज पुराव्यात स्वीकारता येणार नाही :

परंतु, ज्या कोणत्याही न्यायालयासमोर असा कोणताही संलेख, प्रतिलिपी किंवा नक्कल दाखल केली असेल अशा कोणत्याही न्यायालयास, या कलमान्वये आकारण्यास पात्र असे शुल्क त्यावर भरू देण्याची परवानगी देता येईल व त्यानंतर तो पुराव्यात स्वीकारता येईल.

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४ (ब) अन्वये पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५ अन्वये "तीन रुपयांहून" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

८. (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, स्थानिक प्राधिकरण कर्ज अधिनियम, सन १९१४ याच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींखाली ऋणपत्रांहून अन्य बंधपत्रे किंवा रोखे काढून त्याद्वारे कर्ज उभारणाऱ्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणावर अशा कर्जाच्या संबंधात त्याने विक्रीस काढलेल्या अशा बंधपत्राच्या किंवा रोख्यांच्या एकूण रकमेवर दीड टक्का इतके शुल्क आकारण्यात येईल आणि अशी बंधपत्रे किंवा रोखे मुद्रांकित करावे लागणार नाहीत आणि त्यांचे नवीकरण, एकत्रीकरण, पोट-विभागणी केल्यावर किंवा अन्यथा त्यांवर आणखी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

सन १९१४ चा अधिनियम क्रमांक ९ खाली किंवा इतर कायद्याखाली कर्जासाठी काढलेल्या ऋणपत्रांहून अन्य बंधपत्रे किंवा रोखे.

१९१४ चा ९.

(२) विवक्षित बंधपत्रे किंवा रोखे यांना मुद्रांकित करण्यापासून व आणखी विवक्षित शुल्क आकारण्यापासून माफी देणाऱ्या पोट-कलम (१) च्या तरतुदी, त्यात उल्लेख केलेल्या प्रकारच्या सर्व अदत्त कर्जासंबंधीच्या ऋणपत्रांव्यतिरिक्त इतर रोख्यांस किंवा बंधपत्रांस लागू होतील आणि ही सर्व बंधपत्रे किंवा रोखे—मग ते मुद्रांकित असोत किंवा नसोत—विधिग्राह्य असतील.

(३) या कलमान्वये आवश्यक असलेले शुल्क भरण्याबाबत बुद्धिपुरस्सर उपेक्षा करण्यात आली असेल तर, स्थानिक प्राधिकरण, प्रदेय शुल्काच्या शेकडा दहा टक्क्यांइतकी रक्कम समपहृत होऊन राज्य शासनाकडे जमा होण्यास व पहिल्या महिन्यानंतर जितक्या महिन्यांपर्यन्त अशी उपेक्षा करणे चालू राहील त्या प्रत्येक महिन्यागणिक तशाच शास्तीस पात्र होईल.

९. [1][लोकहितास्तव तसे करणे आवश्यक आहे अशी राज्य शासनाची खात्री होईल तर,] त्यास शासकीय राजपत्रात नियम किंवा आदेश प्रसिद्ध करून त्याद्वारे—

शुल्के कमी करण्याचा किंवा त्यांची सूट देण्याचा किंवा त्याबाबत आपसाती करण्याचा अधिकार.

(अ) शुल्क आकारण्यास पात्र असे कोणतेही संलेख किंवा संलेखांचा कोणताही विशिष्ट वर्ग किंवा अशा वर्गातील संलेखांपैकी कोणताही संलेख किंवा कोणत्याही विशिष्ट वर्गाच्या व्यक्तींनी किंवा त्यांच्या प्रीत्यर्थ किंवा अशा वर्गाच्या सदस्यांनी किंवा त्यांच्या प्रीत्यर्थ निष्पादित करून दिलेले कोणतेही संलेख यावर आकारली जाणारी शुल्के, संपूर्ण राज्यात किंवा राज्याच्या कोणत्याही भागात, भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने कमी करता येतील किंवा त्यांची सूट देता येईल, आणि

(ब) कोणत्याही कायद्याने संस्थापित कंपनीने किंवा अन्य निगम निकायाने ऋणपत्राहून अन्य बंधपत्रे किंवा विक्रेय रोखे विक्रीस काढले असतील त्या शुल्कांबाबत आपसमेळ किंवा त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत तरतूद करता येईल.

## (ब) मुद्रांक व त्यांचा वापर करण्याची पद्धती

१०. (१) या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल ते खेरीज करून एरव्ही कोणत्याही संलेखावर आकारण्याजोगी सर्व शुल्के,—

शुल्के कशा रीतीने भरावीत.

(अ) यामध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींअनुसार; किंवा

(ब) अशी कोणतीही तरतूद त्यास लागू नसेल तेव्हा राज्य शासन याद्वारे निदेशित करील त्याप्रमाणे, मुद्रांकांच्या रूपाने भरण्यात येतील आणि ती अशी भरण्यात आल्याचे, अशा संलेखांवर दर्शविण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) खाली केलेल्या नियमांद्वारे, इतर गोष्टींबरोबरच खालील बाबींचे विनियमन करता येईल,—

(अ) प्रत्येक प्रकारच्या संलेखाच्या बाबतीत, वापरता येतील अशा मुद्रांकांचे वर्णन;

(ब) उमटमुद्रांक लावलेल्या संलेखांच्या बाबतीत—वापरता येतील अशा मुद्रांकांची संख्या.

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

¹[(३) पोट-कलम (१) मध्ये कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी, जेव्हा राज्याच्या कोणत्याही क्षेत्रातील मुद्रांकांच्या तात्पुरत्या टंचाईमुळे आकारणीपात्र शुल्काचे प्रदान करता येत नसल्याची आणि शुल्काचे प्रदान मुद्रांकांच्या आधारे संलेखांवर दर्शविता येत नसल्याची राज्य शासनाची किंवा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याची राज्यातील कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात खात्री होईल तेव्हा, यथास्थिति, राज्य शासन किंवा राज्य शासनाला कळवून मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रात आणि अशा कालावधीकरिता, कोणत्याही शासकीय कोषागारात किंवा शासकीय उपकोषागारात किंवा मुख्य मुद्रांक कार्यालय, मुंबई, येथे किंवा **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, राज्य शासन याबाबतीत नेमून देईल अशा अन्य कोणत्याही ठिकाणी शुल्क रोखीने ²[किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा प्रदानादेशाद्वारे] भरता येईल आणि त्याबाबतची पावती किंवा चलान त्यासंबंधीचा प्रभारी अधिकारी देईल. अशी पावती किंवा चलान नोंदणी अधिकाऱ्याला सादर करण्यात येईल व शुल्क रोखीने ²[किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा प्रदानादेशाद्वारे] भरण्यात आले असल्याबद्दल योग्य ती पडताळणी केल्यावर तो, अशी पावती किंवा चलान पुन्हा वापरण्यात येऊ नये म्हणून ती पावती किंवा ते चलान रद्द करून नंतर खालीलप्रमाणे त्या संलेखावर पृष्ठांकन करील :—

"पावती/चलान क्र. ................ दिनांक ..................... अन्वये रु. ...... . ............... एवढे शुल्क रोखीने ² [किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा प्रदानादेशाद्वारे] भरण्यात आले.

नोंदणी अधिकाऱ्याची सही."

परंतु, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने काढावयाच्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला कालावधी ³[तीन महिन्यांपेक्षा] अधिक असणार नाही.

⁴[**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमांच्या प्रयोजनासाठी "दर्शनी धनाकर्ष" व "प्रदानादेश" म्हणजे, भारतीय स्टेट बँक अधिनियम, १९५५ खाली रचना करण्यात आलेली भारतीय स्टेट बँक किंवा बँकव्यवसायी कंपनी (उपक्रमाचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० याच्या कलम ३ खाली किंवा बँकव्यवसायी कंपनी (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८० याच्या कलम ३ खाली रचना करण्यात आलेली तत्सम नवीन बँक किंवा, भारतीय रिझर्व बँक अधिनियम, १९३४ याच्या कलम २ च्या खंड (ई) मध्ये व्याख्या करण्यात आल्याप्रमाणे अनुसूचित बँक असेल अशी इतर कोणतीही बँक यांनी काढलेला दर्शनी धनाकर्ष किंवा प्रदानादेश.]

१९५५ चा २३. १९७० चा ५. १९८० चा ४०. १९३४ चा २.

(४) पोट-कलम (३) खाली कोणत्याही संलेखावर करण्यात आलेले पृष्ठांकन हे, जणू काही पृष्ठांकनामध्ये नमूद केलेल्या रकमेइतके शुल्क अशा संलेखाच्या संबंधात देण्यात आलेले आहे आणि अशी रक्कम पोट-कलम (१) अन्वये मुद्रांकाद्वारे दर्शविण्यात आलेली आहे अशा रीतीने त्याच स्वरूपात अंमलात राहील.

---

¹ सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७ अन्वये पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

² सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३३ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

³ वरील अधिनियमाच्या कलम ३३ (ब) अन्वये "एक महिन्यापेक्षा" याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

⁴ वरील अधिनियमाच्या कलम ३३ (क) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

११. पुढील संलेखांवर चिकटमुद्रांक लावता येतील उदा.— चिकटमुद्रांकांचा वापर.

(अ) [1][ * * * * * * * ]

[2][(ब) अनुसूची एक मधील [3][अनुच्छेद १,] ५ (अ) ते (ग), १७, २९, ३७, [4][४१][4] ४२, ४३, ५९ (अ) आणि ६२ यांमध्ये नमूद केलेले संलेख.]

१२. (१) (अ) कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करून दिलेल्या व शुल्क आकारण्यास पात्र अशा ज्या कोणत्याही संलेखांवर जो कोणी कोणताही चिकटमुद्रांक लावील त्याने, तो लावतेवेळी, अशा मुद्रांकाचा पुन्हा वापर करणे शक्य होणार नाही अशा रीतीने तो रद्द केला पाहिजे ; आणि चिकटमुद्रांक रद्द करणे.

(ब) जो कोणी चिकटमुद्रांक असणाऱ्या कोणत्याही कागदावर कोणताही संलेख निष्पादित करून देईल त्याने तो निष्पादित करून देतेवेळी जर असा मुद्रांक वर सांगितलेल्या रीतीने आधीच रद्द केलेला नसेल, तर त्याचा पुन्हा वापर करणे शक्य होणार नाही अशा रीतीने तो रद्द केला पाहिजे.

(२) पुन्हा वापर करणे शक्य होणार नाही अशा रीतीने रद्द न केलेला कोणताही चिकटमुद्रांक लावलेला संलेख हा, जेथवर अशा मुद्रांकाचा संबंध असेल तेथवर, अमुद्रांकित आहे असे मानले जाईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये ज्या व्यक्तीने चिकटमुद्रांक रद्द करणे आवश्यक आहे त्या व्यक्तीला, त्या मुद्रांकावर किंवा त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत आपले नाव किंवा आद्याक्षरे किंवा आपल्या व्यवसाय संस्थेचे नाव किंवा तिची आद्याक्षरे लिहून व आपण तसे लिहिल्याची खरी तारीख घालून किंवा इतर कोणत्याही परिणामक्षम रीतीने तो मुद्रांक रद्द करता येईल.

[5][ १३. उमटमुद्रांकाने मुद्रांकित केलेला कागद वापरण्यात आलेला प्रत्येक संलेख हा, अशा कागदाच्या दर्शनी भागावर, आणि आवश्यकता भासल्यास त्याच्या मागील भागावर लिखाण करून अशा रीतीने लिहावा लागेल की जेणेकरून तो अन्य कोणत्याही संलेखासाठी वापरता येणार नाही. उमटमुद्रांक लावलेले संलेख कसे लिहावेत.

**स्पष्टीकरण एक.**—कोणत्याही संलेखासंबंधात आकारणीपात्र शुल्काची रक्कम भरून काढण्यासाठी उमटमुद्रांक लावलेले दोन किंवा अधिक कागद वापरण्यात येतील तेव्हा, एकतर अशा रीतीने वापरलेल्या प्रत्येक कागदावर अशा संलेखाचा काही भाग लिहावा लागेल किंवा ज्या कागदावर संलेखाचा असा काही भाग लिहिण्यात येणार नसेल त्यावर, ज्या कागदावर असा संलेख लिहिण्यात आलेला असेल त्या कागदाला जादा कागद जोडलेला आहे असे निर्दिष्ट करून त्या पृष्ठांकनासह त्यावर निष्पादकाला किंवा निष्पादकांपैकी एकाला सही करावी लागेल.

**स्पष्टीकरण दोन.**—उमटमुद्रांक असलेला/असलेले एक किंवा अनेक कागद, त्यावर लिहिला जाणारा पूर्ण संलेख लिहिण्यास अपुरे असतील तेव्हा, असा संलेख लिहून पूर्ण करण्यास आवश्यक असतील तेवढे कोरे कागद त्यास जोडण्यात यावेत ; मात्र अशा रीतीने खाली जोडलेल्या कोऱ्या कागदावर संलेखाच्या कोणत्याही भागाचे लिखाण करण्यापूर्वी, त्या संलेखाचा बराच भाग मुद्रांकित कागदावर लिहिलेला असावा; आणि अशा कोऱ्या कागदावर निष्पादकाने सही केली तरी चालेल वा न केली तरी चालेल, पण त्या कागदावर अशा रीतीने सही करण्यात आली नसेल तर तेवढ्याने तो संलेख योग्यप्रकारे मुद्रांकित केलेला नाही असे ठरणार नाही.]

---

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३४ (अ) अन्वये हा खंड वगळण्यात आला.

[2] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३ अन्वये मूळ खंड (ब) आणि (क) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[3] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३४ (ब) अन्वये "अनुच्छेद क्रमांक" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८ अन्वये "४१ (अ)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १३ दाखल करण्यात आले.

त्याच मुद्रांकानिशी तो एकच तेवढा संलेख निष्पादित करणे.

१४. शुल्क आकारण्यास पात्र असा कोणताही संलेख ज्या मुद्रांकित कागदावर आधीच लिहिलेला असेल अशा कागदावर शुल्क आकारण्यास पात्र असा दुसरा कोणताही संलेख लिहिता येणार नाही :

परंतु, कोणत्याही संलेखाद्वारे निर्माण होणारा किंवा त्यावरून दिसून येणारा कोणताही अधिकार हस्तांतरित करण्याच्या किंवा अशा संलेखाद्वारे जो कोणताही पैशाचा भरणा किंवा मालाची सुपूर्दगी सुनिश्चित करण्यात आली असेल त्याची पोच देण्याच्या प्रयोजनासाठी, अशा संलेखावर रीतसर मुद्रांकित असे किंवा शुल्क आकारण्यास पात्र नसलेले कोणतेही पृष्ठांकन करण्यास या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे प्रतिबंध असणार नाही.

संलेखांमधील फेरफारांबाबत आकारणी कशी करावयाची.

[1][१४-अ. इतर पक्षकारांच्या संमतीने किंवा संमतीविना एखाद्या पक्षकाराने संलेखात महत्त्वाचे फेरफार केल्यामुळे संलेखाच्या स्वरूपात मोठा किंवा ठळक फेरफार होत असेल तेव्हा, त्या संलेखाच्या फेरफार केलेल्या स्वरूपानुसार त्यासाठी नवीन मुद्रांकित कागदाचा वापर करणे आवश्यक असेल.]

कलम १३, [4][१४ किंवा १४-अ] याविरुद्ध लिहिलेला संलेख [4][रीतसर मुद्रांकित नाही असे मानले जाईल.]

१५. कलम १३, [2][१४ किंवा १४-अ] याचे उल्लंघन करून लिहिलेला प्रत्येक संलेख [3][ रीतसर मुद्रांकित नाही] असे मानले जाईल.

शुल्क दर्शविणे.

१६. जेथे एखाद्या संलेखावरील आकारणीपात्र शुल्क किंवा शुल्कापासून त्यास मिळणारी माफी ही, कोणत्याही रीतीने दुसऱ्या एखाद्या संलेखासंबंधात प्रत्यक्ष भरण्यात आलेल्या शुल्कावर अवलंबून असेल तेथे, शेवटी उल्लेखिलेले शुल्क भरलेले आहे ही गोष्ट, त्या प्रयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी अर्ज केलेला असल्यास ते दोन्ही संलेख हजर केल्यानंतर प्रथम उल्लेख केलेल्या संलेखावर जिल्हाधिकाऱ्याच्या सहीच्या पृष्ठांकनाद्वारे किंवा राज्य शासनास, नियमांद्वारे विहित करता येईल अशा अन्य रीतीने (कोणतीही असल्यास) दर्शविण्यात येईल.

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १० अन्वये कलम १४-अ समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ११-अ अन्वये "किंवा कलम १४" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ११ (ब) अन्वये "अमुद्रांकित आहे" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ११ (क) अन्वये "किंवा कलम १४" या मजकुराऐवजी "१४ किंवा १४-अ" हा मजकूर दाखल करण्यात आला व "अमुद्रांकित मानला जाईल" या मजकुराऐवजी "रीतसर मुद्रांकित नाही असे मानले जाईल" हा मजकूर दाखल करण्यात आला.

## (क) संलेख केव्हा मुद्रांकित करावेत

१७. शुल्क आकारण्यास पात्र अशा व राज्यात कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करून दिलेल्या सर्व संलेखांवर, निष्पादनापूर्वी किंवा निष्पादन करून देतेवेळी [१][किंवा त्यानंतर लगेच] मुद्रांक लावण्यात येतील : राज्यात निष्पादित केलेले संलेख.

[२][परंतु, अनुसूची एकचे अनुच्छेद १९, २०, २१, २२ किंवा २३ मध्ये वर्णन केलेली निपटारा यादी, जर अधिसंघाच्या वटवणीगृहाने आपले नियम व उपविधी यांस अनुसरून मुद्रांकित करण्यासाठी ती मुद्रांक शुल्काच्या आवश्यक त्या रकमेसह सादर केली असेल तर, राज्य शासनाने या अधिनियमान्वये केलेल्या नियमांन्वये प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास, ती निष्पादित करून दिल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत मुद्रांकित करता येईल.]

१८. (१) शुल्क आकारण्यास पात्र असा सर्वस्वी या राज्याबाहेर करून दिलेला प्रत्येक संलेख तो या राज्यात प्रथम मिळाल्यानंतर, तीन महिन्यांच्या आत मुद्रांकित करता येईल. राज्याबाहेर निष्पादित करून दिलेले संलेख.

(२) असा कोणताही संलेख, त्यासाठी विहित केलेल्या मुद्रांक वर्णनाच्या संदर्भात, एखाद्या खाजगी व्यक्तीला रीतसर मुद्रांकित करता येत नसेल तर तो संलेख उक्त तीन महिन्यांच्या अवधीत जिल्हाधिकाऱ्याकडे नेता येईल आणि जिल्हाधिकारी, याप्रमाणे असा संलेख घेऊन येणाऱ्या व्यक्तीला जेवढ्या मूल्याचा मुद्रांक पाहिजे असेल व ती व्यक्ती जेवढे पैसे भरील तेवढ्या मूल्याचा मुद्रांक लावून तो संलेख राज्य शासन नियमांद्वारे विहित करील अशा रीतीने मुद्रांकित करील.

१९. अनुसूची एकच्या कोणत्याही अनुच्छेदात वर्णन केलेल्या स्वरूपाचा व या राज्यात असलेली कोणतीही मालमत्ता किंवा या राज्यात केलेली किंवा करावयाची कोणतीही गोष्ट किंवा बाब यासंबंधीचा कोणताही संलेख राज्याबाहेर निष्पादित करून देण्यात आला असेल व नंतर राज्यात प्राप्त झाला असेल तेव्हा— [३][महाराष्ट्र राज्यात] वाढीव शुल्क देण्यास पात्र असलेल्या विवक्षित संलेखांवरील शुल्क भरणे.

(अ) अशा संलेखावर आकारण्यास पात्र होणाऱ्या शुल्काची रक्कम ही, या राज्यात निष्पादित करून दिलेल्या तशाच स्वरूपाच्या दस्तऐवजावर अनुसूची एक खाली आकारण्यास पात्र होणाऱ्या शुल्कांच्या रकमेतून अशा संलेखावर तो निष्पादित करून देण्यात आला त्यावेळी जम्मू व काश्मीर राज्य सोडून भारतात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये अगोदरच चुकती केलेली शुल्काची कोणतीही रक्कम असल्यास ती वजा करून राहणाऱ्या उर्वरित रकमेइतकी असेल;

(ब) आणि अशा संलेखावर अगोदरच कोणतेही मुद्रांक लावलेले असतील तर त्यांच्या भरीला अशा संलेखावर जणू काही तो संलेख हा त्यावर उच्चतर शुल्क आकारण्यास पात्र झाला असेल अशा वेळी या राज्यात प्रथमच मिळालेला संलेख असल्याप्रमाणे, त्याच रीतीने व त्याच वेळी व त्याच व्यक्तीने या कलमाचा खंड (अ) खाली त्यावर आकारणीपात्र असणाऱ्या शुल्काची रक्कम भरण्यासाठी आवश्यक असलेले मुद्रांक लावले पाहिजेत, आणि

(क) कलम ३२, पोट-कलम (३) च्या परंतुकाच्या खंड (ब) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदी अशा संलेखास, जणू काही तो उपरोक्त उच्चतर शुल्क आकारणीस पात्र होता अशावेळी, या राज्याबाहेर निष्पादित करून दिलेला किंवा प्रथमतः निष्पादित करून दिलेला आणि या राज्यात प्रथमच मिळालेला संलेख आहे असे समजून, लागू होतील, परंतु उक्त परंतुकाच्या खंड (अ) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदी लागू होणार नाहीत.

---

[१]सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२, अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२]सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९५, कलम ३, अन्वये मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[३]महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०, अन्वये "मुंबई राज्यात", या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

## (ड) शुल्कार्थ मूल्यांकनाविषयी

परकीय चलनात दर्शविलेल्या रकमेचे रूपांतर.

२०. (१) कोणताही संलेख भारतीय चलनाहून अन्य कोणत्याही चलनात दर्शविलेल्या कोणत्याही पैशाच्या संबंधात यथामूल्य शुल्क आकारण्यास पात्र असेल तेव्हा असे शुल्क, त्या संलेखाच्या दिनांकी चालू विनिमय दराप्रमाणे भारतीय चलनात अशा पैशाचे जे मूल्य असेल त्यावरून परिगणित केले जाईल.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनासाठी ब्रिटिश किंवा अन्य कोणत्याही विदेशी चलनाचे भारतीय चलनात रूपांतर करण्याकरिता भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ याचे कलम २०, पोट-कलम (२) खाली विहित केलेला विनिमयाचा दर हा चालू दर असल्याचे मानले जाईल. १८९९ चा २.

पुंजरोखा व विक्रेय रोखे यांचे मूल्यांकन कसे करावे.

२१. कोणत्याही पुंजरोख्यासंबंधाने किंवा विक्रेय अथवा इतर रोख्यासंबंधाने एखादा संलेख यथामूल्य शुल्क आकारण्यास पात्र असेल तेव्हा ते शुल्क त्या संलेखाच्या दिनांकी अशा पुंजरोख्याची किंवा रोख्यांची जी सरासरी किंमत असेल किंवा मूल्य असेल त्यानुसार होणाऱ्या त्याच्या मूल्यावरून परिगणित केले जाईल.

विनिमयाचा दर किंवा सरासरी किंमत याबाबतच्या विधानाचा परिणाम.

२२. एखाद्या संलेखात, त्या बाबतीत आवश्यक असेल त्याप्रमाणे विनिमयाचा चालू दर किंवा सरासरी किंमत यासंबंधीचे विधान अंतर्भूत असून त्या विधानानुसार तो मुद्रांकित असेल तेव्हा अशा विधानाच्या विषयवस्तूचा संबंध असेल तेथवर तो संलेख, तद्विरुद्ध सिद्ध होईपर्यंत रीतसर मुद्रांकित केला असल्याचे गृहीत धरले जाईल.

व्याजरक्षी संलेख.

२३. एखाद्या संलेखाच्या अटींवरून व्याज प्रदेय होत असल्याचे व्यक्त होत असेल तेथे, जर अशा संलेखात व्याजाचा उल्लेख केलेला नसता तर जेवढे शुल्क आकारणीपात्र झाले असते त्याहून अधिक शुल्क त्यावर आकारले जाणार नाही.

विक्रेय रोख्यांच्या गहाणांशी संबंधित असलेले विवक्षित संलेख, करारनामे म्हणून शुल्क आकारण्यास पात्र असणे.

२४. (१) कोणताही संलेख–

(अ) कर्जरूपाने दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाबद्दल अथवा एखाद्या विद्यमान किंवा भावी ऋणाबद्दल प्रतिभूती म्हणून कोणताही विक्रेय रोखा निक्षिप्त करतेवेळी दिलेला असेल, किंवा

(ब) कोणत्याही विक्रेय रोख्याची प्रतिभूती म्हणून रीतसर मुद्रांकित केलेले हस्तांतरण विमोचनयोग्य किंवा मर्यादित करीत असेल,

तेथे, तो संलेख जणू काही अनुसूची एक च्या अनुच्छेद पाच (ह) खाली शुल्क आकारण्यास पात्र असा करारनामा किंवा कराराचा संक्षेपलेख त्याप्रमाणे शुल्क आकारण्यास पात्र होईल.

(२) कोणत्याही अशा संलेखाबाबत परिमोचन किंवा ऋणमुक्ती झाल्यास त्या बाबतीत केवळ वर उल्लेखिलेल्या इतकेच शुल्क आकारले जाईल.

ऋणाच्या प्रतिफलार्थ किंवा भावी भरणा इत्यादींच्या अधीनतेने केलेल्या हस्तांतरणावर शुल्क कसे आकारावे.

[1][२५. कोणतीही मालमत्ता कोणाही व्यक्तीकडे,

(अ) तिला देय असलेल्या कोणत्याही ऋणाच्या पूर्णतः किंवा अंशतः प्रतिफलार्थ, अथवा

(ब) कोणताही पैसा किंवा पुंजरोखा, मग तो त्या मालमत्तेवरील प्रभार किंवा बोजा असो वा नसो अथवा त्या मालमत्तेच्या प्रभारामध्ये किंवा बोज्यामध्ये अंतर्भूत असो वा नसो, एकतर निश्चितपणे किंवा घटनापेक्षतेने (तिला किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला), प्रदान करण्याच्या किंवा (तिच्याकडे किंवा इतर कोणत्याही व्यक्तीकडे) हस्तांतरित करण्याच्या अधीनतेने

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १३ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम २५ दाखल करण्यात आले.

हस्तांतरित करण्यात आलेली असेल तेथे, असे ऋण, पैसा किंवा पुंजरोखा हा, ते हस्तांतरण ज्या प्रतिफलाच्या बाबतीत यथामूल्य शुल्क आकारणीस पात्र असेल त्या प्रतिफलाचा संपूर्ण भाग किंवा यथास्थिति, एक भाग असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट ही, अनुसूची एकच्या अनुच्छेद १६ मध्ये उल्लेखिलेल्या अशा कोणत्याही विक्री प्रमाणपत्रास लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण.**—मालमत्तेची विक्री, गहाण किंवा इतर बोजा यांच्या अधीनतेने करण्यात येईल आणि परतफेड न केलेले गहाणधन किंवा प्रभारित धन (असल्यास) व त्याच्यावर देय होणारे व्याज हे सर्व विक्रीच्या प्रतिफलाचा भाग असल्याचे मानण्यात येईल, मग ती रक्कम स्वत: देण्याचे अथवा ती रक्कम देणे विक्रेत्याला भाग पाडल्यास विक्रेत्याला त्याबद्दल क्षतिपूर्ती करून देण्याचे स्पष्ट अभिवचन खरेदीदार विक्रेत्याला देवो वा न देवो :

परंतु जेव्हा, गहाणाधीन असलेली कोणतीही मालमत्ता गहाणधारकाकडे हस्तांतरित करण्यात येईल तेव्हा, गहाणासंबंधात अगोदर भरण्यात आलेले कोणतेही शुल्क, हस्तांतरणानंतर, प्रदेय होणाऱ्या शुल्कातून वजा करण्याचा त्याला हक्क असेल.

**उदाहरणे**

१. "अ" हा "ब" चे १,००० रुपये देणे लागतो. ५०० रुपये आणि त्याच्या जोडीला मागील १,००० रुपयांच्या ऋणाचे परिमोचन अशा प्रतिफलार्थ "अ" हा "ब" ला मालमत्ता विकतो. मुद्रांक शुल्क १,५०० रुपयांवर प्रदेय असेल.

२. "अ" हा "ब" ला ५०० रुपयांस मालमत्ता विकतो. ती मालमत्ता १,००० रुपये व त्यावरील न दिलेले व्याज २०० रुपये एवढ्या रकमेसाठी "क" कडे गहाण आहे. ही विक्री गहाणाच्या अधीन आहे, मुद्रांक शुल्क १,७०० रुपयांवर प्रदेय होईल.

३. "अ" हा १०,००० रुपये किंमतीचे घर "ब" कडे ५,००० रुपयांसाठी गहाण ठेवतो. नंतर "ब" ते घर "अ" कडून विकत घेतो. अगोदर गहाणासाठी भरलेली मुद्रांक शुल्काची रक्कम वजा करून १०,००० रुपयावर मुद्रांक शुल्क भरावे लागेल.]

२६. वार्षिकी किंवा नियतकालाने द्यावयाची इतर रक्कम यांचे प्रदान सुनिश्चित करण्यासाठी कोणताही संलेख निष्पादित करून दिला असेल किंवा अभिहस्तांतरणपत्राचे प्रतिफल म्हणजेच वार्षिकी किंवा नियतकालाने द्यावयाची इतर रक्कम असेल तेथे, यथास्थिति, अशा संलेखाद्वारे सुनिश्चित झालेली रक्कम किंवा अशा अभिहस्तांतरणपत्राचे प्रतिफल हे या अधिनियमाच्या प्रयोजना-करिता— वार्षिकी वगैरेच्या बाबतीत मूल्यांकन.

(अ) एका निश्चित कालावधीकरिता रक्कम प्रदेय असेल आणि त्यामुळे देण्यात यावयाची एकूण रक्कम अगोदरच सुनिश्चित करता येत असेल तेथे अशी एकूण रक्कम ;

(ब) रक्कम शाश्वत कालाकरिता किंवा अशा संलेखाच्या किंवा अभिहस्तांतरणपत्राच्या तारखेस हयात असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या हयातीबरोबरच समाप्त न होणाऱ्या अनिश्चित कालाकरिता देय असेल तेथे, ज्या तारखेस पहिले प्रदान देय होईल त्या तारखेपासून गणना केल्यानंतर, वीस वर्षाच्या कालावधीमध्ये अशा संलेखाच्या किंवा अभिहस्तांतरणपत्राच्या अटी-अन्वये जी देय होईल किंवा होऊ शकेल अशी संपूर्ण रक्कम ; आणि

(क) रक्कम, अशा संलेखाच्या किंवा अभिहस्तांतरणपत्राच्या तारखेस हयात असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या हयातीबरोबरच समाप्त होणाऱ्या अनिश्चित कालाकरिता देय असेल तेथे, ज्या तारखेस पहिले प्रदान देय होईल त्या तारखेपासून गणना केल्यानंतर बारा वर्षाच्या कालावधीमध्ये, पूर्वोक्त रीतीने जी देय होईल किंवा होऊ शकेल अशी कमाल रक्कम;

**असल्याचे समजण्यात येईल.**

विषयवस्तूचे मूल्य अनिश्चित असेल तेव्हा लावावयाचा मुद्रांक.

२७. यथामूल्य शुल्क आकारण्यास पात्र अशा कोणत्याही संलेखाच्या विषय-वस्तूच्या मूल्याची रक्कम ही, तो संलेख निष्पादित करून दिल्याच्या तारखेस विनिश्चित करता येत नसेल किंवा या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी निष्पादित करून दिलेल्या संलेखाच्या बाबतीत तो प्रथम निष्पादित करून दिल्याच्या तारखेस विनिश्चित करता आली नसती अशी असेल तेथे, अशा संलेखाखाली मूल्याच्या अशा सर्वाधिक रकमेपेक्षा अधिक कशाचीही मागणी करता येणार नाही की ज्या सर्वाधिक रकमेसाठी तशाच वर्णनाच्या एखाद्या संलेखात नमूद केलेली असल्यास प्रत्यक्षात वापरलेला मुद्रांक तो संलेख करून दिल्याच्या तारखेस [1][पुरेसा ठरला असता आणि त्याहून अधिक रकमेच्या संबंधात संलेखावर अपुरे मुद्रांक लावण्यात आलेले आहेत असे समजण्यात येईल व संलेख पुराव्यासाठी दाखल करण्याच्या संबंधात कलम ३४ च्या तरतुदी तदनुसार लागू होतील:

परंतु, कलम ३४ अशा संलेखाला लागू करण्याच्या प्रयोजनार्थ, शुल्कातील तफावतीची रक्कम भरणे पुरेसे होईल व त्यानंतर दंडाची रक्कम बसविण्यात येणार नाही :]

[2][आणखी असे की], एखाद्या खाणीच्या भाडेपट्ट्याच्या बाबतीत स्वामित्वधन किंवा त्या खाणीच्या उत्पन्नाचा काही हिस्सा भाड्यादाखल किंवा भाड्याच्या भागादाखल प्राप्त होत असेल तेव्हा, असे स्वामित्वधन किंवा अशा हिश्श्याचे मूल्य मुद्रांक शुल्काच्या प्रयोजनाकरिता पुढीलप्रमाणे अंदाजणे पुरेसे असेल :—

(अ) जेव्हा तो भाडेपट्टा शासनाकडून किंवा त्यांच्या वतीने देण्यात आलेला असेल तेव्हा, भाडेपट्ट्यानुसार स्वामित्वधन किंवा हिस्सा म्हणून सरकारला प्रदेय होऊ शकेल अशी, याबाबतची सर्व परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हाधिकारी अंदाजित करील ती रक्कम किंवा ते मूल्य ; किंवा

(ब) जेव्हा तो भाडेपट्टा कोणत्याही इतर व्यक्तीकडून देण्यात आलेला असेल तेव्हा दरवर्षी वीस हजार रुपये ;

आणि अशा स्वामित्वधनाच्या किंवा हिश्श्याच्या पूर्ण रकमेची—मग ती कितीही असो, अशा भाडेपट्ट्यानुसार मागणी करता येईल :

परंतु आणखी असे की, कलम ३१ किंवा ४० यांखाली एखाद्या संलेखाच्या संबंधात कारवाई करण्यात आलेली असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने प्रमाणित केलेली रक्कम ही, तो संलेख निष्पादित करून दिल्याच्या तारखेस प्रत्यक्ष वापरण्यात आलेला मुद्रांक असल्याचे मानले जाईल.

ज्यांचा शुल्कावर परिणाम होणार असेल अशी तथ्ये संलेखात मांडणे.

२८. कोणत्याही संलेखाच्या शुल्कपात्रतेवर किंवा तो संलेख जे शुल्क आकारण्यास पात्र असेल त्या शुल्काच्या रकमेवर ज्याचा परिणाम होईल असे प्रतिफल (कोणतेही असल्यास), [3][ बाजारमूल्य] आणि इतर सर्व तथ्य व परिस्थिती या बाबी त्या संलेखात पूर्णपणे व खरेपणाने मांडण्यात येतील.

विवक्षित अभिहस्तांतरणपत्रांच्या बाबतीत शुल्कास अनुलक्षून निदेश.

२९. (१) कोणत्याही मालमत्तेच्या बाबतीत त्या संपूर्ण मालमत्तेची एका प्रतिफलार्थ विक्री करण्याची संविदा करण्यात आली असेल व ती मालमत्ता खरेदीदाराकडे वेगवेगळ्या संलेखांद्वारे अलग अलग भागांमध्ये अभिहस्तांतरित केली असेल तेथे [4][बाजारमूल्याचे] संविभाजन पक्षकारांस योग्य वाटेल अशा रीतीने केले जाईल. परंतु, अभिहस्तांतरणपत्रात प्रत्येक स्वतंत्र भागाकरिता अलग [4][बाजार-मूल्य] असल्याचे दर्शविले पाहिजे आणि अशा अभिहस्तांतरणपत्रावर, अशा अलग [4][बाजारमूल्याच्या] संबंधात यथामूल्य शुल्क आकारले जाईल.

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १४ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १४ (ब) अन्वये परंतुकातील 'परंतु' याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ४ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ५(अ) अन्वये "प्रतिफल" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(२) जी मालमत्ता दोन किंवा अधिक व्यक्तींनी संयुक्तपणे किंवा कोणत्याही व्यक्तीने स्वतःकरिता व इतरांकरिता किंवा पूर्णतः इतरांकरिता एका प्रतिफलार्थ खरेदी करावयाची संविदा केलेली असेल ती मालमत्ता ज्यांनी व ज्यांच्याकरिता खरेदी केली त्या व्यक्तींकडे प्रतिफलाच्या अलग अलग भागांकरिता स्वतंत्र संलेखाद्वारे भागशः अभिहस्तांतरित करण्यात आली असेल तेथ, प्रत्येक स्वतंत्र भागाचे अभिहस्तांतरणपत्र [1][मालमत्तेच्या अशा भागाच्या बाजारमूल्याच्या संबंधात] अशा स्वतंत्र भागाकरिता यथामूल्य शुल्क आकारले जाण्यास पात्र असेल.

(३) जिने कोणतीही मालमत्ता खरेदी करण्याची संविदा केलेली आहे परंतु तिला तिचे अभिहस्तांतरणपत्र मिळालेले नाही अशी एखादी व्यक्ती ती मालमत्ता इतर कोणत्याही व्यक्तीस विकण्यासाठी संविदा करील व त्यामुळे ती मालमत्ता तावडतोब त्या पोट-खरेदीदाराकडे अभिहस्तांतरित होत असेल तेथे ते अभिहस्तांतरणपत्र मूळच्या खरेदीदाराने पोट-खरेदीदारास केलेल्या [2][विक्रीच्या वेळी असलेल्या मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या बाबतीत] यथामूल्य शुल्क आकारले जाण्यास पात्र असेल.

(४) जिने कोणतीही मालमत्ता खरेदी करण्याची संविदा केलेली आहे परंतु तिला तिचे अभिहस्तांतरणपत्र मिळालेले नाही अशी एखादी व्यक्ती ती संपूर्ण मालमत्ता किंवा तिचा कोणताही भाग कोणत्याही दुसऱ्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना विकण्याची संविदा करील आणि परिणामी ती मूळ विक्रेत्याकडून निरनिराळ्या व्यक्तींकडे भागशः अभिहस्तांतरित होत असेल तेथे, पोट-खरेदीदारास विकलेल्या प्रत्येक भागाचे अभिहस्तांतरणपत्र हे, [3][केवळ अशा दुय्यम-खरेदीदारास विकण्यात आलेल्या भागाच्या बाजारमूल्यांच्याच संबंधात मूळ विक्रेत्याने अभिहस्तांतरित केलेल्या मालमत्तेचे बाजारमूल्य लक्षात न घेता, यथामूल्य शुल्क आकारले जाण्यास पात्र असेल आणि अशा मालमत्तेच्या उरलेल्या भागाचे (कोणताही असल्यास) मूळ खरेदीदारास दिलेले अभिहस्तांतरणपत्र, अशा उर्वरित भागाच्या बाजारमूल्याच्या संबंधात यथामूल्य शुल्क आकारले जाण्यास पात्र असेल]:

परंतु, अनुसूची एकच्या अनुच्छेद २५ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी शेवटी नमूद केलेल्या अशा अभिहस्तांतरणपत्रावरील शुल्क, कोणत्याही बाबतीत, [4][दहा रुपयांहून] कमी असणार नाही.

[5][ (५) एखादा दुय्यम-खरेदीदार हा, त्याला आपले हितसंबंध प्रत्यक्ष विकणाऱ्या व्यक्तीकडून अभिहस्तांतरणपत्राची विषयवस्तू असेल अशा मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या संबंधात यथामूल्य शुल्क आकारण्यास योग्य असे आणि तदनुसार रीतसर मुद्रांकित करण्यात आले आहे असे, अशा हितसंबंधाचे प्रत्यक्ष अभिहस्तांतरणपत्र घेत असेल त्याबाबतीत त्या मूळ विक्रेत्याने, त्याच मालमत्तेच्या संबंधात त्यास त्यानंतर करून द्यावयाच्या कोणत्याही अभिहस्तांतरणपत्रावर, त्या अभिहस्तांतरणपत्राची विषयवस्तू असेल अशा मालमत्तेच्या बाजार मूल्याबद्दलच्या अभिहस्तांतरणावर जितके शुल्क आकारण्यास पात्र होऊ शकेल तितके शुल्क किंवा असे शुल्क [6][पन्नास रुपयांहून] अधिक होत असेल तेव्हा [6][पन्नास रुपये] शुल्क आकारले जाईल.]

---

[1]सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ५ (ब) अन्वये "त्यात विनिर्दिष्ट केलेल्या प्रतिफलाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2]वरील अधिनियमाच्या कलम ५ (क) अन्वये "विक्रीबद्दलच्या प्रतिफलाच्या बाबतीत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3]वरील अधिनियमाच्या कलम ५ (ड) अन्वये "अशा दुय्यम-खरेदीदाराने" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "केवळ यथामूल्य शुल्क आकारण्यास योग्य होईल" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4]सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५ (अ) अन्वये "तीन रुपयांहून" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[5]सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ५ (इ) अन्वये मूळ कलमाऐवजी पोट-कलम (५) दाखल करण्यात आले.

[6]सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५ (ब) अन्वये "सात रुपये पन्नास पैसे" या मजकुराऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

## (ई) शुल्के कोणी द्यावीत

शुल्के कोणी द्यावीत.

३०. विरुद्ध असा कोणताही करार झाला नसल्यास, योग्य मुद्रांकाची तरतूद करावयास लागणारा खर्च पुढे दर्शविल्याप्रमाणे त्या त्या व्यक्तींना सोसावा लागेल :—

(अ) अनुसूची एकच्या पुढील अनुच्छेदांपैकी कोणत्याही अनुच्छेदात वर्णन केलेल्या कोणत्याही संलेखाच्या बाबतीत असा संलेख विकर्षित करणाऱ्या किंवा निष्पादित करणाऱ्या व्यक्तीने सोसला पाहिजे :—

क्रमांक २ (प्रशासन बंधपत्र)
क्रमांक ६ (हक्कलेख निक्षेप, हडप किंवा तारण यासंबंधीचा करारनामा),
क्रमांक १३ (बंधपत्र),
क्रमांक १४ (नौतारण बंधपत्र),
क्रमांक २८ (सीमाशुल्क बंधपत्र),
क्रमांक ३३ (अधिक भार),
क्रमांक ३५ (क्षतिपूर्ति बंधपत्र),
क्रमांक ४० (महाणखत),
क्रमांक ५२ (परिमोचन पत्र),
क्रमांक ५३ (नौभार बंधपत्र),
क्रमांक ५४ (प्रतिभूति बंधपत्र किंबा गहाणखत),
क्रमांक ५५ (संव्यवस्था पत्र),

क्रमांक [1][५९ (अ)] (भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ याचे कलम ८ यात ज्यांबद्दल १८९९ तरतूद केली आहे ती ऋणपत्रे खेरीजकरून जी ऋणपत्रे विक्रेय रोखे असतील त्यांचे हस्तांतरण— चा २. मग ती ऋणपत्रे शुल्कपात्र असोत किंवा नसोत),

क्रमांक ५९ (ब) (बंधपत्र, गहाणखत किंवा विमापत्र याअन्वये प्रतिभूत केलेल्या कोणत्याही हित-संबंधाचे हस्तांतरण),

(ब) अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत (गहाण मालमत्तेचे प्रत्यंतरणपत्र धरून) प्रदान-ग्राहीने, भाडेपट्टयाच्या किंवा भाडेपट्टयाच्या कराराच्या बाबतीत—पट्टेदाराला किंवा उद्देशित पट्टेदाराला ;

(क) भाडेपट्टयाच्या प्रतिलेखाच्या बाबतीत, पट्टेदाराला ;

(ड) विनिमय संलेखाच्या बाबतीत, पक्षकारांना समान हिश्श्यांत ;

(ई) विक्रीच्या प्रमाणपत्राच्या बाबतीत, ते प्रमाणपत्र ज्या मालमत्तेसंबंधीचे असेल तिच्या खरेदीदाराला, [2]*

(फ) वाटणीपत्राच्या बाबतीत-ते करून देणाऱ्या पक्षकारांना, वाटणी केलेल्या त्यांच्या संपूर्ण मालमत्तेतील आपापल्या हिश्श्यांच्या प्रमाणात किंवा जेव्हा ती वाटणी महसूल प्राधिकाऱ्याने किंवा दिवाणी न्यायालयाने किंवा लवादाने दिलेल्या आदेशाचे पालन म्हणून केली जात असेल तेव्हा, असा प्राधिकारी, न्यायालय किंवा [3][लवाद निर्देश देईल त्या प्रमाणात, आणि],

[4][(ग) अन्य कोणत्याही बाबतीत, संलेख निष्पादित करून देणाऱ्या व्यक्तीला.]

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६ (अ) अन्वये "५८ (अ)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १६ (ब) अन्वये "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १६ (क) अन्वये "लवाद निर्देश देईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरीलअधिनियमाच्या कलम १६ (ड)अन्वये खंड (ग) जादा दाखल करण्यात आला.

## प्रकरण तीन

## मुद्रांकांबाबत अभिनिर्णय

३१. [1][ (१) जेव्हा कोणताही संलेख, मग तो निष्पादित करून दिलेला असो किंवा नसो उचित आणि तो पूर्वीच मुद्रांकित केलेला असो किंवा नसो, जिल्हाधिकाऱ्याकडे आणला जाईल आणि तो आणणारी व्यक्ती, तो संलेख किती शुल्कास (कोणतेही असल्यास) पात्र ठरेल [2][ किंवा अनुसूची एकच्या कोणत्या अनुच्छेदाअन्वये ] तो शुल्क पात्र ठरेल याबाबत त्या अधिकाऱ्याचे मत घेण्यासाठी अर्ज करील आणि यथामूल्य तत्त्वावरील मुद्रांक शुल्क अंतर्भूत नसेल अशा बाबतीत, पाच रुपये व यथामूल्य तत्त्वावरील मुद्रांक शुल्क अंतर्भूत असेल त्याबाबतीत, किमान पाच रुपये व कमाल पंचवीस रुपये या अधीनतेने, प्रत्येक १,००० रुपयांस किंवा त्याच्या भागास एक रुपया फी देईल तेव्हा, जिल्हाधिकारी, आपल्या निर्णय शक्तीनुसार त्या संलेखावर किती शुल्क आकारता येईल ते शुल्क (कोणतेही असल्यास) [2][किंवा अनुसूची एकच्या कोणत्या अनुच्छेदाअन्वये] तो शुल्क पात्र ठरेल ते निर्धारित करील. मुद्रांकांबाबत अभिनिर्णय.

(२) जिल्हाधिकाऱ्यास या प्रयोजनासाठी त्या संलेखाची [3][सत्य प्रत अथवा] गोषवारा आणि ज्यांचा त्या संलेखाच्या शुल्कपात्रतेवर किंवा त्यावर जे शुल्क आकारण्यास पात्र असेल त्या शुल्काच्या रकमेवर परिणाम होईल अशी सर्व तथ्ये व परिस्थिती पूर्णपणे व खरेपणाने त्यात नमूद केली आहे हे सिद्ध करण्यासाठी त्याला आवश्यक वाटेल असा प्रतिज्ञालेख किंवा इतर पुरावा दाखल करण्यास फर्मावता येईल आणि त्यानुसार [4][अशी सत्य प्रत अथवा असा गोषवारा] व पुरावा दाखल करण्यात येईपर्यंत अशा कोणत्याही अर्जावर कार्यवाही करण्यास त्यास नकार देता येईल :

परंतु—

(अ) या कलमाला अनुलक्षून दाखल करण्यात आलेला कोणताही पुरावा, तो ज्या संलेखाशी संबंधित असेल अशा संलेखावर किती शुल्क आकारणीपात्र आहे याबाबतची चौकशी खेरीज करून एरव्ही कोणत्याही दिवाणी कार्यवाहीत कोणत्याही व्यक्तीविरुद्ध वापरला जाणार नाही; आणि

(ब) ज्या ज्या व्यक्तीने असा कोणताही पुरावा दाखल केला असेल त्या प्रत्येक व्यक्तीस, तो पुरावा लागू असणारा संलेख जे शुल्क आकारण्यास पात्र असेल ते पूर्ण शुल्क दिल्यावर अशा संलेखात उपरोक्त तथ्ये किंवा परिस्थिती यापैकी कोणत्याही तथ्याचा किंवा परिस्थितीचा खरेपणाने उल्लेख न केल्याकारणाने या अधिनियमाखाली जी शास्ती तिला भरावी लागली असती त्या कोणत्याही शास्तीपासून सुटका देण्यात येईल.

---

[1] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ३ अन्वये मूळ कलमाऐवजी पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

[2] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १७ (ब) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १७ (ब) (दोन) अन्वये "असा गोषवारा" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ (३) पोट-कलम (१) व (२) खाली काम करणारा जिल्हाधिकारी हा, त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी नसेल व अभिनिर्णयासाठी त्याच्याकडे आलेल्या संलेखाची विषयवस्तू असलेल्या मालमत्तेचे बाजारमूल्य हे, त्यामध्ये खरेपणाने देण्यात आलेले नाही असे त्यास सकारण वाटेल त्याबाबतीत त्यास, मुद्रांक शुल्काचे निर्धारण करण्यापूर्वी संबंधित पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आणि त्या बाबतीत राज्य शासनाने केलेल्या नियमांना अनुसरून अशा मालमत्तेचे खरे बाजारमूल्य व त्या संलेखावर देय असणारे योग्य मूल्य निर्धारित करण्यासाठी, तो संलेख, त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवता येईल.]

जिल्हाधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र.

३२. (१) जेव्हा कलम ३१ खाली जिल्हाधिकाऱ्याकडे आणलेला एखादा संलेख त्याच्या मते आकारणीपात्र अशा एखाद्या वर्णनाचा असेल आणि——

(अ) तो अगोदरच पूर्ण मुद्रांकित आहे असे जिल्हाधिकाऱ्याने निर्धारित केले असेल, किंवा

(ब) जिल्हाधिकाऱ्याने कलम ३१ खाली निर्धारित केलेले शुल्क किंवा त्या संलेखाच्या संबंधात आधीच भरण्यात आलेल्या शुल्कासह जी रक्कम याप्रमाणे निर्धारित केलेल्या शुल्काइतकी होईल ती रक्कम भरण्यात आली असेल, तेव्हा, जिल्हाधिकारी त्या संलेखावर आकारण्यास पात्र असे पूर्ण शुल्क भरले गेले आहे असे त्यावर [२][( अनुसूची एक मधील संबद्ध अनुच्छेद व रक्कम नमूद करून)] पृष्ठांकनाद्वारे प्रमाणित करील.

(२) जेव्हा असा संलेख, त्याच्या मते शुल्क आकारण्यास पात्र नसेल तेव्हा, तो असा संलेख शुल्क आकारण्यास पात्र नाही असे पूर्वोक्त रीतीने प्रमाणित करील.

(३) [३][कलम ५३-अ च्या तरतुदींच्या अधीनतेने] या कलमाखाली [ज्यावर पृष्ठांकन करण्यात आले आहे असा कोणताही संलेख] यथास्थिती, रीतसर मुद्रांकित असलेला किंवा शुल्क आकारण्यास पात्र नसलेला मानण्यात येईल, आणि जर तो शुल्क आकारण्यास पात्र असेल तर, तो पुरावा म्हणून किंवा अन्यप्रकारे ग्राह्य होईल, आणि जणू काही तो मुळातच रीतसर मुद्रांकित असावा त्याप्रमाणे त्यावर कार्यवाही करता येईल व त्याची नोंदणी करता येईल :

परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे जिल्हाधिकाऱ्यास, खालील संलेखांवर पृष्ठांकन करण्याचा प्राधिकार मिळणार नाही :—

(अ) राज्यात निष्पादित करून दिलेला किंवा प्रथम निष्पादित करून दिलेला आणि यथास्थिति तो निष्पादित करून दिल्याच्या किंवा प्रथम निष्पादित करून दिल्याच्या तारखेपासून एक महिन्याचा अवधी समाप्त झाल्यानंतर त्याच्याकडे आणण्यात आलेला कोणताही संलेख ;

(ब) राज्याबाहेर निष्पादित करून दिलेला किंवा प्रथम निष्पादित करून दिलेला व या राज्यात प्रथम मिळाल्यापासून तीन महिन्यांचा अवधी समाप्त झाल्यानंतर त्याच्याकडे आणलेला कोणताही संलेख ; किंवा

(क) योग्यरीतीने मुद्रांकित नसलेल्या कागदावर विकर्षित केल्यावर किंवा निष्पादित करून दिल्यावर त्याच्याकड आणण्यात आलेला, वीस पैसे किंवा त्याहून कमी शुल्क आकारण्यास पात्र असा कोणताही संलेख.

---

[१] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ६ अन्वये पोटकलम (३) जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १८ (अ) अन्वये "(रक्कम नमूद करून)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १८ (ब) अन्वये "ज्यावर पृष्ठांकन करण्यात आले आहे असा कोणताही संलेख" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][३२-अ. (१) प्रत्येक अभिहस्तांतरणपत्र, देववेवपत्र , दानपत्र, विक्रीचे प्रमाणपत्र, वाटणी-पत्र, अथवा स्थावर मालमत्तेची विक्री करण्यासाठी प्रतिफलार्थ दिलेला मुखत्यारनामा, संव्यवस्थापत्र अथवा अभि-हस्तांकनाद्वारे भाडेपट्टयाचे हस्तांतरणपत्र, हे नोंदणी अधिनियम, १९०८ च्या तरतुदींखाली नोंदणीसाठी सादर करण्यात येईल तेव्हा, त्यासोबत त्याची सत्य प्रत जोडावी लागेल : अभि-हस्तांतरण-पत्र, इत्यादी संलेखाचे कमी मूल्य दर्शविल्यास त्या-संबंधात कोणती कार्य-वाही करावी.

१९०८ चा १६

परंतु, ४ जुलै १९८० रोजी किंवा त्यानंतर, मुंबई मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, १९८५ याच्या प्रारंभाच्या तारखेपर्यंत निष्पादित केलेल्या संलेखांच्या बाबतीत, नोंदणी अभिलेखातून घेण्यात येणारा अशा संलेखातील उतारा हा, पोटकलम (१) च्या प्रयोजनार्थ नोंदणीसाठी सादर करण्यात आलेल्या संलेखासोबत जोडलेली सत्य प्रत आहे असे मानण्यात येईल.

१९८५ चा महा-राष्ट्र २७.

(२) अशा संलेखाची नोंदणी करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास, अशा संलेखाची विषयवस्तू असणाऱ्या स्थावर मालमत्तेचे बाजारमूल्य हे त्यामध्ये यथातथ्यपणे नमूद करण्यात आलेले नाही असे सकारण वाटत असेल तर, त्यास त्या संलेखाची नोंदणी [२][करण्यापूर्वी] अशा मालमत्तेचे खरे बाजारमूल्य व संलेखावर प्रदेय असणारे योग्य शुल्क निर्धारित करण्यासाठी, अशा संलेखाची एक सत्य प्रत जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविता येईल.

(३) ज्या व्यक्तीपुढे कोणताही असा संलेख सादर करण्यात येईल किंवा जिच्या कामकाजाच्या ओघात तो येईल अशा कलम ३३ मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा संलेखाची विषयवस्तू असणाऱ्या स्थावर मालमत्तेचे बाजारमूल्य हे त्यामध्ये यथातथ्यपणे नमूद करण्यात आलेले नाही असे सकारण वाटत असेल तर, तिला, अशा संलेखासंबंधीचे आपले काम पार पाडल्यानंतर अशा मालमत्तेचे खरे बाजारमूल्य व संलेखावर प्रदेय असणारे योग्य शुल्क निर्धारित करण्यासाठी, अशा संलेखाच्या एका सत्य प्रतीसह तो संलेख जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविता येईल.

(४) पोटकलम (२) किंवा (३) खालील, यथास्थिति, तो संलेख, किंवा संलेखाची सत्य प्रत प्राप्त झाल्यानंतर, त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, संबंधित पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आणि त्या संबंधात राज्य शासनाने केलेल्या नियमांस अनुसरून संलेखाची विषय-वस्तू असणाऱ्या स्थावर मालमत्तेचे खरे बाजारमूल्य व त्यावर प्रदेय असलेले योग्य शुल्क निर्धारित करील. ते असे निर्धारित केल्यानंतर, त्या जिल्ह्याचा जिल्हाधिकारी, शुल्क भरण्यास दायी असणाऱ्या पक्षकारास, या पोटकलमाखाली निर्धारित केलेली शुल्काची रक्कम आणि त्याने त्यापूर्वीच दिलेल्या शुल्काची रक्कम यातील फरक भरून काढण्यास फर्मावील व तसेच अशा पक्षकारास त्याच्या भरीला, अशा फरकापेक्षा कमी नसेल व अशा फरकाच्या रकमेच्या दुपटीहून अधिक नसेल इतकी शास्तीची रक्कम भरण्यास फर्मावील, आणि अशी रक्कम भरण्यात आल्यावर पोटकलम (२) किंवा (३) खाली प्राप्त झालेला संलेख त्यामध्ये निर्देशिलेल्या अधिकाऱ्याकडे किंवा व्यक्तीकडे परत करण्यात येईल :

परंतु, संलेखात नमूद करण्यात आलेले बाजारमूल्य आणि जिल्हाधिकाऱ्याने निर्धारित केलेले बाजार-मूल्य यांच्यातील फरक जिल्हाधिकाऱ्याने निर्धारित केलेल्या बाजारमूल्याच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक होत नसेल तर, या पोटकलमाखाली अशा कोणत्याही पक्षकारास, फरक भरून काढण्यासाठी कोणतीही रक्कम देण्यास फर्माविले जाणार नाही.

(५) त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास स्वत: होऊन किंवा कोठून तरी माहिती मिळाल्यावरून, पोटकलम (१) मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही संलेखाच्या (ज्यावर कलम ३२ अन्वये पृष्ठांकन करण्यात आलेले आहे किंवा ज्याच्या बाबतीत पोटकलम (४) खाली त्याने योग्य शुल्क निर्धारित केलेले आहे किंवा जो ४ जुलै १९८० पूर्वी निष्पादित करून देण्यात आलेला आहे असा संलेख नव्हे) नोंदणीच्या तारखेपासून [३][आठ वर्षांत,] नोंदणी अधिकाऱ्याकडून संलेखाची सत्य प्रत किंवा त्याचा गोषवारा

[१].सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ३२-अ हे दि. ४ जुलै १९८० पासून दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[२].सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम २ अन्वये "करण्यापूर्वी किंवा नोंदणी केल्या-वर" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३].सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम २ (अ) अन्वये " सहा वर्षात " या-ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

मागविता येईल आणि अशा संलेखाची विषयवस्तू असणाऱ्या स्थावर मालमत्तेच्या बाजारमूल्याच्या यथातथ्यतेविषयी व त्यावर देय असलेल्या शुल्काविषयी स्वत:ची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनास्तव त्याची तपासणी करता येईल, आणि जर अशा तपासणीनंतर, अशा मालमत्तेचे बाजारमूल्य संलेखात यथातथ्यपण व पूर्णपण नमूद करण्यात आलेले नाही असे त्याला सकारण वाटले तर, तो पोटकलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे कायवाही करील.

[1][(६) जिल्हाधिकाऱ्याने, कलम ३१, पोटकलम (३) अन्वये किंवा या कलमान्वये संलेखाची विषयवस्तू असलेल्या स्थावर मालमत्तेचे खरे बाजारमूल्य आणि त्यावर देय असणारे यथोचित शुल्क ठरवून देण्यासाठी त्याच्याकडे निर्देशित करण्यात आलेले कोणतेही प्रकरण, कलम ३१ च्या उक्त पोटकलम (३) च्या किंवा, यथास्थिति, या कलमाच्या तरतुदींनुसार निकालात काढण्यासाठी अपर जिल्हाधिकाऱ्याकडे, कोणताही असल्यास, किंवा खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा त्याच्या जिल्हयातील कोणत्याही अन्य अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करणे विधिसंमत असेल :—

(एक) तहसीलदार,

(दोन) नगररचना संचालक, महाराष्ट्र राज्य, याच्या संवर्गावर घेतलेला नगररचनाकार, किंवा

(तीन) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील असा, नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वये नियुक्त केलेला जिल्हा सहनिबंधक.] १९०८ चा १६.

अपील. [2][३२-ब. (१) कलम ३१, पोटकलम (३) अन्वये किंवा कलम ३२ अन्वये किंवा ३२-अअन्वये बाजारमूल्य ठरवणाऱ्या कोणत्याही आदेशामुळे किंवा कलम ३२-अ अन्वये कोणतीही शास्ती लादणाऱ्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, असा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आंत, [राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा, तीनशे रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या फीसह आणि वेगवेगळया क्षेत्रांसाठी फीचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील] लेखी अर्जाद्वारे अशा आदेशाविरुद्ध उपनोंदणी महानिरीक्षक आणि उपमुद्रांक नियंत्रक, यांच्याकडे अपील दाखल करता येईल आणि तो त्यावर विचार केल्यानंतर त्याबाबतीत त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश देईल; आणि अशाप्रकारे देण्यात आलेला आदेश हा कलम ३२-क च्या तरतुदींच्या अधीनतेने, अंतिम असेल आणि त्यास कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोर आव्हान देण्यात येणार नाही :

परंतु असे की, महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, १९८९ (यापुढे, या कलमात ज्याचा निर्देश "सुधारणा अधिनियम" असा करण्यात आला आहे) अंमलात येण्याच्या लगतपूर्वी कलम ३२-ब ज्या स्वरुपात अस्तित्वात होते त्या स्वरुपात त्या कलमान्वये निर्णयासाठी न्यायालयांकडे निर्देशित करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्याकडे करण्यात आलेले व सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी त्याच्याकडे प्रलंबित असलेले सर्व अर्ज, सुधारणा अधिनियम अंमलात आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याकडून उपनोंदणी महानिरीक्षक आणि उपमुद्रांक नियंत्रक यांच्याकडे हस्तांतरित करण्यात येतील व हस्तांतरित करण्यात आलेले असे अर्ज, उपनोंदणी महानिरीक्षक-आणि-उपमुद्रांक नियंत्रक यांच्याकडे दाखल करण्यात आलेली व प्रलंबित असलेली अपिले असल्याचे मानण्यात येईल; आणि तो या कलमानुसार ती निकालात काढील : १९८९ चा महाराष्ट्र १८.

परंतु आणखी असे की, पोटकलम (१) मध्ये आणि पहिल्या परंतुकात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा, सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अगोदरच जिल्हाधिकाऱ्याकडून न्यायालयांकडे पाठविण्यात आलेल्या आणि न्यायालयांकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांवर परिणाम होणार नाही; आणि जणू काही सुधारणा अधिनियम मंजूर करण्यात आलेला नाही असे मानून संबंधित न्यायालयांकडून ती निकालात काढण्यात येतील.

---

[1].सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम २ (ब) अन्वये मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

[2].सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ३ अन्वये मूळ कलम ३२-ब ऐवजी ३२ ब व ३२ क ही कलमे दाखल करण्यात आली.

(२) उपनोंदणी महानिरीक्षक आणि उप-मुद्रांक नियंत्रक याने पोटकलम (१) अन्वये काढलेल्या आदेशाविरुद्ध पुनरीक्षणासाठी कोणतेही अपील व कोणताही अर्ज दाखल करता येणार नाही.

३२-क. कलम ३२-ब च्या तरतुदींच्या आणि राज्य शासनाकडून याबाबतीत तयार करण्यात येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, स्वतः होऊन कोणत्याही अधिकाऱ्याकडून या अधिनियमान्वये किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमान्वये, काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचा (अपीलामध्ये काढण्यात आलेल्या आदेशासह) अभिलेख मागवू शकेल आणि त्याची तपासणी करू शकेल आणि त्यावर, त्याला न्याय्य व योग्य वाटेल असा आदेश काढू शकेल; आणि असा काढलेला आदेश अंतिम स्वरुपाचा असेल आणि त्या आदेशास, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे आव्हान देता येणार नाही: पुन-रीक्षण

परंतु पुनरीक्षण करावयाचा आदेश कळविण्यात आल्याच्या तारखेपासून तीन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडून या कलमान्वये अभिलेख मागवण्यासंबंधीची कोणतीही नोटीस बजावण्यात येणार नाही आणि अशा तारखेपासून पाच वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर उक्त प्राधिकाऱ्याकडून पुनरीक्षणाचा कोणताही आदेश याखाली काढण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीस सुनावणीची वाजवी संधी दिल्याखेरीज अशा व्यक्तीवर बाधक रीतीने परिणाम होईल असा कोणताही आदेश या कलमान्वये काढण्यात येणार नाही.

## प्रकरण चार

## रीतसर मुद्रांकित न केलेले संलेख

३३. (१) कायद्याने किंवा पक्षकारांच्या संमतीने पुरावा घेण्याचा प्राधिकार असलेली [१][प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक व्यक्ती आणि पोलीस अधिकारी [२][किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखालील अपराधांचा तपास करण्यासाठी कायद्याने अधिकार प्रदान करण्यात आलेला कोणताही अन्य अधिकारी खेरीजकरून] लोककार्यपदाचा प्रभारी असलेली प्रत्येक व्यक्ती कलम ३२-अ च्या तरतुदीच्या अधीनतेने तिच्या मते शुल्क आकारण्यास पात्र असणारा कोणताही संलेख तिच्यासमोर हजर करण्यात येईल किंवा ती आपली कामे पार पाडीत असताना तिच्यासमोर येईल तेव्हा तो जर तिला रीतसर मुद्रांकित झाला नसल्याचे दिसून आले तर तो संलेखां, तो [३][कायद्यानुसार विधीग्राह्य आहे की नाही हे लक्षांत न घेता] अवरुद्ध करून ठेवील. संलेखांची तपासणी करणे व ते अवरुद्ध करणे.

(२) त्या प्रयोजनासाठी अशी प्रत्येक व्यक्ती व याप्रमाणे शुल्क आकारण्यास पात्र असलेल्या व अशा-रीतीने दाखल करण्यात आलेल्या किंवा तिच्यासमोर आलेल्या प्रत्येक संलेखाची, तो जेव्हा निष्पादित करून देण्यात आला किंवा प्रथम निष्पादित करून देण्यात आला त्या वेळी राज्यात अंमलात असलेल्या कायद्यान्वये आवश्यक असणाऱ्या मूल्याचा व वर्णनाचा मुद्रांक त्यावर लावलेला आहे किंवा कसे याची खातरजमा करून घेण्यासाठी तपासणी करील:

---

[१].सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ कलम ८ अन्वये "प्रत्येक व्यक्ती" या शब्दां-ऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२].वरील अधिनियमाच्या कलम २०-अ (एक) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३].वरील अधिनियमाच्या कलम २०-अ (दोन) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

परंतु,—

(अ) कोणत्याही दंडाधिकाऱ्याला किंवा फौजदारी न्यायालयाच्या कोणत्याही न्यायाधीशाला [1][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे प्रकरण नऊ किंवा प्रकरण दहाचा भाग (ब)] खालील कार्यवाहीखेरीज अन्य कोणत्याही कार्यवाहीच्या ओघात त्याच्यापुढे येणाऱ्या कोणत्याही संलेखाची तपासणी करणे किंवा तो अवरुद्ध करणे योग्य वाटत नसेल तर, यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे ते आवश्यक आहे असे मानले जाणार नाही; १९७४ चा २.

(ब) एखाद्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाच्या बाबतीत, या कलमाखाली कोणत्याही संलेखाची तपासणी करण्याचे व तो अवरुद्ध करण्याचे काम ते न्यायालय याबाबतीत नेमील अशा अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येईल;

(३) या कलमाच्या प्रयोजनाकरिता, शंकास्पद बाबतीत—

(अ) कोणती कार्यपदे ही लोककार्यपदे असल्याचे मानण्यात यावे हे राज्य शासनाला निर्धारित करता येईल; आणि

(ब) कोणत्या व्यक्ती लोककार्यपदांच्या प्रभारी व्यक्ती असल्याचे मानन्यात यावे हे राज्य शासनाला निर्धारित करता येईल.

नोंदणी झाल्यानंतर संलेख अवरुद्ध करून ठेवणे.

[2][३३-अ. रीतसर मुद्रांकित न केलेला कोणताही संलेख चुकीने किंवा अन्यथा नोंदणी अधिनियम, १९०८ खाली नोंदवण्यात आलेला असेल तर, नोंदणी अधिकाऱ्यास पक्षकाराकडून मूळ संलेख मागवून घेता येईल व पक्षकारास आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि कारणे लेखी नमूद करून त्याची एक प्रत पक्षकारास देऊन, तो अवरुद्ध करून ठेवता येईल. पक्षकाराने असा मूळ संलेख सादर न केल्यास, नोंदणी अभिलेखातून घेण्यात आलेली अशा संलेखाची सत्य प्रत ही या कलमाच्या प्रयोजनार्थ संलेखाची मूळ प्रत असल्याचे मानण्यात येईल.] १९०८ चा १६.

रीतसर मुद्रांकित नसलेले संलेख हे, पुराव्यात अस्वीकारार्ह असणे, इत्यादी.

३४. शुल्क आकारण्यास पात्र असा [1][कलम ३२-अ, पोटकलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेला कोणताही संलेख नसेल असा] कोणताही संलेख रीतसर मुद्रांकित केलेला नसेल तर कायद्याने किंवा पक्षकारांच्या संमतीने पुरावा स्वीकारण्याचा प्राधिकार असलेल्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही प्रयोजनाकरिता तो पुरावा म्हणून स्वीकारता येणार नाही, किंवा अशा कोणत्याही व्यक्तीला किंवा कोणत्याही लोककार्य अधिकाऱ्याला त्या संबंधात कोणतीही कार्यवाही करता येणार नाही किंवा त्याची नोंदणी करता येणार नाही किंवा तो अधिप्रमाणित करता येणार नाही :

परंतु,—

[4][(अ)] असा कोणताही संलेख,—

(एक) त्याच्यावर आकारण्यायोग्य असे शुल्क भरल्यानंतर, किंवा अपुरे मुद्रांक लावलेल्या संलेखाच्या बाबतीत असे शुल्क भरून काढण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम भरल्यानंतर, आणि

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २० (ब) अन्वये "फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ याचे प्रकरण बारा किंवा प्रकरण छत्तीस" या शब्दांऐवजी हे शब्द, आकडे व अक्षरे दाखल करण्यात आली.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २१ अन्वये कलम ३३-अ समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ९ अन्वये हे कंस, शब्द, आकडे व अक्षरे समाविष्ट करण्यात आली.

[4] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २२ (अ) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (अ) दाखल करण्यात आला.

(दोन) पाच रुपये किंवा शुल्काच्या कमी पडलेल्या भागाच्या दहा पटीइतकी रक्कम, यापैकी जी अधिक असेल तेवढ्या रकमेची शास्ती भरल्यानंतर,

सर्व योग्य अपवादांच्या अधीनतेने पुराव्यात स्वीकारला जाईल.]

(ब) जेव्हा कोणत्याही प्रकाराची संविदा किंवा करार दोन किंवा अधिक पत्रांचा समावेश असलेल्या पत्रव्यवहाराद्वारे झाला असेल, आणि त्या पत्रांपैकी कोणत्याही एका पत्रावर योग्य मुद्रांक लावलेला असेल, तेव्हा ती संविदा किंवा तो करार रीतसर मुद्रांकित असल्याचे मानले जाईल;

१९७४ चा २. (क) यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे [1][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे प्रकरण नऊ किंवा प्रकरण दहाचा भाग (घ)] याखालील कार्यवाहीहून अन्य, फौजदारी न्यायालयातील इतर कोणत्याही कार्यवाहीत कोणताही संलेख पुराव्यात स्वीकारण्यास प्रतिबंध होणार नाही;

(ड) यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, जेव्हा एखादा संलेख सरकारने किंवा सरकारच्या वतीने निष्पादित केलेला असेल तेव्हा किंवा अशा संलेखाला या अधिनियमाच्या कलम ३२ अन्वये किंवा इतर कोणत्याही उपबंधांनुसार तरतूद केल्याप्रमाणे जिल्हाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र लावलेले असेल तेथे असा संलेख कोणत्याही न्यायालयात स्वीकारला जाण्यास प्रतिबंध होणार नाही;

[2][(ई) खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे मुद्रांक शुल्क किंवा मुद्रांक शुल्काचा कमी पडणारा भाग आणि शास्ती भरण्यात आली तर, यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे, कोणत्याही संलेखाची प्रत स्वीकारली जाण्यास किंवा कोणत्याही संलेखातील मजकूर तोंडी स्वरूपात स्वीकारला जाण्यास प्रतिबंध होणार नाही.]

**संलेखाचा स्वीकार केव्हा प्रश्नास्पद करता येणार नाही.**

३५. एखादा संलेख पुराव्यात स्वीकारण्यात आला असेल तेव्हा त्याबाबतीत, कलम ५८ मध्ये तरतूद केली असेल तेवढे सोडून एरव्ही अशी स्वीकृती, तो संलेख रीतसर मुद्रांकित केलेला नाही या कारणास्तव त्याच दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर प्रश्नास्पद केली जाणार नाही.

**अयोग्यरीत्या मुद्रांकित केलेले संलेख स्वीकृत करणे.**

३६. जेव्हा एखाद्या संलेखावर, पुरेशा रकमेचा पण अयोग्य वर्णनाचा मुद्रांक लावलेला असेल तेव्हा त्या संलेखावर आकारणीपात्र असे शुल्क भरल्यावर तो रीतसर मुद्रांकित असल्याचे प्रमाणित करण्यात येईल आणि याप्रमाणे प्रमाणित केलेला कोणताही संलेख, त्यानंतर निष्पादनाच्या तारखेपासून रीतसर मुद्रांकित झाला असल्याचे मानले जाईल, अशी तरतूद करणारे नियम राज्य शासनास करता येतील.

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २२ (ब) अन्वये "फौजदारी व्यवहार संहिता १८९८ चे प्रकरण बारा किंवा प्रकरण छत्तीस" हे शब्द व आकडे याऐवजी हे शब्द, आकडे व अक्षरे दाखल करण्यात आली.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २२ (क) अन्वये खंड (ई) जादा दाखल करण्यात आला.

अवरुद्ध करून ठेवलेल्या संलेखांच्या संबंधात काय कार्यवाही करावी.

३७. (१) कलम ३३ खाली संलेख अवरुद्ध करून ठेवणाऱ्या व्यक्तीस कायद्याने किंवा पक्षकाराच्या संमतीने पुरावा स्वीकारण्याचा प्राधिकार असेल आणि ती व्यक्ती कलम ३४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे शास्ती किंवा कलम ३६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे शुल्क दिल्यावर असा संलेख पुराव्यात स्वीकारील, तेव्हा त्या संलेखाची अधिप्रमाणित प्रत व त्याबरोबर त्या संलेखांबाबत बसवलेल्या शुल्काची व शास्तीची रक्कम नमूद करणारे एक लेखी प्रमाणपत्र ती जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील आणि अशी रक्कम जिल्हाधिकाऱ्याकडे किंवा तो याबाबतीत नेमील अशा व्यक्तीकडे पाठवील.

[1][(२) अन्य प्रत्येक प्रकरणी अशाप्रकारे मूळ संलेख अवरुद्ध करून ठेवणारी व्यक्ती, अशा संलेखाची एक अधिप्रमाणित प्रत तयार करील आणि तो संलेख म्हणजे कलम ३१ मध्ये, निर्देशित करण्यात आलेली सत्य प्रत किंवा गोषवारा असेल किंवा कलम ३३-अ मध्ये निर्देश केलेली सत्य प्रत असेल त्या बाबतीत, ती व्यक्ती यथास्थिति अशी अधिप्रमाणित प्रत किंवा सत्य प्रत किंवा गोषवारा, यथास्थिति, त्या अधिप्रमाणित प्रतीवर किंवा सत्य प्रतीवर किंवा त्या गोषवाऱ्यावर, जणू काही तो मूळ संलेख असावा त्याप्रमाणे कार्यवाही करण्याच्या आणि यथास्थिति, कलम ३९, पोटकलम (१), खंड (अ) खालील किंवा कलम ४१, पोटकलम (१) खालील संलेखाच्या संबंधात प्रमाणपत्र नमूद करण्याच्या प्रयोजनासाठी, जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील. यथास्थिति, अधिप्रमाणित प्रत, सत्य प्रत किंवा गोषवारा, त्यावर, उपरोक्तप्रमाणे प्रमाणपत्र पृष्ठांकित करून मिळाल्यावर मूळ संलेख जिने अवरुद्ध करून ठेवलेला असेल ती व्यक्ती, अधिप्रमाणित प्रतीवर पृष्ठांकित केलेले प्रमाणपत्र मूळ संलेखावर नकलून घेईल आणि, असे प्रमाणपत्र अधिप्रमाणित करील; आणि सत्य प्रतीवर किंवा गोषवाऱ्यावर उपरोक्तप्रमाणे प्रमाणपत्र पृष्ठांकित करण्यात आलेले असेल त्याबाबतीत, ज्याने सत्यप्रत किंवा गोषवारा अग्रेषित केला होता तो नोंदणी अधिकारी, त्याने ठेवलेल्या संबंधित नोंदवहीत तो संलेख ज्या संलेखाची सत्य प्रत किंवा गोषवारा असेल त्या संलेखाच्या संबंधात, योग्य त्या नोंदी करील आणि त्याबाबतीत अर्ज करण्यात आल्यावर तो, त्या संलेखाच्या संबंधात यथास्थिति उचित शुल्क किंवा उचित शुल्क व शास्ती (प्रत्येकाची रक्कम नमूद करून) आकारण्यात आलेली आहे अशा अर्थाचे आणि असे शुल्क व शास्ती देणाऱ्या व्यक्तीचे नाव आणि निवासस्थान नमूद करून आपल्या सहीचे एक प्रमाणपत्र देईल.]

कलम ३७ पोटकलम (१) खाली दिलेली शास्तीची रक्कम परत करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

३८. (१) जेव्हा एखाद्या संलेखाची प्रत कलम ३७, पोट-कलम (१) खाली जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविली असेल तेव्हा तो, त्यास योग्य वाटल्यास, अशा संलेखाबद्दल पाच रुपयांहून अधिक दिलेल्या शास्तीचा कोणताही भाग परत करू शकेल.

(२) जेव्हा असा संलेख, केवळ तो कलम १३ किंवा कलम १४ याचे उल्लंघन करून लिहिण्यात आलेला आहे एवढ्याच कारणासाठी अवरुद्ध करून ठेवलेला असेल तेव्हा जिल्हाधिकारी, याप्रमाणे दिलेली संपूर्ण शास्तीची रक्कम परत करू शकेल.

अवरुद्ध करून ठेवलेले संलेख मुद्रांकित करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

३९. (१) जो वीस पैसे किंवा त्याहून कमी शुल्क आकारण्यास पात्र नसेल असा कोणताही संलेख जेव्हा जिल्हाधिकाऱ्यांने कलम ३३ खाली अवरुद्ध करून ठेवलेला असेल किंवा कलम ३७, पोट-कलम (२) खाली त्याच्याकडे पाठविलेला तसा कोणताही संलेख स्वीकृत केला असेल तेव्हा तो खालील कार्यपद्धतीचा अवलंब करील :—

(अ) असा संलेख रीतसर मुद्रांकित केलेला आहे, किंवा तो शुल्क आकारण्यास पात्र नाही असे त्याचे मत असेल तर, यथास्थिति, तो संलेख रीतसर मुद्रांकित आहे किंवा तो शुल्क आकारण्यास पात्र नाही, असे तो त्यावर पृष्ठांकनाद्वारे प्रमाणित करील ;

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २३ अन्वये मूळ पोटकलमाऐवजी पोटकलम (२) दाखल करण्यात आले.

(ब) जर असा संलेख शुल्क आकारणीस पात्र आहे व तो रीतसर मुद्रांकित नाही, असे त्याचे मत असेल, तर, तो योग्य शुल्क किंवा ते पूर्ण करण्यासाठी लागणारी रक्कम पाच रुपयांच्या शास्तीसह भरण्यास, किंवा त्यास योग्य वाटल्यास, उचित शुल्काच्या रकमेच्या किंवा तिच्या अपुऱ्या भागाच्या दहापटीहून अधिक नसेल इतकी रक्कम, मग ती रक्कम पाच रुपयांहून अधिक होत असो वा कमी होत असो, भरण्यास फर्मावील:

परंतु, जेव्हा असा संलेख केवळ तो कलम १३ किंवा कलम १४ चे उल्लंघन करून लिहिण्यात आलेला आहे, एवढ्याच कारणासाठी अवरुद्ध करून ठेवण्यात आला असेल, तेव्हा जिल्हाधिकारी, त्यास योग्य वाटल्यास, या कलमाद्वारे विहित केलेली संपूर्ण शास्ती माफ करू शकेल.

(२) पोटकलम (१) खंड (अ) खालील [1][प्रत्येक प्रमाणपत्र, हे कलम ५३-अ च्या तरतुदींच्या अधीनतेने] या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता त्यात नमूद केलेल्या बाबींचा निर्णायक पुरावा असेल.

(३) एखादा संलेख कलम ३७ पोट-कलम (२) खाली जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवण्यात आला असेल त्याबाबतीत, जिल्हाधिकारी, या कलमाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे त्यावर कार्यवाही केल्यावर तो संलेख अवरुद्ध करून ठेवणाऱ्या अधिकाऱ्याकडे परत पाठवील.

**अभावितपणे रीतसर मुद्रांकित न केलेले संलेख.**

४०. जर वीस पैसे किंवा कमी शुल्क आकारण्यास पात्र नसणारा कोणताही संलेख शुल्क आकारणीस पात्र असून रीतसर मुद्रांकित केलेला नसेल, आणि तो निष्पादित करून दिल्याच्या किंवा प्रथम निष्पादित करून दिल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत कोणत्याही व्यक्तीने, स्वत होऊन जिल्हाधिकाऱ्याकडे हजर केला असेल आणि अशा व्यक्तीने, तो संलेख रीतसर मुद्रांकित केलेला नाही ही वस्तुस्थिती, जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली असेल व योग्य शुल्क किंवा ते पूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम जिल्हाधिकाऱ्यास देऊ केली असेल आणि तो संलेख अभावितपणे, चुकीमुळे किंवा अत्यंत निकडीमुळे रीतसर मुद्रांकित करण्याचा राहून गेला आहे, अशी जर ज़िल्हाधिकाऱ्यांची खात्री पटली असेल, तर, त्यास कलम ३३ आणि कलम ३९ खाली कार्यवाही करण्याऐवजी अशी रक्कम स्वीकारून यापुढे विहित केल्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**ज्या संलेखांवर कलम ३४, ३९ किंवा ४० खाली शुल्क भरलेले असेल त्यांवर पृष्ठांकन करणे.**

४१. (१) जेव्हा [2][(कलम ३२-अ, पोटकलम (१) मध्ये निदश करण्यात आलेला कोणताही संलेख नसेल अशा)] एखाद्या संलेखाच्या बाबतीत द्यावयाचे शुल्क व शास्ती (कोणतीही असल्यास) ही कलम ३४, कलम ३९ किंवा कलम ४० खाली भरण्यात आली असेल तेव्हा, यथास्थिति, तो संलेख पुराव्यात स्वीकारणारी व्यक्ती, किंवा जिल्हाधिकारी, त्यावर पृष्ठांकन करून, त्या संलेखाबाबत उचित शुल्क किंवा यथास्थिति, उचित शुल्क व शास्ती (प्रत्येकाची रक्कम नमूद करून) आकारण्यात आल्याचे प्रमाणित करील आणि ती भरणाऱ्या व्यक्तीचे नाव व राहण्याचे ठिकाण नमूद करील.

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २४ अन्वये "प्रत्येक प्रमाणपत्र" या शब्दाऐवजी हे कंस, शब्द, आकडे व अक्षरे दाखल करण्यात आली.

[2] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम १० अन्वये हे कंस, शब्द, आकडे व अक्षरे समाविष्ट करण्यात आले.

(२) याप्रमाणे पृष्ठांकन केलेला [1][प्रत्येक संलेख, कलम ५३-अ च्या तरतुदींच्या अधीनतेने] संलेख त्यानंतर पुराव्यात स्वीकार्य असेल, आणि तो जणू काही रीतसर मुद्रांकित करण्यात आलेला होता अशा रीतीने त्याची नोंद करता येईल व त्याच्या आधारे कार्यवाही करता येईल, तसेच तो अधिप्रमाणित करता येईल [2][आणि याबाबतीत अर्ज करण्यात आल्यानंतर, जिने तो सादर केला असेल त्या व्यक्तीच्या किंवा तो ज्या व्यक्तींच्या ताब्यातून अवरुद्ध करून ठेवणाऱ्या अधिकाऱ्याकडे आला असेल त्या व्यक्तींच्या, किंवा अशा व्यक्तींने दिलेल्या निदेशांनुसार अन्य कोणत्याही व्यक्तींच्या स्वाधीन करण्यात येईल :]

परंतु,—

(अ) कलम ३४ खाली शुल्क आणि शास्ती भरल्यावर जो, पुराव्यात स्वीकारण्यात आला आहे असा कोणताही संलेख, अशा रीतीने अवरुद्ध करून ठेवल्याच्या तारखेपासून एक महिन्याचा अवधी संपण्यापूर्वी किंवा जर तो आणखी अवरुद्ध करून ठेवणे आवश्यक आहे असे जिल्हाधिकाऱ्यांने प्रमाणित केले असेल व ते प्रमाणपत्र त्याने रद्द केले नसेल तर, याप्रमाणे स्वाधीन केला जाणार नाही ;

(ब) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, अनुसूची एक मधील आदेश तेरा च्या नियम ९ च्या तरतुदींस बाध येणार नाही. १९०८ चा५.

मुद्रांक कायद्याविरुद्धच्या अपराधाबद्दल खटला भरणे.

४२. कोणत्याही संलेखाच्या बाबतीत या प्रकरणाखाली कार्यवाही करण्यामुळे किंवा शास्ती भरण्यामुळे, ज्या व्यक्तीने अशा संलेखाच्या संबंधात मुद्रांक कायद्याविरुद्ध एखादा अपराध केल्याचे आढळून येईल, त्या कोणत्याही व्यक्तीवर खटला भरण्यास प्रतिबंध होणार नाही :

परंतु, ज्याबाबत शास्ती भरण्यात आली आहे, अशा कोणत्याही संलेखाच्या बाबतीत योग्य शुल्क भरण्याची टाळाटाळ करण्याच्या उद्देशाने तो अपराध केला गेला आहे असे जिल्हाधिकाऱ्यास दिसून आल्यावाचून अशा प्रकारचा कोणताही खटला दाखल करण्यात येणार नाही.

शुल्क किंवा शास्ती भरणाऱ्या व्यक्तींना ती विवक्षित बाबतीत वसूल करता येईल.

४३. (१) जेव्हा एखाद्या संलेखाच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीने कलम ३४, कलम ३६, कलम ३९ किंवा ४० खाली कोणतेही शुल्क किंवा शास्ती भरलेली असेल आणि जेव्हा कराराद्वारे किंवा कलम ३० च्या तरतुदींखाली किंवा असा संलेख निष्पादित करून देतेवेळी अंमलात असणाऱ्या इतर कोणत्याही अधिनियमितीच्या अनुसार एखादी अन्य व्यक्ती अशा संलेखासाठी योग्य मुद्रांकाची तरतूद करण्याचा खर्च करण्यास बांधली गेलेली असेल, तेव्हा प्रथम उल्लेखिलेल्या व्यक्तीला याप्रमाणे भरलेल्या शुल्काची किंवा शास्तीची रक्कम अशा अन्य व्यक्तीकडून वसूल करण्याचा हक्क असेल.

(२) अशी रक्कम वसूल करण्याच्या प्रयोजनाकरिता अशा संलेखाच्या संबंधात या अधिनियमाखाली देण्यात आलेले कोणतेही प्रमाणपत्र, त्यात प्रमाणित केलेल्या विषयांचा निर्णायक पुरावा असेल.

(३) अशी रक्कम, न्यायालयास योग्य वाटल्यास, ज्या दाव्यात अशा व्यक्ती पक्षकार असतील आणि त्यात असा संलेख पुराव्यात दिला असेल, अशा कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत लागलेल्या परिव्ययाबाबतच्या कोणत्याही आदेशात समाविष्ट करता येईल. जर न्यायालयाने [3][कारणे लेखी नमूद करून] त्या कारणास्तव ती रक्कम अशा आदेशात समाविष्ट केली नाही तर, ती रक्कम वसूल करण्यासाठी आणखी कोणतीही कार्यवाही करता येणार नाही.

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २५ (अ) अन्वये "प्रत्येक लेख" या शब्दांऐवजी हे शब्द, आकडे व अक्षर दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २५ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २६ अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

४४. (१) जेव्हा कलम ३४ किंवा कलम ३९ खाली कोणतीही शास्ती भरलेली असेल, तेव्हा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, ती भरल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत लेखी अर्ज करण्यात आल्यावर, अशी शास्ती संपूर्णतः किंवा अंशतः परत करू शकेल. विवक्षित बाबतीत शास्ती किंवा जादा शुल्क परत करण्याचा महसूल प्राधिकाऱ्याचा अधिकार.

(२) जेव्हा कायद्याने आकारणीयोग्य असलेल्या मुद्रांक शुल्कापेक्षा अधिक शुल्क कलम ३४ किंवा कलम ३९ खाली आकारण्यात आलेले असून ते भरण्यात आले आहे, असे मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याचे मत असेल, तेव्हा असा प्राधिकारी, संबंधित पक्षकाराने ते शुल्क आकारण्याचा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून [१][एक वर्षाच्या] आत लेखी अर्ज केल्यावर, अधिक असेल तेवढे शुल्क परत करू शकेल.

४५. (१) जर कलम ३७, पोट-कलम (२) खाली जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविलेला कोणताही संलेख, मध्येच गहाळ झाला असेल, नष्ट झाला असेल किंवा खराब झाला असेल तर तो संलेख, गहाळ झाल्याबद्दल, नष्ट झाल्याबद्दल किंवा खराब झाल्याबद्दल असा संलेख पाठविणारी व्यक्ती उत्तरदायी असणार नाही. कलम ३७ खाली पाठवलेले संलेख गहाळ झाल्याबद्दल दायित्व नसणे.

(२) जेव्हा कोणताही संलेख याप्रमाणे पाठवला जाण्याच्या बेतात असेल, तेव्हा तो अवरुद्ध करून ठेवणाऱ्या व्यक्तीच्या हाती ज्या व्यक्तीच्या कब्जातून आला असेल, त्या व्यक्तीला, आपल्या खर्चाने, अशा संलेखाची प्रत तयार करण्यात यावी व तो अवरुद्ध करून ठेवणाऱ्या व्यक्तीने ती अधिप्रमाणित करावी अशी मागणी करता येईल.

४६. या प्रकरणाखाली भरावी लागणारी सर्व शुल्के, शास्ती व इतर रकमा, ज्या व्यक्तीकडून त्या येणे असतील, त्या व्यक्तीच्या जंगम मालमत्तेवर टाच आणून व ती विकून, किंवा जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, जिल्हाधिकाऱ्यास वसूल करता येतील. शुल्के व शास्ती यांची वसुली.

## प्रकरण पाच

## विवक्षित प्रकरणात मुद्रांकाबाबत सवलती देणे

४७. आवश्यक असलेल्या पुराव्याबाबत किंवा करावयाच्या चौकशीबाबत राज्य शासन करील अशा नियमांच्या अधीनतेने, जिल्हाधिकाऱ्यास, कलम ४८ मध्ये विहित केलेल्या कालावधीच्या आत त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यावर व वस्तुस्थितीबद्दल त्याची खात्री झाल्यास, यापुढे उल्लेखिलेल्या प्रकरणी खराब झालेल्या उमटमुद्रांकांच्या बाबतीत सवलत देता येईल:— खराब झालेल्या मुद्रांकांबाबत सवलत देणे.

(अ) कोणत्याही कागदावर लिहिलेला कोणताही संलेख कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करून देण्यापूर्वी, अशा कागदावरील, अनवधानामुळे व अहेतुकपणे खराब झालेला, अस्पष्ट झालेला किंवा लेखनप्रमादामुळे किंवा अन्यथा नियोजित प्रयोजनासाठी अयोग्य ठरलेला मुद्रांक;

(ब) जो पूर्णतः किंवा अंशतः लिहिलेला आहे, परंतु तत्संबंधी कोणत्याही पक्षाने सही केलेली नाही किंवा जो निष्पादित करून दिलेला नाही, अशा कोणत्याही दस्तऐवजावरील मुद्रांक;

(क) जो संलेख तत्संबंधी कोणत्याही पक्षाने निष्पादित करून दिलेला असून, तो—

(१) सुरुवातीपासून कायद्याने सर्वथा शून्य असल्याचे [२][पक्षाला] नंतर आढळून आले असेल ;

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २७ अन्वये "तीन महिन्यांच्या" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २८ (अ) (एक) अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[१][(१-अ) विनिर्दिष्ट अनुतोष अधिनियम, १९६३ च्या कलम ३१ खाली सुरूवातीपासून सर्वथा शून्य असल्याचे, न्यायालयाला नंतर आढळून आले असेल;] १९६३ चा ४७.

(२) त्यामधील कोणत्याही त्रुटीमुळे किंवा चुकीमुळे मूळ नियोजित प्रयोजनासाठी अपात्र असल्याचे नंतर आढळून आले असेल;

(३) तो ज्या कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करणे आवश्यक आहे ती व्यक्ती, तो निष्पादित न करताच मरण पावल्यामुळे किंवा अशा कोणत्याही व्यक्तीने तो निष्पादित करण्यास नकार दिल्यामुळे नियोजित संव्यवहार संकल्पित स्वरूपात घडवून आणण्याच्या दृष्टीने पूर्ण करता येत नसेल;

(४) एखाद्या महत्त्वाच्या पक्षाने निष्पादित न केल्यामुळे व त्यावर सही करण्यास तो असमर्थ असल्यामुळे किंवा नकार देत असल्यामुळे, नियोजित प्रयोजनासाठी तो वस्तुत: अपूर्ण व अपर्याप्त असेल;

(५) कोणत्याही व्यक्तीने त्याखाली कृती करण्यास किंवा त्याद्वारे प्रतिभूत करावयाचे योजिलेला कोणताही पैसा देण्यास नकार दिल्यामुळे, किंवा, त्याद्वारे देण्यात आलेले कोणतेही पद नाकारल्यामुळे किंवा त्याचा स्वीकार न केल्यामुळे नियोजित प्रयोजन सर्वथा फसले असेल;

(६) त्याद्वारे जो संव्यवहार घडवून आणण्याचे योजिले असेल तो संव्यवहार त्याच पक्षांच्या दरम्यान झालेल्या व त्यापेक्षा कमी मूल्य नसलेला एखादा मुद्रांक लावलेल्या कोणत्याही अन्य संलेखाद्वारे घडवून आणल्यामुळे निरुपयोगी होत असेल;

(७) अपुऱ्या मूल्याचा असेल आणि त्याद्वारे जो संव्यवहार घडवून आणण्याचे योजिले असेल तो संव्यवहार त्याच पक्षांच्या दरम्यान व त्यापेक्षा कमी मूल्य नसलेला एखादा मुद्रांक लावलेल्या कोणत्याही इतर संलेखाद्वारे घडवून आणला असेल;

(८) तो अनवधानामुळे आणि अहेतुकपणे खराब झाला असेल आणि त्याच्याऐवजी त्याच पक्षांच्या दरम्यान व त्याच प्रयोजनासाठी रीतसर मुद्रांकित दुसरा संलेख निष्पादित करून दिलेला असेल;
त्या कोणत्याही संलेखासाठी वापरलेला मुद्रांक :

परंतु, [२][उप-खंड (१-अ) याखाली येणारा संलेख सोडून] एखाद्या निष्पादित करून दिलेल्या संलेखाच्या बाबतीत ज्या कार्यवाहीमध्ये तो संलेख पुराव्यात देता किंवा देऊ करता आला असता, अथवा दिला किंवा देऊ केला असता अशी कोणतीही कायदेविषयक कार्यवाही सुरू करण्यात आलेली नसावी आणि तो संलेख रद्द करण्यासाठी दिला गेलेला असावा [३][किंवा रद्द करण्यासाठी त्याआधीच न्यायालयाच्या स्वाधीन केलेला असावा.]

**स्पष्टीकरण** :—संलेखावर जेवढे शुल्क आकारणीयोग्य असेल ते पूर्ण भरण्यात आल्याबद्दलचे कलम ३२ खालील जिल्हाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, या कलमाच्या अर्थांतर्गत उमटमुद्रांक होय.

---

[१] सन १९८५ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २८ (अ) (दोन) अन्वये खंड (१-अ) समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २८ (ब) (एक) अन्वये हे शब्द, कंस, आकडे व अक्षर समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २८ (ब) (दोन) अन्वये "रद्द करण्यासाठी" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

४८. कलम ४७ खाली सूटमोकळ मिळविण्यासाठी खाली दिलेल्या कालावधीत अर्ज करण्यात येईल.—— कलम ४७ खाली सूट-मोकळ मिळण्यासाठी अर्ज केव्हा करावा.

(१) खंड (क) (५) मध्ये उल्लेखिलेल्या प्रकरणांत संलेखाच्या तारखेपासून [१][सहा महिन्यांच्या] आत ;

[२][(२) ज्या संलेखाच्या बदली दुसरा संलेख निष्पादित करून देण्यात आलेला असेल, असा कोणताही संलेख अपरिहार्य परिस्थितीमुळे रद्द करण्यासाठी सोडून देता येत नसेल त्याबाबतीत, बदली संलेख निष्पादित करून दिल्याच्या तारखेनंतर, सहा महिन्यांच्या आत ;

(३) कोणत्याही अन्य बाबतीत, मुद्रांक खरेदी केल्याच्या तारखेपासून [३][सहा महिन्यांच्या] आत.]

४९. मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्यास किंवा मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याने याबाबतीत अधिकार प्रदान केला असेल तर जिल्हाधिकाऱ्यास कोणत्याही, बँक व्यवसायीने किंवा कायद्याने संस्थापित अशा कोणत्याही कंपनीने किंवा इतर निगम निकायाने संलेखाच्या छापील नमुन्यासाठी वापरलेल्या मुद्रांकित कागदांच्या बाबतीत कोणत्याही पुरेशा कारणासाठी अशा नमुन्याची उक्त बँक व्यवसायीला, कंपनीला किंवा निगम निकायाला आवश्यकता राहिलेली नसेल तर सवलत देता येईल, याला कालमर्यादा नाही: परंतु, अशा मुद्रांकित कागदांच्या बाबतीत शुल्क रीतसर भरले असल्याबद्दल अशा प्राधिकाऱ्याची खात्री पटली पाहिजे. निगमांना पुढे जरूरी नसलेल्या छापील नमुन्यांच्या बाबतीत सवलत.

५०. (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीने, शुल्क आकारण्यास पात्र अशा कोणत्याही संलेखाकरिता या अधिनियमाखाली केलेल्या नियमांमध्ये अशा संलेखाकरिता विहित केले असेल त्या वर्णनाहून अन्य वर्णनाचा एखादा मुद्रांक किंवा आवश्यक असेल त्याहून अधिक मूल्याचा एखादा मुद्रांक अनवधानाने वापरला असेल किंवा कोणतेही शुल्क आकारण्यास पात्र नसलेल्या एखाद्या संलेखासाठी एखादा मुद्रांक अनवधानाने वापरला असेल तेव्हा; किंवा चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांबाबत सवलत.

(२) जेव्हा एखाद्या संलेखासाठी वापरलेला मुद्रांक हा, अशा प्रकारचा संलेख, कलम १३ च्या तरतुदीचे उल्लंघन करून लिहिण्यात आल्याकारणाने, कलम १५ खाली अनवधानाने निरूपयोगी झाला असेल तेव्हा; जिल्हाधिकाऱ्यांस, ज्या संलेखाच्या तारखेपासून [४][सहा महिन्यांच्या]आत किंवा जर त्यावर तारीख नसेल तर, त्या व्यक्तीने तो प्रथमतः किंवा एकटीनेच निष्पादित करून दिला असेल तिने तो निष्पादित करून दिल्याच्या तारखेनंतर [४][सहा महिन्यांच्या] आत अर्ज करण्यात आल्यानंतर आणि तो संलेख शुल्क आकारण्यास पात्र असल्यास, त्यावर योग्य शुल्काचे मुद्रांक पुन्हा लावल्यानंतर याप्रमाणे चुकीचा वापर केलेला किंवा निरुपयोगी झालेला मुद्रांक हा खराब झालेला मुद्रांक म्हणून रद्द करता येईल व त्याबाबत सवलत देता येईल.

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २९ (अ) अन्वय " दोन महिन्यांच्या " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २९ (ब) अन्वये मूळ खंड (२) व (३) आणि त्याचे परंतुक याऐवजी खंड (२) व (३) दाखल करण्यात आले.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ४ अन्वये "एक वर्षाच्या" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ५ अन्वये "एक वर्षाच्या" या शब्दांऐवजी, हे शब्द दाखल करण्यात आले.

खराब झालेल्या किंवा चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकांबाबत सवलत कशी द्यावी.

[1][५१. खराब झालेल्या मुद्रांकांच्या संबंधात कलम ४७ खाली किंवा चुकीचा वापर केलेल्या मुद्रांकाच्या संबंधात कलम ५० खाली किंवा पुढे आवश्यकता नसलेल्या छापील नमुन्याच्या संबंधात कलम ४९ खाली सवलत द्यावयाची असेल, अशा कोणत्याही बाबतीत जिल्हाधिकारी त्याऐवजी,—

(अ) मुद्रांकांच्या एकूण मूल्यातून [2][राज्य शासनाकडून त्याबाबतीत तयार करण्यात आलेल्या नियमांनुसार विहित करण्यात येईल अशी रक्कम] वजा करून पैशाच्या स्वरूपात तितकेच मूल्य; किंवा

(ब) अर्जदाराला तशी आवश्यकता असल्यास, त्याच वर्णनाचे व मूल्याचे अन्य मुद्रांक; किंवा

(क) अर्जदाराला तशी आवश्यकता असल्यास, इतर कोणत्याही वर्णनाचे तेवढयाच मूल्याचे मुद्रांक

देऊ शकेल :

परंतु, खंड (ब) आणि (क) च्या कक्षेत येणाऱ्या प्रकरणी, राज्य शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल असा लेखनसामग्री खर्चही, खराब झालेले अथवा चुकीचा वापर केलेले जे मुद्रांकित कागद परत करण्यात आले असतील, त्यांच्या बाबतीत वसूल करण्यात येईल.]

वापरासाठी न लागणाऱ्या मुद्रांकांबाबत सवलत.

५२. जेव्हा कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात जो खराब झालेला नाही किंवा नियोजित प्रयोजनाच्या दृष्टीने अपात्र किंवा निरुपयोगी ठरलेला नाही असा किंवा असे मुद्रांक असतील, परंतु, त्याचा किंवा त्यांचा त्या व्यक्तीला लगच उपयोग नसेल तेंव्हा जिल्हाधिकारी हा, अशा व्यक्तीला, [3][राज्य शासनाकडून त्यांबाबतीत तयार करण्यात आलेल्या नियमांनुसार विहित करण्यात येईल अशी रक्कम] त्या मुद्रांकाच्या किंवा मुद्रांकांच्या एकूण मूल्यातून वजा करून अशा एक अथवा अधिक मुद्रांकांचे मल्य पैशाच्या रूपाने परत करील. मात्र अशा व्यक्तीला असे मुद्रांक रद्द करण्याकरिता स्वाधीन करावे लागतील आणि जिल्हाधिकाऱ्याचे समाधान होईल, अशा रीतीने असे सिद्ध करावे लागल की,—

(अ) अशा व्यक्तीने असा किंवा असे मुद्रांक त्यांचा वापर करण्याच्या खऱ्याखुऱ्या उद्देशाने विकत घेतले होते ; आणि

(ब) तिने त्याची किंवा त्यांची पूर्ण रक्कम भरली आहे ; आणि

(क) ते ज्या तारखेस याप्रमाणे स्वाधीन करण्यात आले होते त्या तारखेच्या लगतपूर्वीच्या [4][सहा महिन्यांच्या] कालावधीच्या आत ते याप्रमाणे विकत घेण्यात आलेले होते :

परंतु, जेथे, ती व्यक्ती लायसनधारक मुद्रांक विक्रेती असेल तेथे जिल्हाधिकारी, त्याला योग्य वाटल्यास त्या मुद्रांक विक्रेत्या व्यक्तीने प्रत्यक्ष भरलेली रक्कम तीमधून पूर्वोक्तप्रमाणे कोणतीही कपात न करता परत करू शकेल.

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३१ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ५१ दाखल करण्यात आले.

[2] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ६ अन्वये "दर रुपयामागे" या मजकुराने सुरू होणाऱ्या व "जी कमी असेल" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ७ (१) अन्वये "प्रत्येक रुपया" या मजकुराने सुरू होणाऱ्या व "कमी असेल ती रक्कम" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ७ (२) अन्वये "एक वर्षाच्या"ऐवजी हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[१][५२-अ. (१) कलमे ४७, ५०, ५१ आणि ५२ यांत काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १०, पोट-कलम (३) खाली तरतूद केल्याप्रमाणे, मुद्रांकांद्वारे किंवा रोखीने शुल्काची रक्कम देण्यात आलेली असेल आणि शुल्काची रक्कम दहा हजार रुपयांपेक्षा अधिक होत असेल तर, जिल्हाधिकारी, खराब झालेल्या किंवा चुकीचा वापर केलेल्या किंवा वापरासाठी आवश्यक नसलेल्या मुद्रांकांच्या बाबतीत किंवा चलनाद्वारे भरलेल्या रोख रकमेच्या बाबतीत, सवलत देणार नाही तर तो आवश्यक ती चौकशी केल्यानंतर त्यावरील आपल्या अभिप्रायासह तो अर्ज मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडे अग्रेषित करील. शुल्काबाबत सवलत देणे.

(२) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी त्यानंतर सवलत देण्यात यावी किंवा नाही याबद्दल निर्णय देईल आणि रक्कम पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, अशी सवलत देऊ शकेल.

(३) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी रक्कम पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक असेल तेव्हा त्या प्रकरणावर आपला अभिप्राय देऊन असे प्रकरण शासनाला सादर करील.]

[२][५२-ब. कलम ४७, ५०, ५१ व ५२ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,— मुद्रांक विधिअग्राह्य ठरवणे व व्यावृत्ती.

(अ) जे कोणतेही मुद्रांक खरेदी केले असतील परंतु वापरण्यात आले नसतील किंवा मुंबई मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, १९८९ याच्या प्रारंभाच्या तारखेच्या (यात यापुढे जिचा निर्देश "प्रारंभाची तारीख" असा करण्यात आला आहे) लगतपूर्वीच्या दिवशी किंवा तत्पूर्वी ज्यांच्या संबंधात सवलत मागितली नसेल त्याबाबतीत, आणि असे मुद्रांक खरेदी केल्याच्या तारखेपासून प्रारंभाच्या तारखेपूर्वी सहा महिन्यांचा कालावधी लोटलेला नसेल तर, असे मुद्रांक, ते खरेदी केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी वापरता येतील किंवा या अधिनियमाच्या संबद्ध तरतुदीअन्वये सवलत मागण्याकरिता पाठविता येतील; आणि पूर्वोक्त कालावधीमध्ये अशाप्रकारे न वापरलेले किंवा न पाठवलेले मुद्रांक, हे विधिग्राह्य ठरतील. १९८९ चा महा-राष्ट्र १८.

(ब) जे मुद्रांक प्रारंभाच्या तारखेस किंवा त्यानंतर खरेदी करण्यात आलेले असतील परंतु वापरलेले नसतील अथवा खरेदीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये यांच्या बाबतीत सवलती मागितलेली नसेल असे कोणतेही मुद्रांक विधिअग्राह्य ठरतील.

## प्रकरण सहा

## निर्देश आणि पुनरीक्षण

५३. (१) [३][प्रकरण तीन], प्रकरण चार व प्रकरण पाच याखाली व कलम २७, [४][दुसऱ्या परंतुकाच्या] खंड (अ) खाली जिल्हाधिकाऱ्याला ज्या अधिकारांचा वापर करता येण्याजोगा असेल असे अधिकार सर्व प्रकरणांत मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याच्या नियंत्रणाच्या अधीन असतील : मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याचे नियंत्रण व त्याच्याकडे परिकथन पाठवणे.

[५][परंतु, या पोट-कलमात अंतर्भूत करण्यात आलेले काहीही, कलम ३२-अ, पोट-कलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या कोणत्याही संलेखाच्या संबंधात लागू होणार नाही.]

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३३ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ५२-अ दाखल करण्यात आले.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ८ अन्वये कलम ५२-ब समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३४ (अ) (एक) अन्वये हे शब्द व आकडे समाविष्ट करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३४ (अ) (दोन) अन्वये "पहिल्या परंतुकाच्या" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ११ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

(२) जर कलम ३१, कलम ३९ किंवा कलम ४० खाली कार्यवाही करणाऱ्या कोणत्याही जिल्हाधिकाऱ्यास, कोणत्याही संलेखावर शुल्क म्हणून किती रक्कम आकारणीपात्र आहे, याबाबत शंका असेल तर, त्यास त्या प्रकरणाचे परिकथन तयार करून त्यावरील आपल्या अभिप्रायासह ते मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडे निर्णयाकरिता निर्देशित करता येईल.

(३) असा प्राधिकारी [1][पक्षांना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर] त्या प्रकरणाचा विचार करून आपल्या निर्णयाची एक प्रत जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील आणि जिल्हाधिकारी अशा निर्णयानुरूप शुल्क (कोणतेही असल्यास) निर्धारित करण्याची व ते आकारण्याची कार्यवाही करील.

कलम ३२, ३९ व ४१ खालील जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयाचे पुनरीक्षण.

[2][५३-अ. (१) कलम ३२ चे पोट-कलम (३), कलम ३९ चे पोट-कलम (२) आणि कलम ४१ चे पोट-कलम (२) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकाऱ्याने चुकून किंवा अन्यथा कोणत्याही संलेखावर आकारण्याजोग्या शुल्कापेक्षा यथास्थिति कमी शुल्क आकारले असेल किंवा तो संलेख शुल्क आकारणीपात्र नाही असे त्याने ठरविले असेल तेव्हा, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी यथास्थिति, कलम ३२, ३९ किंवा कलम ४१ खालील जिल्हाधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राच्या तारखेपासून सहा वर्षाच्या आत, संबंधित पक्षकारास तो संलेख हजर करण्यास फर्मावू शकेल आणि पक्षकाराला त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्या संलेखावर कोणतेही शुल्क आकारणीपात्र आहे किंवा नाही अथवा त्यावर आकारलेले कोणतेही शुल्क कमी आहे किंवा काय याची तपासणी करू शकेल आणि कोणतेही कमी शुल्क आकारले गेले असल्यास अशी तुटीची रक्कम संबंधित पक्षकाराकडून वसूल करण्याचा आदेश देऊ शकेल. शुल्काची अशी तुटीची रक्कम देण्यात आल्यानंतर संलेखावर पृष्ठांकन करण्यात येईल.

(२) पक्षकाराने मूळ संलेख सादर करण्यात कसूर केल्यास, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी, कलम ३१ खाली किंवा कलम ३७ च्या पोट-कलम(२) खाली जिल्हाधिकाऱ्याकडे दाखल केलेल्या संलेखाच्या सत्य प्रतीच्या किंवा गोषवाऱ्याच्या आधारे कार्यवाही करील आणि अशी प्रत किंवा गोषवारा हा, या कलमाच्या प्रयोजनार्थ, मूळ संलेख असल्याचे मानण्यात येईल.]

मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडून उच्च न्यायालयाकडे पाठवण्यात येणारे प्रकरणाचे परिकथन.

५४. [3][ (१) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी,—

(अ) कलम ५३ च्या पोट-कलम (२) खाली त्याच्याकडे निर्देशित केलेल्या ;

(ब) कायदेविषयक सारभूत प्रश्न उपस्थित करून तो निर्देशित करण्यासाठी संबंधित पक्षाने प्राधिकरणाच्या मते वाजवी असेल अशा कालावधीत केलेल्या अर्जावरून ; किंवा

(क) अन्यथा त्याच्या निदर्शनास येईल अशा,

कोणत्याही प्रकरणाचे परिकथन तयार करून नेमक्या प्रश्नाची मांडणी करून त्यावरील आपल्या मतासह असे प्रकरण उच्च न्यायालयाकडे निर्देशित करू शकेल.]

(२) अशा प्रत्येक प्रकरणाचा निर्णय उच्च न्यायालयाचे तीनपेक्षा कमी नाहीत इतके न्यायाधीश करतील आणि त्यांच्यात काही मतभेद झाल्यास त्याचा निर्णय बहुमतानुसार होईल.

परिकथित प्रकरणासंबंधी अधिक तपशील मागवण्याचा उच्च न्यायालयाचा अधिकार.

५५. अशा प्रकरणात अंतर्भूत असलेली परिकथने ही, प्रकरणामुळे उपस्थित झालेल्या प्रश्नांचा निर्णय करण्यास पुरेशी आहेत, याबद्दल उच्च न्यायालयाची खात्री झाली नाही तर, उच्च न्यायालयास त्याबाबत ते निदेशित करील अशी त्यात भर घालण्यासाठी किंवा असा फेरबदल करण्यासाठी, ज्या महसूल प्राधिकाऱ्याकडून त्या प्रकरणाचे परिकथन निर्देशित करण्यात आले होते त्याच्याकडे, ते प्रकरण परत निर्देशित करता येईल.

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३४ (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३५ अन्वये ५३-अ समाविष्ट करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३६ अन्वये मूळ कलमाऐवजी पोट-कलम(१) दाखल करण्यात आले

५६. (१) उच्च न्यायालय, अशा कोणत्याही प्रकरणाची सुनावणी झाल्यावर, त्याद्वारे उपस्थित झालेल्या प्रश्नांचा निर्णय करील आणि असा निर्णय ज्या कारणांवर आधारलेला असेल ते मुद्दे अंतर्भूत करून त्यावर आपला न्यायनिर्णय देईल. परिकथन केलेले प्रकरण निकालात काढण्याची कार्यपद्धती.

(२) ते उच्च न्यायालय, ज्या महसूल प्राधिकाऱ्याने त्या प्रकरणाचे परिकथन पाठविले असेल त्याच्याकडे अशा निर्णयाची एक प्रत न्यायालयाच्या मुद्रेनिशी व प्रबंधकाच्या सहीनिशी पाठवील, आणि महसूल प्राधिकारी अशी प्रत मिळाल्यावर [1][अशा न्यायनिर्णयाबरहुकूम ते प्रकरण निकालात काढण्यासाठी आवश्यक असे आदेश काढील.]

५७. (१) उच्च न्यायालयाहून अन्य कोणत्याही न्यायालयास, कलम ३४ च्या परंतुकाच्या खंड (अ) खाली कोणत्याही संलेखाच्या बाबतीत भरावयाच्या शुल्काच्या रकमेबाबत शंका असेल तर त्या न्यायाधीशास त्या प्रकरणाचे परिकथन तयार करून ते त्यावरील स्वतःच्या अभिप्रायासह उच्च न्यायालयाकडे निर्देशित करता येईल. इतर न्यायालयांनी उच्च न्यायालयाकडे प्रकरणाचे परिकथन पाठवणे.

(२) उच्च न्यायालय, त्या प्रकरणावर, जणू काही ते कलम ५४ खाली पाठविलेले प्रकरण असावे त्याप्रमाणे कार्यवाही करील व आपल्या न्यायनिर्णयाची एक प्रत त्या न्यायालयाच्या मुद्रेनिशी व प्रबंधकाच्या सहीनिशी मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडे पाठवील व तशीच दुसरी प्रत ते प्रकरण निर्देशित करणाऱ्या न्यायाधीशाकडे पाठवील व तो न्यायाधीश ती प्रत मिळाल्यावर अशा न्यायनिर्णयाबरहुकूम ते प्रकरण निकालात काढील.

(३) पोट-कलम (१) खाली केलेले निर्देशन जेव्हा जिल्हा न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयाकडून केले गेलेले असेल, जेव्हा ते जिल्हा न्यायालयामार्फत करण्यात येईल आणि जेव्हा ते कोणत्याही दुय्यम महसूल न्यायालयाकडून केले गेलेले असेल तेव्हा ते निकटच्या वरिष्ठ न्यायालयामार्फत करण्यात येईल.

[2][ (४) कलम ५८ च्या तरतुदींस बाध न येऊ देता कोणतेही न्यायालय पुढील बाबतीत या कलमाखाली कार्यवाही करणार नाही :—

(अ) एखादा संलेख अगोदरच अवरुद्ध करून ठेवण्यात आला असेल किंवा कलम ३४ च्या परंतुकाच्या खंड (अ) खाली त्यासंबंधात शास्ती आकारण्यात आली असेल त्याबाबतीत ;

(ब) ज्या बाबतीत कलम ३५ लागू होत असेल त्या बाबतीत.]

५८. (१) जेव्हा कोणतेही न्यायालय आपल्या दिवाणी किंवा महसूल अधिकारितेचा वापर करताना किंवा कोणतेही फौजदारी न्यायालय, [3][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, प्रकरण नऊ किंवा प्रकरण दहाचा भाग घ याखालील] कोणत्याही कार्यवाहीत एखादा संलेख, तो रीतसर मुद्रांकित आहे म्हणून किंवा त्याला विवक्षित मुद्रांकाची जरुरी नाही म्हणून, किंवा कलम ३४ खाली शुल्क व शास्ती भरल्यानंतर न्यायालयाच्या पुराव्यात स्वीकारण्याबद्दल आदेश देईल तेव्हा, ज्या न्यायालयात अशा प्रथम उल्लेख केलेल्या न्यायालयाविरुद्ध अपिले दाखल होतील किंवा त्याच्याकडून प्रकरणे निर्देशित केली जातील त्या न्यायालयास, स्वतः होऊन किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या अर्जावरून, असा आदेश विचारात घेता येईल. मुद्रांकांच्या पुरेसेपणाच्या संबंधाने न्यायालयाच्या विवक्षित निर्णयांचे पुनरीक्षण.

१९७४ चा २.

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३७ अन्वये "अशा न्यायनिर्णयाबरहुकूम ते प्रकरण निकालात काढील" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३८ अन्वये पोटकलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३९ (अ) अन्वये "फौजदारी व्यवहार संहिता, १८९८ च्या प्रकरण बारा किंवा प्रकरण छत्तीस खालील" हे शब्द व आकडे यांऐवजी हे शब्द, आकडे व अक्षर दाखल करण्यात आले.

(२) अशा रीतीने विचार केल्यानंतर शुल्क व कलम ३४ खालील शास्ती भरल्यावाचून किंवा भरलेले शुल्क व शास्ती यांहून अधिक शुल्क व शास्ती भरल्यावाचून तो संलेख पुरावा म्हणून स्वीकारला जावयास नको होता असे अशा न्यायालयाचे मत होईल तर त्याला तशा अर्थाचे अधिकथन अभिलिखित करता येईल आणि अशा संलेखावर जे शुल्क आकारण्यास पात्र असेल त्या शुल्काची रक्कम निर्धारित करता येईल [1][आणि—

(एक) आपणाकडे किंवा जिल्हाधिकाऱ्याकडे कलम ३४ खालील शास्तीच्या रकमेसह योग्य शुल्काची रक्कम किंवा त्या रकमेतील तूट भरून निघण्यासाठी आवश्यक असेल तेवढी रक्कम किंवा दिलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क किंवा शास्तीची रक्कम भरण्यास संबंधित पक्षाला किंवा व्यक्तीला फर्मावू शकेल; आणि

(दोन) जिच्या कब्जात किंवा अखत्यारात त्यावेळी असा संलेख असेल त्या कोणत्याही व्यक्तीला तो हजर करण्यास फर्मावू शकेल आणि तो दाखल केल्यावर अवरुद्ध करून ठेवू शकेल.]

(३) जेव्हा पोट-कलम (२) खाली कोणतेही अधिकथन अभिलिखित करण्यात आले असेल तेव्हा ते अभिलिखित करणारे न्यायालय, त्याची एक प्रत जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील आणि ते ज्या संलेखासंबंधी असेल तो संलेख अवरुद्ध करून ठेवण्यात आला असेल किंवा अन्यथा अशा न्यायालयाच्या कब्जात असेल तेव्हा, त्याच्याकडे असा संलेखही पाठवील.

[2][(३-अ) पोट-कलम (३) अन्वये करण्यात आलेल्या अधिकथनानुसार कोणत्याही संलेखाच्या संबंधात बसविण्याजोगे असलेले आणि त्याखाली भरणे आवश्यक असलेले शुल्क व शास्ती यांची रक्कम न्यायालयाकडे किंवा जिल्हाधिकाऱ्याकडे भरण्यात आली असेल तेव्हा, यथास्थिति, न्यायालय किंवा जिल्हाधिकारी अशा संलेखाच्या बाबतीत, अशा शुल्काची व शास्तीची रक्कम व ती भरणाऱ्या व्यक्तीचे नाव व राहण्याचे ठिकाण नमूद करून, योग्य ते शुल्क व शास्ती भरण्यात आली असल्याचे पृष्ठांकनाद्वारे प्रमाणित करील.

(३-ब) याप्रमाणे पृष्ठांकित केलेला प्रत्येक संलेख त्यानंतर, त्या बाबतीत अर्ज करण्यात आल्यावर ज्या व्यक्तीच्या कब्जातून तो अशा न्यायालयाच्या कब्जात आला असेल त्या व्यक्तीकडे, किंवा ती व्यक्ती निदेशित करील त्याप्रमाणे तिने प्राधिकृत केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीकडे सुपूर्द करण्यात येईल.]

(४) त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास, असा संलेख पुराव्यात स्वीकारण्यासंबंधीच्या आदेशात, किंवा कलम ४१ खाली दिलेल्या कोणत्याही प्रमाणपत्रात किंवा कलम ४२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी मुद्रांक कायद्याविरुद्ध कोणताही अपराध करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीवर, तो अपराध तिने अशा संलेखाच्या बाबतीत केला आहे असे समजून खटला भरता येईल :

परंतु,—

(अ) कलम ३४ खाली त्या संलेखासंबंधात न्यायालयाने निर्धारित केल्याप्रमाणे शुल्क व शास्ती मिळून देय होणारी रक्कम [3][न्यायालयास किंवा जिल्हाधिकाऱ्यास चुकती करण्यात आली असेल त्या बाबतीत] योग्य शुल्क देण्याबाबत टाळाटाळ करण्याच्या हेतूने अपराध केला गेला आहे असे जिल्हाधिकाऱ्यास वाटत नसेल तर, असा कोणताही खटला दाखल करता येणार नाही ;

(ब) अशा खटल्याच्या प्रयोजनासाठी असेल तेवढे खेरीज करून एरव्ही, या कलमान्वये केलेल्या कोणत्याही अधिकथनामुळे, कोणताही संलेख पुराव्यात स्वीकारण्याबद्दलच्या कोणत्याही आदेशाच्या किंवा कलम ४१ खाली दिलेल्या कोणत्याही प्रमाणपत्राच्या विधिग्राह्यतेला बाधा पोचणार नाही.

---

[1].सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३९ (ब) अन्वये "आणि दाखल करण्यास फर्मावता येईल" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "तो दाखल केल्यावर" या शब्दांनी संपणाऱ्या या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2].वरील अधिनियमाच्या कलम ३९-क अन्वये पोटकलमे (३-अ) व (३-ब) समाविष्ट करण्यात आली.

[3].वरील अधिनिमाच्या कलम ३९-क अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण सात

# अपराध व कार्यपद्धती

रीतसर मुद्रांकित नसलेला संलेख निष्पादित करून देणे वगैरेबद्दल शास्ती.

५९. (१) जी कोणतीही व्यक्ती [1][शुल्क चुकविण्याच्या हेतूने, शुल्क आकारण्यास पात्र असा कोणताही संलेख, तो रीतसर मुद्रांकित न करता निष्पादित करून देईल किंवा त्यावर साक्षीदार म्हणून नव्हे तर अन्यथा सही करील अशा व्यक्तीला] अपराधसिद्धीनंतर अशा प्रत्येक अपराधाबद्दल [2][एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु सहा महिन्यांपर्यंत वाढवता येईल एवढ्या कालावधीसाठी सश्रम कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल :

परंतु, जेव्हा कलम ३४, कलम ३९ किंवा कलम ५८ खाली कोणत्याही संलेखाच्या संबंधात कोणतीही शास्ती भरण्यात आली असेल तेव्हा अशी शास्ती भरणाऱ्या व्यक्तीवर त्याच संलेखाबाबत या कलमाखाली मागाहून जो दंड (काही असल्यास) बसविला जाईल त्यात या शास्तीच्या रकमेइतकी घट दिली जाईल.

(२) जर एखादे शेअर-अधिपत्र रीतसर मुद्रांकित न करता देण्यात आले असेल तर ते देणाऱ्या कंपनीस व तसेच ते देतेवेळी कंपनीचा कार्यकारी संचालक किंवा सचिव किंवा अन्य प्रमुख अधिकारी म्हणून असलेल्या प्रत्येक व्यक्तीस देखील अपराधसिद्धीनंतर पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

संलेख न्यायालयाने दाखल करून घेतला असेल तर कलम ५९ खाली खटला भरता येणार नाही.

[3][५९-अ. जो कोणताही संलेख न्यायालयात दाखल केलेला असेल व उक्त संलेख हा रीतसर मुद्रांकित आहे किंवा त्याला मुद्रांकाची जरूरी नाही असा न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर जो स्वीकारण्यात आलेला असेल अशा संलेखाच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीवर कलम ५९ खाली खटला भरता येणार नाही.]

निपटारा यादीत खोटे अधिकथन केल्याबद्दल शास्ती.

६०. जी कोणतीही व्यक्ती निपटारा यादीत जे खोटे आहे किंवा जे खोटे असल्याचे तिला एकतर माहीत आहे किंवा ते तसे असल्याचे तिला विश्वास आहे असे एखादे अधिकथन करील तिला अपराध सिद्धीनंतर [4][एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु सहा महिनेपर्यंत वाढवता येईल इतक्या कालावधीसाठी सश्रम कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल.]

चिकट मुद्रांक रद्द न करण्याबद्दल शास्ती.

६१. ज्या कोणत्याही व्यक्तीने कलम १२ खाली चिकट मुद्रांक रद्द करणे आवश्यक असेल आणि जी कलमाद्वारे विहित केलेल्या रीतीने असा मुद्रांक रद्द करण्यास चुकली असेल त्या व्यक्तीस अपराधसिद्धीनंतर शंभर रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल.

कलम २८ च्या तरतुदींचे अनुपालन न करण्याबद्दल शास्ती.

६२. शासनाला ठकवण्याच्या उद्देशाने जो कोणतीही व्यक्ती,—

(अ) ज्या संलेखात, कलम २८ खाली आवश्यक असलेली सर्व वस्तुस्थिती व परिस्थिती पूर्णपणे व यथार्थतेने मांडलेली नाही, असा कोणताही संलेख निष्पादित करील ; किंवा

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४१ अन्वये कलम ५९-अ समाविष्ट करण्यात आले.

[4] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) कोणताही संलेख तयार करण्याच्या कामी किंवा त्यासंबंधात नेमलेली किंवा निबद्ध अशी सर्व वस्तुस्थिती व परिस्थिती पूर्णपणे व यथार्थतेने त्यात मांडण्याबाबत हयगय करील किंवा मांडण्यास चुकेल ; किंवा

(क) या अधिनियमाखालील कोणतेही शुल्क किंवा शास्ती मिळण्यापासून शासनाला वंचित करण्याच्या दृष्टीने [1][कोणतेही खोटे विधान करील किंवा दुसरे कोणतेही कृत्य करील], तिला, अपराधसिद्धीनंतर पाच हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल.

मुद्रांकांच्या विक्रीसंबंधीच्या नियमांचा भंग करण्याबद्दल आणि अनधिकृत विक्री करण्याबद्दल शास्ती.

६३. (अ) मुद्रांक विकण्यासाठी नेमलेली जी कोणतीही व्यक्ती, कलम ६९ खाली केलेल्या कोणत्याही नियमांची अवज्ञा करील; आणि

[2][ (ब) याप्रमाणे न नेमलेली जी कोणतीही व्यक्ती वीस पैशांच्या किंवा त्यापेक्षा कमी किमतीच्या चिकट मुद्रांकांहून अन्य मुद्रांकांच्या विक्रीचा धंदा चालू ठेवील] तिला अपराधसिद्धीनंतर [3][एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु सहा महिनेपर्यंत वाढविता येईल इतक्या कालावधीसाठी सक्षम कारावासाची आणि पाच हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल.]

खटले भरणे व चालवणे.

६४. (१) या अधिनियमाखाली किंवा याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमाखाली शिक्षापात्र अशा कोणत्याही अपराधाबद्दल, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा याबाबत राज्य शासन सर्वसाधारणपणे किंवा जिल्हाधिकारी विशेषेकरून ज्या अन्य अधिकाऱ्यास प्राधिकृत करील त्या अधिकाऱ्याच्या मंजुरीवाचून कोणताही खटला दाखल करता येणार नाही.

(२) मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्यास किंवा याबाबत त्याने सर्वसाधारण किंवा विशेषेकरून प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास असा कोणताही खटला स्थगित करता येईल किंवा असा कोणताही अपराध आपसात मिटवता येईल.

(३) अशा कोणत्याही आपसातील तडजोडीची रक्कम, कलम ४६ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने वसूल करता येईल.

६५. [अपराधांची संपरीक्षा करण्याची अधिकारिता] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, याच्या कलम ४४ अन्वये वगळण्यात आले.

संपरीक्षेची जागा.

[4][ ६६. कोणत्याही संलेखासंबंधात करण्यात आलेल्या, या अधिनियमाखालील प्रत्येक अपराधाची संपरीक्षा, असा संलेख जेथे निष्पादित करण्यात आलेला असेल किंवा सापडला असेल किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ खाली जेथे अशा अपराधाची संपरीक्षा होऊ शकेल अशा कोणत्याही जिल्ह्यामध्ये किंवा महानगर क्षेत्रामध्ये करता येईल.] १९७४ चा २.

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४२ अन्वये "दुसरे कोणते कृत्य करीत असेल" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४३ अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (ब) दाखल करण्यात आला.

[3] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ११ अन्वये "सहा महिन्यांपर्यंत" या मजकुराने सुरू होणाऱ्या किंवा "दोन्ही शिक्षा देण्यात येतील" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४५ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ६६ दाखल करण्यात आले.

## पूरक तरतूद

६७. ज्यांचे निरीक्षण केल्यामुळे काही शुल्क मिळण्याची शक्यता असेल किंवा कोणत्याही शुल्कासंबंधात कपट किंवा कसूर सिद्ध होण्याची किंवा तसे उघडकीस येण्याची शक्यता असेल अशा कोणत्याही नोंदवह्या, पुस्तके, अभिलेख, कागदपत्रे, दस्तऐवज किंवा कार्यवृत्ते ही ज्याच्या अभिरक्षेत असतील असा प्रत्येक लोक अधिकारी, [1][राज्य शासनाने किंवा] जिल्हाधिकाऱ्याने लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्या प्रयोजनासाठी फी किंवा आकार न घेता, त्या नोंदवह्या, पुस्तके, कागदपत्रे, दस्तऐवज व कार्यवृत्ते यांचे कोणत्याही वाजवी वेळी निरीक्षण करण्याची आणि त्यातून तिला आवश्यक वाटतील अशा टीपा व उतारे घेण्याची, [2][व आवश्यक असल्यास, त्यांचे कलम ३३ खाली अभिग्रहण करण्याची व अवरूद्ध करून ठेवण्याची] परवानगी देईल.

निरीक्षणासाठी पुस्तके वगैरे खुली असण.

६८. अनुसूची एकमध्ये, [3][ * * * * * * * * ] विनिर्दिष्ट केलेल्या संलेखांपैकी सर्व किंवा कोणत्याही संलेखावर या अधिनियमाखाली आकारण्यायोग्य शुल्क मुळीच आकारण्यात आलेले नाही किंवा चुकीचे आकारण्यात आले आहे असे मानण्यास जिल्हाधिकाऱ्यास संयुक्तिक कारण असेल तर त्यास, कोणत्याही अधिकाऱ्यास जेथे अशा कोणत्याही संलेखासंबंधीच्या किंवा अशा संलेखाच्या बाबतीतील कोणत्याही नोंदवह्या, पुस्तके, अभिलेख, दस्तऐवज किंवा कार्यवृत्ते ठवली आहेत, असे मानण्यास त्यास संयुक्तिक कारण असेल अशा कोणत्याही परिवास्तूत प्रवेश करण्यासाठी, त्यांचे निरीक्षण करण्यासाठी आणि अशा अधिकाऱ्यास आवश्यक वाटतील अशा नोंदी व उतारे त्यातून घेण्यासाठी लेखी प्राधिकृत करता येईल. अशा नोंदवह्या, पुस्तके, अभिलेख, कागदपत्रे, दस्तऐवज किंवा कार्यवृत्ते जिच्या अभिरक्षेत असतात अशी किंवा ती ठेवणारी प्रत्येक व्यक्ती जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास सर्व वाजवी वेळी त्यांचे निरीक्षण करण्याची व त्या अधिकाऱ्यास आवश्यक वाटतील अशा नोंदी व उतारे घेण्याची [4][आणि त्यास आवश्यक वाटेल तर कलम ३३ खाली ते जप्त करण्याची आणि अवरुद्ध करून ठेवण्याची] परवानगी देईल.

परिवास्तूमध्ये प्रवेश करण्यास व विवक्षित दस्तऐवजांचे निरीक्षण करण्यास अधिकाऱ्यास प्राधिकृत करण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

[5][६९. (१) राज्य शासनास, या अधिनियमातील प्रयोजने सर्वसाधारणपणे पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील, आणि अशा नियमांमध्ये, त्यांचा भंग केल्यास अपराधसिद्धी झाली असता जास्तीत जास्त पाचशे रुपयांइतक्या दंडाची शिक्षा होईल अशा अर्थाची तरतूद करता येईल.

नियम करण्याचा अधिकार.

---

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४६ (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४६ (ब) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ४७ अन्वये "अनुच्छेद ५, १३, १९, २०, २१, २२, २३, २८, २९, ३४, ३५, ३६, ४३, ५४ व ६२" हे शब्द व आकडे वगळण्यात आले.

[4] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ४ (अ) अन्वये हे शब्द व आकडे जादा दाखल करण्यात आले.

[5] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४८ अन्वये मूळ कलमे ६९, ७० व ७१ यांऐवजी कलमे ६९ व ७० दाखल करण्यात आली.

(२) पोटकलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, आणि विशेषेकरून, अशा नियमांद्वारे पुढील गोष्टींचे [१][विनियमन करता येईल किंवा पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही गोष्टीसाठी तरतूद करता येईल] :—

(अ) मुद्रांकांचा व मुद्रांकित कागदांचा पुरवठा, विक्री व वापर ;

(ब) ज्या व्यक्तींनीच केवळ अशी विक्री करावयाची त्या व्यक्ती; [२]**

(क) अशा व्यक्तींची कर्तव्ये व त्यांचे पारिश्रमिक; [३]***

[४][(ड) स्थावर मालमत्तेचे खरे बाजारमूल्य विनिश्चित करण्याची रीत ; ]

[५][(ई) स्वाधिकारे पुनरीक्षण कार्यवाहीची पद्धती; आणि

(फ) कलम ४७, ५०, ५१ किंवा ५२ अन्वये मुद्रांकाच्या रकमेतून वजा करण्यात येणारी रक्कम:]

परंतु, अशा नियमांमुळ वीस पैशांच्या किंवा त्यापेक्षा कमी किंमतीच्या चिकट मुद्रांकांची विक्री करण्यावर निर्बंध येणार नाहीत.

(३) या अधिनियमाखाली केले जाणारे सर्व नियम **शासकीय राजपत्रात** ते अगोदर प्रसिद्ध करण्याच्या शर्तीच्या अधीनतेने करण्यात येतील.

(४) या कलमाखाली करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन एक अधिवेशन किंवा लागोपाठची दोन अधिवेशने मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता चालू असताना राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी जर त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य होईल किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहांचे मतैक्य होईल व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** ते अधिसूचित करतील तर यथास्थिति, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा तो मुळीच अंमलात यणार नाही ; तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमाखाली पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वगळलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

प्रदेय शुल्क किंवा सवलत द्यावयाची रक्कम यातील अपूर्णांक पूर्णांकित करणे.

७०. या अधिनियमाखाली प्रदेय असलेले शुल्क किंवा सवलत द्यावयाची रक्कम निर्धारित करताना, पाच पैशांइतका किंवा पाच पैशांपेक्षा अधिक असलेल्या दहा पैशांचा कोणताही अपूर्णांक पुढील दहा पैशांत पूर्णांकित करण्यात येईल, आणि पाच पैशांहून कमी असलेले अपूर्णांक हिशेबात घेतले जाणार नाहीत.

७१. [नियमांचे प्रकाशन] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, याच्या कलम ४८ अन्वये वगळण्यात आले.

---

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३७ (अ) अन्वये "विनियमन करता येईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३७ (ब) अन्वये "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम१२ (अ) अन्वये "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

[४] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक कलम ३७ (ड) अन्वये खंड (ड) समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम १२ (ब) अन्वये हे खंड जादा दाखल करण्यात आले.

**७२.** राज्य शासनास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पुढील गोष्टी करता येतील :— **विवक्षित अधिकारांचे प्रत्यायोजन.**

(अ) कलमे २ (फ), ३३ (३) (ब), ६४, ६९ व ७५ याद्वारे त्यास प्रदान करण्यात आलेले सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही अधिकार मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्याकडे ; आणि

(ब) कलमे ४४, ५३ (१) व ६४ (२) यांद्वारे मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकाऱ्यास प्रदान करण्यात आलेले सर्व किंवा त्यांपैकी कोणतेही अधिकार अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दुय्यम महसूल प्राधिकाऱ्याकडे, प्रत्यायोजित करता येतील.

**७३.** या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे न्यायालय फीसंबंधी त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीखाली आकारणीपात्र असलेल्या शुल्कांना बाध येतो असे मानले जाणार नाही. **न्यायालय फीबाबत व्यावृत्ती.**

**७३-अ.** [अनुज्ञेय असणाऱ्या भूतपूर्व राज्याच्या मुद्रांकांचा विवक्षित कालावधीसाठी वापर अधिसूचित करावयाचा] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, याच्या कलम ४९ अन्वये वगळण्यात आले.

**७३-ब.** [मुंबई शासनाच्या मुद्रांकांचा महाराष्ट्र शासनाने विवक्षित कालावधीसाठी वापर करावयाचा] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, याच्या कलम ४८ अन्वये वगळण्यात आले.

**७४.** शंका टाळण्यासाठी, याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, या अधिनियमातील कोणतीही गोष्ट, विनिमयपत्रे, धनादेश, वचनचिठ्ठ्या, भरणपत्रे, पतपत्रे, विमापत्रे, शेअर हस्तांतरणपत्रे, ऋणपत्रे, प्रतिपत्रे व पावत्या यांच्या बाबतीतील मुद्रांक शुल्काच्या दरांस लागू होणार नाही. **विनिमयपत्रे वगैरेंवरील मुद्रांक शुल्काच्या दरांस हा अधिनियम लागू नसणे.**

**७५.** राज्य शासन या अधिनियमाचा [१][मराठीमधील व हिंदीमधील] अनुवाद प्रत्येक प्रतीस [२][एक रुपयापेक्षा] अधिक नसेल अशा किंमतीने विकण्याची तरतूद करील. **अधिनियमाचा अनुवाद करून त्याची स्वस्त दराने विक्री करणे.**

**७६.** (१) येथे जोडलेल्या अनुसूची दोनच्या स्तंभ (३)मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमिती, त्या अनुसूचीच्या स्तंभ (४)मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने आणि त्या व्याप्तीपर्यंत निरसित करण्यात येतील : **अधिनियमितींचे निरसन.**

परंतु, त्या अधिनियमितीच्या अशा निरसनामुळे, याद्वारे निरसित केलेल्या कोणत्याही अधिनियमितींच्या तरतुदींखालील—

(एक) अगोदरच संपादन केलेला, उपार्जित केलेला किंवा पत्करलेला कोणताही अधिकार, हक्क, आबंधन किंवा दायित्व यांवर, किंवा केलेल्या किंवा ओढवून घेतलेल्या कोणत्याही गोष्टीवर,

(दोन) असा कोणताही अधिकार, हक्क, आबंधन किंवा दायित्व याच्या संबंधातील कोणत्याही कायदेविषयक कार्यवाहीवर किंवा उपाययोजनेवर,

---

[१] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५० (अ) अन्वये "आपल्या प्रशासनाखालील प्रदेशांमध्ये या अधिनियमाचा प्रमुख देशी भाषांतील" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५० (ब) अन्वये "पचवीस पैशांपेक्षा" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

कोणताही परिणाम होणार नाही आणि जणू काही हा अधिनियम पारित झालेला नसावा त्याप्रमाणे, अशी कोणतीही कार्यवाही दाखल करता येईल, चालू ठेवता येईल व निकालात काढता येईल आणि अशी कोणतीही उपाययोजना अंमलात आणता येईल.

(२) याद्वारे निरसित केलेल्या अधिनियमितींपैकी कोणत्याही अधिनियमितीखाली केलेली कोणतीही नेमणूक किंवा काढलेली अधिसूचना, नोटीस, आदेश किंवा केलेला नियम किंवा नमुना हा जेथवर, अशी नेमणूक, अधिसूचना, नोटीस, आदेश, नियम किंवा नमुना हा, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाच्या तरतुदींखाली केलेला किंवा काढलेला आहे असे मानण्यात येईल आणि जोपर्यंत या अधिनियमाखाली केलेल्या नेमणुकीअन्वये, किंवा काढलेल्या अधिसूचनेअन्वये, नोटिशीअन्वये, आदेशान्वये किंवा केलेल्या नियमान्वये किंवा नमुन्याअन्वये अशी नेमणूक, अधिसूचना, नोटीस, आदेश, नियम, किंवा नमुना याचे अधिक्रमण होत नाही तोपर्यंत अशी नेमणूक, अधिसूचना, नोटीस, आदेश, नियम किंवा नमुना अंमलात राहील.

(३) चार आणे किंवा त्याच्या पटीतील अभिधानाचे सर्व मुद्रांक हे, यथास्थिति, पंचवीस पैशांचे किंवा त्यांच्या पटीतील मुद्रांक असल्याचे आणि त्यानुसार ते विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल.

# [1][अनुसूची एक

## संलेखांवरील मुद्रांक शुल्क

(कलम ३ पहा)

| संलेखाचे वर्णन (१) | उचित मुद्रांक शुल्क (२) |
|---|---|
| १. **अभिस्वीकृती**.—कोणत्याही ऋणाची, त्या ऋणाचा पुरावा म्हणून (बँक व्यवसायीच्या पासबुकाखेरीज इतर) कोणत्याही पुस्तकात किंवा एखाद्या स्वतंत्र कागदावर, ऋणकोने किंवा ऋणकोच्या वतीने लिहून किंवा सही करून दिलेली अभिस्वीकृती, जेव्हा असे पुस्तक वा कागद धनकोच्या कब्जात ठेवलेला असेल आणि अशा ऋणाची रक्कम,— | |
| (अ) १०० रुपयांहून अधिक परंतु १,००० रुपयांहून अधिक नसेल त्याबाबतीत ; | वीस पैसे. |
| (ब) १,००० रुपयांहून अधिक परंतु ५,००० रुपयांहून अधिक नसेल त्याबाबतीत ; | पन्नास पैसे. |
| (क) ५,००० रुपयांहून अधिक परंतु १०,००० रुपयांहून अधिक नसेल त्याबाबतीत ; आणि | एक रुपया. |
| (ड) दर १०,००० रुपयांसाठी किंवा १०,००० रुपयांहून अधिक असलेल्या प्रत्येक भागासाठी. | एक रुपया—पन्नास रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने. |
| १८७३ चा ५. १९२५ चा ३९. २. **प्रशासन बंधपत्र**.—सरकारी बचत बँक अधिनियम, १८७३ च्या कलम ६ खाली किंवा भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ खाली देण्यात आलेल्या बंधपत्रासुद्धा प्रशासन बंधपत्र— | |
| (अ) रक्कम २,५०० रुपयांहून अधिक नसेल त्याबाबतीत ; | एवढ्याच रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद क्र. १३) शुल्का-एवढे शुल्क. |
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत .. .. | पन्नास रुपये. |
| ३. **दत्तकपत्र**.—म्हणजे, दत्तकग्रहणाची नोंद करणारा किंवा दत्तक घेण्याचा प्राधिकार प्रदान करणारा किंवा ज्याद्वारे असा प्राधिकार प्रदान झाला असे दिसते असा (मृत्युपत्राहून अन्य) कोणताही संलेख. | पन्नास रुपये. |

[1] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५१ अन्वये अनुसूची एक दाखल करण्यात आली.

| (१) | (२) | |
|---|---|---|
| ४. **प्रतिज्ञा लेख**.—म्हणजे एखादे लेखी निवेदन वस्तुस्थिति-कथन असल्याचे दिसत असून ते करणाऱ्या व्यक्तीने ते स्वाक्षरित केलेले असेल आणि तिने शपथेवर अथवा शपथग्रहणाच्या ऐवजी दृढ-कथन अथवा अधिकथन करण्यास कायद्याद्वारे मुभा मिळालेल्या व्यक्तींनी दृढकथनाद्वारे त्यास पुष्टी दिलेली असेल तर ते निवेदन. | पाच रुपये. | |
| **माफी** | | |
| प्रतिज्ञालेख किंवा लेखी अधिकथन— जेव्हा ते— | | |
| (अ) वायुसेना अधिनियम, १९५०, भूसेना अधिनियम, १९५० किंवा नौसेना अधिनियम, १९५७ खाली नावनोंदणीची शर्त म्हणून ; | | सन १९५० चा४५. |
| (ब) कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या अधिकाऱ्यापुढे दाखल करण्याच्या किंवा उपयोगात आणावयाच्या तात्कालिक प्रयोजनासाठी ; किंवा | | सन १९५० चा४६. |
| (क) कोणत्याही व्यक्तीला कोणतेही निवृत्तिवेतन, किंवा धर्मादाय भत्ता घेणे शक्य व्हावे या एकमात्र प्रयोजनासाठी केलेले असेल तेव्हा. | | १९५७ चा६२. |
| ५. **करारनामा किंवा त्याचे अभिलेख किंवा करार संक्षेपलेख**.— | | |
| (अ) विनिमयपत्राच्या विक्रीसंबंधी असेल तर .. | दर १०,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. | |
| (ब) सरकारी रोख्यांची खरेदी किंवा विक्री यासंबंधी असेल तर; | रोख्याच्या, यथास्थिति, खरेदीच्या किंवा विक्रीच्या वेळी त्याचे जे मल्य असेल त्या मूल्यांपैकी दर १०,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया [१][—एक हजार रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने.] | |
| (क) कोणत्याही कायद्याने संस्थापित कंपनीतील किंवा अशा कंपनीचे किंवा अन्य निगमनिकायातील किंवा अशा निगमनिकायाचे शअर, स्क्रिप, पुंजरोखे, बंधरोखे, ऋणपत्रे, ऋणपत्ररोखे किंवा तशाच स्वरूपाचा अन्य कोणताही विक्रेय रोखा यांची खरेदी किंवा विक्री यासंबंधी असेल तर,— | | |
| (एक) जेव्हा अशाप्रकारचा करारनामा किंवा करार संक्षेपलेख हा रोखे संविदा (विनियमन) अधिनियम, १९५६ | किंवा रोख्याच्या, यथास्थिति, खरेदीच्या किंवा विक्रीच्या वेळी त्याचे | सन १९५६ चा४२. |

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३८ (अ) (एक) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| खाली मान्यता मिळालेल्या रोखे बाजाराच्या सदस्याशी किंवा सदस्यांमार्फत किंवा सदस्या-सदस्यांमध्ये केलेला असेल तेव्हा ; | जे मूल्य असेल त्या मूल्यापैकी दर १०,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत ; .. .. | रोख्याच्या, यथास्थिति, खरेदीच्या किंवा विक्रीच्या वेळी त्याचे जे मूल्य असेल त्या मूल्यापैकी दर १०,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (ड) कापसाची खरेदी किंवा विक्री यासंबंधी असेल तर ; | संव्यवहाराच्या ४,५०० किलोग्रॅमच्या प्रत्येक युनिटाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (ई) सोन्या-चांदीच्या लगडी अगर नाणी यांची खरेदी किंवा विक्री यासंबंधी असेल तर ; | (अ) चांदीच्या ५० किलोग्रॅमच्या प्रत्यकं युनिटाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया.<br>(ब) सोन्याच्या १ किलोग्रॅमच्या प्रत्येक युनिटाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया.<br>(क) १०० सॉव्हरिनच्या प्रत्येक युनिटाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (फ) गळिताच्या धान्याची खरेदी किंवा विक्री यासंबंधी असेल तर ; | गळित धान्याच्या प्रत्येक १०,००० किलोग्रॅमकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (ग) कोणत्याही प्रकारचे सूत, खनिजेतर तेले किंवा कोणत्याही प्रकारचे मसाले यांची खरेदी किंवा विक्री यासंबंधी असेल तर ; | कोणत्याही प्रकारचे सूत, खनिजेतर तेले किंवा कोणत्याही प्रकारचे मसाले यांच्या किमतीपैकी दर १०,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे एक रुपया. |
| (ह) अन्यथा तरतूद केलेली नसल्यास. | दहा रुपये. |

| (१) | (२) |
|---|---|
| **माफी** | |
| करारनामा किंवा त्याचे अभिलेख किंवा करार संक्षेपलेख-- | |
| (अ) केवळ मालाच्या किंवा व्यापारी मालाच्या खरेदीसाठी किंवा विक्रीसाठी केलेले असेल किंवा खरेदी-विक्रीसंबधी केले असेल तेव्हा--परंतु या बाबतीत नोंद (ड), नोंद (ई), नोंद (फ) किंवा नोंद (ग) खाली शुल्क आकारणीस पात्र असलेला करारनामा किंवा करार संक्षेपलेख अथवा अनुच्छेद ४३ खाली आकारणीस पात्र असलेली टिप्पणी किंवा संक्षेपलेख नव्हे ; | |
| (ब) [१] * * * * * * | |
| (क) [१] * * * * * * | |
| **भाडेपट्ट्याने देण्याचा करारनामा.**--भाडेपट्टा (अनुच्छेद ३६ ) पहा-- | |

**६. हक्कलेख-निक्षेप, हडप, तारण किंवा तारणगहाण यासंबंधीचा करारनामा, म्हणजे पुढील बाबींसंबंधीच्या कराराला साक्ष असणारा कोणताही संलेख--**

| | |
|---|---|
| [२][ (१) हक्कलेख किंवा (विक्रेय प्रतिभूतिपत्राखेरीज इतर) कोणत्याही प्रकारच्या मालमत्तेवर हक्क प्रस्थापित करणारा किंवा अशा हक्काचा पुरावा असणारा संलेख [३][ज्याबाबतीत पुढीलप्रमाणे असेल इतक्या कर्जाच्या स्वरूपात दिलेल्या किंवा द्यावयाच्या पैशाच्या अथवा विद्यमान किंवा भावी ऋणांच्या परतफेडीबद्दल प्रतिभूतीच्या स्वरूपात निक्षेपित केलेला असेल त्याबाबतीत असा हक्कलेख किंवा लेख] निक्षेप म्हणून ठेवणे] :-- | |
| (एक) रु. १०,००० पेक्षा अधिक नसेल तर. | पन्नास रुपये. |
| (दोन) रु. १०,००० पेक्षा अधिक असेल परंतु रु. १,००,००० पेक्षा अधिक नसेल तर. | पाचशे रुपये. |
| (तीन) रु. १,००,००० पेक्षा अधिक असेल परंतु रु. ५,००,००० पेक्षा अधिक नसेल तर. | दोन हजार रुपये. |
| (चार) रु. ५,००,००० पेक्षा अधिक असेल परंतु रुपये १५,००,००० पेक्षा अधिक नसेल तर. | पाच हजार रुपये. |

[१]सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३८ (अ) (दोन) अन्वये खंड (ब) व (क) वगळण्यात आले.

[२]वरील अधिनियमाच्या कलम ३८ (ब) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३]सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३ (१) (अ) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (पाच) रु. १५,००,००० पेक्षा अधिक असेल परंतु रुपये २०,००,००० पेक्षा अधिक नसेल तर. | दहा हजार रुपये. |
| (सहा) रु. २०,००,००० पेक्षा अधिक असेल परंतु रुपये ५०,००,००० पेक्षा अधिक नसेल तर. | पस्तीस हजार रुपये. |
| (सात) रु. ५०,००;००० पेक्षा अधिक असेल तर. | पन्नास हजार रुपये.[ किंवा ] |
| (२) जंगम मालमत्तेचे हडप, तारण किंवा तारणगहाण, जेथे कर्जाच्या रूपाने दिलेल्या किंवा द्यावयाच्या पशाच्या परतफेडी-बद्दलची अथवा विद्यमान किंवा भावी ऋणाबद्दलची प्रतिभूती म्हणून [1][असे] [1][* *] हडप, तारण किंवा तारणगहाण करण्यात आले असेल अशा बाबतीत— | |
| (अ) जर असे कर्ज किंवा ऋण मागणीवरून किंवा त्या कराराचा पुरावा म्हणून असणाऱ्या संलेखाच्या तारखेपासून तीन महिन्यानंतर फेडावयाचे असेल तर, | अशा प्रकारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| (ब) जर असे कर्ज किंवा ऋण अशा संलेखाच्या तारखेपासून जास्तीत जास्त तीन महिन्यांपर्यंत फेडावयाचे असेल तर. . . . | उपखंड (अ) अन्वये द्यावयाच्या शुल्काच्या निम्मे शुल्क. |

**स्पष्टीकरण :**—हक्कलेख-निक्षेपासंबंधी कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात, अथवा कोणत्याही प्राधिकाऱ्याच्या आदेशात अथवा त्यासबंधीच्या कोणत्याही पत्रात, टिप्पणीत, ज्ञापनात किंवा लेखात—मग हक्कलेख-निक्षेप अंमलात आला तेव्हा किंवा त्यानंतर किंवा त्यापूर्वी तो केलेला असो आणि पहिले कर्ज किंवा मागाहून घेतलेले अतिरिक्त कर्ज किंवा कर्जे यांच्या प्रतिभूतीसंबंधी असो—काहीही अतर्भूत असले तरीही अशा हक्कलेख-निक्षेपासंबंधी वेगळा करार किंवा करार संक्षेपलेख नसेल तेव्हा, असे पत्र, टिप्पणी, ज्ञापन किंवा लेख हे, या अनुच्छेदाच्या खंड (१) च्या प्रयोजनार्थ, हक्कलेख-निक्षेपासंबधातील कराराचा पुरावा म्हणून मानण्यात येईल.

**माफी**

(१) मालाचे हडप, तारण किंवा तारणगहाण यासंबंधीचा संलेख साक्षांकित केलेला नसल्यास, असा संलेख.

(२) विनिमयपत्रासोबत असलेले तारणगहाणासंबंधीचे पत्र.

७. **मुखत्यारीची अंमलबजावणी म्हणून नेमणूक.**—

मृत्युपत्राहून अन्य कोणत्याही लेखाद्वारे केली असेल तेथे—

| | |
|---|---|
| (अ) विश्वस्ताची .. .. .. .. | पन्नास रुपये. |
| (ब) जंगम किंवा स्थावर मालमत्तेची .. .. | पंचावन्न रुपये. |

[1] वरील अधिनियमाचे कलम ३ (१) (अ) (दोन) अन्वये "निक्षेप" हा शब्द गाळण्यात आला व 'असा' या शब्दाऐवजी 'असे' हा शब्द दाखल करण्यात आला.

अनुसूची एक—चालू

| (१) | (२) |
|---|---|
| ८. **मूल्यन किंवा मूल्यांकन**.—दाव्याच्या ओघात न्यायालयाने दिलेल्या आदेशाखाली नव्हे तर अन्यथा केलेले. | बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क–पन्नास रुपये एवढ्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने. |
| **माफी** | |
| (अ) केवळ एकाच पक्षकाराच्या माहितीसाठी केलेले आणि पक्षकारांमध्ये करारामुळे किंवा कायद्याच्या प्रवर्तनामुळे कोणत्याही रीतीने बंधनकारक नसणारे मूल्यन किंवा मूल्यांकन; | |
| (ब) एखाद्या जमीन मालकाला खंड म्हणून द्यावयाची रक्कम विनिश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी केलेले पिकाचे मूल्यन. | |
| ९. **शिकाऊ उमेदवारी-विलेख**.—यामध्ये कोणताही पेशा, उदीम किंवा कामधंदा शिकण्याकरिता कोणत्याही मालकाकडे ठेवलेल्या शिकाऊ उमेदवाराच्या, लिपिकाच्या किंवा नोकराच्या नोकरीसबंधीचा किंवा शिकवणीसंबंधीचा, व्यवसाय उमेदवारी कराराहून (अनुच्छेद ११) अन्य असा प्रत्येक लेख समाविष्ट आहे. | वीस रुपये. |
| **माफी** | |
| शिकाऊ उमेदवारी अधिनियम, १९६१ खाली निष्पादित करून दिलेला किंवा ज्याद्वारे एखाद्या व्यक्तीस सार्वजनिक धर्मादाय संस्थेने किंवा तिच्या खर्चाने शिकाऊ उमेदवारीसाठी ठेवलेले असते असा कोणत्याही शिकाऊ उमेदवारीसंबंधीचा संलेख. | १९६१ चा ५२. |
| १०. **एखाद्या कंपनीची संस्थापन नियमावली**.— | |
| [1][जेव्हा कंपनीचे कोणतेही भागभांडवल] किंवा नाममात्र भागभांडवल किंवा वाढीव भागभांडवल [1][नसेल तेव्हा]. | दर ५,००,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक हजार रुपये. |
| **माफी** | |
| नफ्याकरिता स्थापन न केलेल्या व कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम २५ खाली नोंदणी झालेल्या कोणत्याही अधिसंघाची नियमावली [कंपनीचा संस्थापन समयलेख (अनुच्छेद ३९) देखील पहावा.] | १९५६ चा १. |

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३८ (क) अन्वये "भागभांडवल" या मजकुराऐवजी "जेव्हा कंपनीचे कोणतेही भागभांडवल" हा मजकूर व "यांवर" या शब्दाऐवजी "नसेल तेव्हा" हे शब्द दाखल करण्यात आले.

| (१) | (२) |
| --- | --- |
| ११. **व्यवसाय उमेदवारी करार** किंवा ज्याद्वारे एखादी व्यक्ती कोणत्याही उच्च न्यायालयात न्यायवादी म्हणून प्रवेश मिळविण्याकरिता प्रथमत: लिपिक म्हणून नोकरी करण्यासाठी बांधली जाते अशी संविदा. | तीनशे पंचाहत्तर रुपये. |
| **अभिहस्तांकन.**––यथास्थिति, अभिहस्तांतरणपत्र (अनुच्छेद २५), हस्तांतरण (अनुच्छेद ५९) आणि भाडेपट्टयाचे हस्तांतरण (अनुच्छेद ६०) पहावे. | |
| **मुखत्यार.**––मुखत्यार म्हणून केलेली नोंद (अनुच्छेद ३१) व मुखत्यारनामा (अनुच्छेद ४८) पहावे. | |
| **दत्तक अनुज्ञापत्र.**––दत्तकपत्र (अनुच्छेद ३) पहावे. | |
| १२. **निवाडा.**––म्हणजे एखाद्या दाव्याच्या ओघात न्यायालयाच्या आदेशाद्वारे नव्हे तर अन्यथा लवादाकडे किंवा पंचाकडे एखादी बाब निर्देशित केल्यावरून लवादाने किंवा पंचाने दिलेला, विद्यमान किंवा भावी मतभेद लवादाकडे निर्देशित करण्याविषयीच्या लेखी करारानुसार झालेला परंतु वाटणीचा निदेश देण्याबाबतचा निवाडा सोडून अन्य कोणताही लेखी निर्णय, | |
| (अ) निवाडा जीसंबंधी असेल त्या मालमत्तेचे निवाडयात दिल्याप्रमाणे जे मूल्य असेल त्या रकमेवर. | बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क––पन्नास रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने. |
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत .. .. .. | पन्नास रुपये. |
| **माफी** | |
| १८७४ चा मुंबई ३. १९६५ चा महा. ४०. मुंबई वंशपरंपरागत पदे अधिनियम, १८७४ याच्या कलम १८ खालील किंवा महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ याच्या कलम ३३० खालील निवाडा. | |
| १९५९ चा मुंबई ३६. १३. **बंधपत्र.**––ऋणपत्र नसलेले व या अधिनियमाद्वारे किंवा मुंबई न्यायालय फी अधिनियम, १९५९ याद्वारे अन्यथा तरतूद न केलेले बंधपत्र (मग अशा तरतुदी विशिष्ट प्रकारच्या बंधपत्रांशी संबंधित असो वा नसोत)–दर पाचशे रुपयांमागे किंवा त्याच्या भागामागे. | दहा रुपये. |

| (१) | (२) |
|---|---|
| **माफी**<br>धर्मार्थ दवाखाना किंवा रुग्णालय किंवा सार्वजनिक उपयुक्ततेचे अन्य कोणतेही प्रयोजन यांना देण्यात आलेल्या खाजगी अभिदानांपासून मिळणारी स्थानिक प्राप्ती दरमहा विनिर्दिष्ट रकमेपेक्षा कमी होणार नाही अशी हमी देण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही व्यक्तीने निष्पादित करून दिलेले बंधपत्र. | |
| १४. **नौतारण बंधपत्र.**—म्हणजे, ज्या संलेखाद्वारे समुद्रपर्यटन करणाऱ्या जहाजाचा नौकाधिपती जहाजाचे जतन करण्याकरिता किंवा त्या जहाजाचा जलप्रवास चालू राहणे शक्य व्हावे म्हणून त्या जहाजाच्या प्रतिभूतीवर पैसे कर्जाऊ घेतो असा कोणताही संलेख. | तितक्याच रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| १५. **रद्द करणे.**—त्यासंबंधीचा संलेख—तो साक्षांकित केलेला असेल व त्याविषयी अन्यथा तरतूद केलेली नसेल तर; | वीस रुपये. |
| **माफी**<br>मृत्युपत्र रद्द करणारा संलेख. | |
| १६. **विक्रीचे प्रमाणपत्र.**—(वेगवेगळा लाट म्हणून ठेवलेल्या व विकलेल्या प्रत्येक मालमत्तेच्या संबंधात) दिवाणी किंवा महसुली न्यायालयाने अथवा जिल्हाधिकाऱ्याने अथवा अन्य महसुली अधिकाऱ्याने किंवा मालमत्ता जाहीर लिलावाद्वारे विकण्यास ज्याला कायद्याने प्राधिकृत केले आहे अशा अधिकाऱ्याने जाहीर लिलावात विकलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या खरेदीदारास दिलेले. | अनुच्छेद २५ च्या यथास्थिति खंड(अ),(ब(,[1][(क)किंवा(ड)] खाली अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत मालमत्तेच्या बाजार-मूल्यावर आकारता येते तितके शुल्क. |
| [2][१७. **प्रमाणपत्र किंवा अन्य दस्तऐवज.**—असे प्रमाणपत्र किंवा अन्य दस्तऐवज धारण करणाऱ्याचा किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीचा,— | |
| (अ) कोणत्याही कायद्याने संस्थापित कंपनीतील किंवा कंपनीचा अथवा अन्य निगम निकायातील किंवा निगम निकायाचा कोणताही शेअर, स्क्रिप किंवा पुंजरोखा यांबाबतचा अधिकार किंवा हक्क यांचा पुरावा दर्शवणारे अगर अशा कोणत्याही कंपनीतील किंवा कंपनीचा अथवा निगम निकायातील किंवा निगम निकायाचा कोणताही शेअर, स्क्रिप किंवा पुंजरोखा यांचा मालक होण्याबाबतचा अधिकार किंवा हक्क यांचा पुरावा दर्शवणारे [शेअर वाटपपत्र (अनुच्छेद ३७) देखील पहावे ]; | शेअर, स्क्रिप किंवा पुंजरोखा यांच्या मूल्याच्या दर शंभर रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (अ) अन्वये "किंवा (क)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम २ अन्वये मूळ अनुच्छेदाऐवजी अनुच्छेद १७ दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| (ब) युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया यामधील किंवा याचे कोणतेही शेअर, स्क्रिप किंवा पुंजरोखा यामधील किंवा याचा अधिकार किंवा हक्क यांचा पुरावा दर्शविणारे. | दर युनिट प्रमाणपत्राला पाच रुपये.] |
| १८. **नौभाटक लेख.**—म्हणजे ज्याद्वारे एखादे जलयान किंवा त्याचा एखादा विनिर्दिष्ट प्रमुख भाग भाड्याने घेणाऱ्याच्या विशिष्ट कामांकरिता भाड्याने दिला जातो असा (खेच-आगबोटी-च्या भाड्याचा करार वगळून) कोणताही संलेख—मग त्यात शास्ति-विषयक खंडाचा समावेश असो किंवा नसो. | वीस रुपये. |
| १९. (१) **निपटारा यादी.**—सरकारी रोख्यांच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या संव्यवहारासंबंधीची रोखे विनिमय केंद्राच्या वटवणीगृहास सादर केलेली. | अशा यादीतील नोंदींपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात, रोख्यांच्या मूल्यावर यथास्थिति, सौदापूर्ति किमतीस किंवा करार किमतीस अनुसरून परिगणित केलेल्या यथास्थिति अनुच्छेद ५ (ब) किंवा ४३ (ग) याखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |
| (२) **निपटारा यादी.**—कोणत्याही कायद्याने संस्थापित कंपनी-तील किंवा अन्य निगम-निकायातील शेअर, स्क्रिप, पुंजरोखा, बंधरोखा, ऋणपत्र, ऋणपत्ररोखा किंवा तत्सम स्वरूपाचा इतर विक्रेय रोखा यांच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या संव्यवहारा-संबंधीची, रोखे संविदा (विनियमन) अधिनियम, १९५६ याखाली मान्यता मिळालेल्या रोखे विनिमय केंद्राच्या वटवणीगृहास सादर केलेली. (१९५६ चा ४२.) | अशा यादीतील नोंदींपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात यथास्थिति, रोख्यांच्या मूल्यावर सौदापूर्ति किमतीस किंवा करार किमतीस अनुसरून परिगणित केलेल्या यथा-स्थिति अनुच्छेद ५ (क) (एक) किंवा ४३ (फ) याखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |
| (३) **निपटारा यादी.**—कोणत्याही कायद्याने संस्थापित कंपनी-तील किंवा अन्य निगम-निकायातील शेअर, स्क्रिप, पुंजरोखा, बंधरोखा, ऋणपत्र, ऋणपत्ररोखा किंवा तत्सम स्वरूपाचा इतर विक्रेय रोखा यांच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या संव्यवहारा-संबंधीची, रोखे संविदा (विनियमन) अधिनियम, १९५६ याखाली मान्यता मिळालेल्या रोखे विनिमय केंद्राच्या वटवणीगृहास सादर केलेली. (१९५६ चा ४२.) | अशा यादीतील नोंदींपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात यथास्थिति, रोख्यांच्या मूल्यावर सौदापूर्ति किमतीस किंवा करार किमतीस अनुसरून परिगणित केलेल्या यथास्थिति, अनुच्छेद ५ (क) (दोन) किंवा ४३ (फ) याखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |

| (१) | (२) |
|---|---|
| २०. **निपटारा यादी.**--कापसाच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या संव्यवहारासंबंधीची कापूस अधिसंघाच्या वटवणीगृहास सादर केलेली. | अशा यादीतील नोंदींपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात संव्यवहार युनिटांवर किंवा त्यांच्या भागावर यथास्थिति, अनुच्छेद ५ (ड) किंवा ४३ (अ) याखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |
| २१. **निपटारा यादी.**--सोन्याचांदीच्या लगडी व नाणी यांच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या संव्यवहारासंबंधीची, सोनेचांदी अधिसंघाच्या वटवणीगृहास सादर केलेली. | अशा यादीतील नोंदींपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात, संव्यवहार युनिटांवर किंवा त्यांच्या भागावर यथास्थिति, अनुच्छेद ५ (ई) किंवा ४३ (ब) याखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |
| २२. **निपटारा यादी**--गळित धान्यांच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या संव्यवहारासंबंधी गळित धान्य अधिसंघाच्या वटवणीगृहास सादर केलेली. | अशा यादीतील नोंदींपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात, संव्यवहार युनिटांवर किंवा त्यांच्या भागावर यथास्थिति, अनुच्छेद ५ (फ) किंवा ४३ (क) याखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |
| २३. **निपटारा यादी.**--कोणत्याही प्रकारचे सूत किंवा खनिजेतर तेले किंवा कोणत्याही प्रकारचे मसाले यांच्या खरेदीच्या किंवा विक्रीच्या संव्यवहारासंबंधीची. | अशा यादीतील नोंदींपैकी प्रत्येक नोंदीच्या संबंधात, संव्यवहार युनिटांवर किंवा त्यांच्या भागावर यथास्थिति, अनुच्छेद ५ (ग) किंवा (४३) (ड) याखाली देय असलेल्या शुल्कांची एकूण रक्कम. |
| २४. **तडजोडनामा.**--म्हणजे, ज्याद्वारे एखादा ऋणको आपली मालमत्ता आपल्या धनकोंच्या लाभासाठी अभिहस्तांकित करतो अथवा ज्याद्वारे अशा धनकोंच्या ऋणांसंबंधाने तडजोड म्हणून किंवा लाभांशादाखल द्यावयाची रक्कम चुकती करण्याबद्दल त्यांना हमी देण्यात येते अथवा ज्याद्वारे, धनकोंच्या लाभासाठी ऋणकोचा धंदा निरीक्षकांच्या देखरेखीखाली किंवा लायसनपत्रानुसार चालू राहावा म्हणून व्यवस्था केली जाते असा, एखाद्या ऋणकोने निष्पादित केलेला संलेख. | पन्नास रुपये. |

| (१) | (२) |
|---|---|
| २५. **अभिहस्तांतरणपत्र.**—(अनुच्छेद ५९ खाली ज्यावर शुल्क आकारण्यात येते किंवा ज्यास त्याबाबत माफी मिळते असे हस्तांतरणपत्र नव्हे)— | |
| अशा अभिहस्तांतरणपत्रासंबंधीची विषयवस्तू असलेल्या मालमत्तेच्या [1][खऱ्या बाजारमूल्यावर]— | |
| (अ) जंगम मालमत्तेच्या बाबतीत असेल तर, दर ५०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता ; | पंधरा रुपये. |
| (ब) पुढील हद्दींत असलेल्या स्थावर मालमत्तेच्या बाबतीत असेल तर— | |
| (एक) कोणत्याही ग्रामीण क्षेत्रांतील—दर ५०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता ; | पंधरा रुपये. |
| (दोन) "क" वर्ग नगरपालिका आणि त्यालगत एखादे कटक क्षेत्र असल्यास तेथील—दर ५०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता ; | सतरा रुपये पन्नास पैसे. |
| (तीन) "ब" वर्ग नगरपालिका आणि कामठी कटक क्षेत्र यातील—दर ५०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता ; | बावीस रुपये पन्नास पैसे. |
| (चार) "अ" वर्ग नगरपालिका आणि अहमदनगर कटक क्षेत्र यातील—दर ५०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता ; | तीस रुपये. |
| (पाच) खंड (सहा) मध्ये नमूद केलेल्याहून अन्य महानगरपालिका आणि देवळाली, देहू रोड व औरंगाबाद कटक क्षेत्र यातील—दर ५०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता ; | चाळीस रुपये. |
| (सहा) (अ) बृहन्मुंबई महानगरपालिका, आणि ..<br>(ब) (एक) पुणे व खडकी कटक क्षेत्रांसुद्धा पुणे शहर ; ..<br>(दोन) ठाणे–वसई खाडीने वेढलेला बृहन्मुंबईला लागून असलेला ठाणे तालुक्याचा भाग यासुद्धा ठाणे शहर यांच्या महानगरपालिका यातील—दर ५०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता. | पन्नास रुपये |
| (क) स्थावर व जंगम अशा दोन्ही मालमत्तांच्या बाबतीत असेल तर. | खंड (अ) आणि (ब) खाली प्रदेय असलेल्या शुल्काइतके शुल्क. |

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३८ (ई) अन्वये "बाजारमूल्यावर" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

| (१) | (२) |
|---|---|
| *[1][(ड) (१) इमारत किंवा युनिट यांचा समावेश असलेल्या निवासी परिवास्तूच्या संबंधात-- | |
| (अ) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी केलेल्या किंवा नोंदणी केली असल्याचे मानण्यात आलेल्या सहकारी संस्थेने केलेले किंवा तिच्या नावे करण्यात आलेले असेल; किंवा | |
| (ब) ज्याला महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट्स-बाबत (ते बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था व हस्तांतरण यांचे नियमन करण्या-संबंधी) अधिनियम, १९६३ किंवा महाराष्ट्र वेश्म मालकी अधिनियम, १९७० यांच्या तरतुदी लागू होत असतील; किंवा | |
| (क) अशा संस्थेने (तिचे शेअर्स खरेदी केल्यामुळे असो किंवा नसो) तिच्या सदस्यांच्या नावे केलेले असेल; किंवा | |
| (ड) अशा संस्थेच्या सदस्याने दुसऱ्या सदस्यांच्या नावे (तिच्या शेअर्सचे हस्तांतरण दुसऱ्या सदस्यां-कडे केल्यामुळे असो किंवा नसो) करून दिलेले असेल आणि जिचे मूल्य पुढीलप्रमाणे असेल त्याबाबतीत:-- | |
| (एक) रु. १,००,००० पेक्षा अधिक नसेल | शंभर रुपये. |
| (दोन) रु. १,००,००० पेक्षा अधिक असेल परंतु रु. २,५०,००० पेक्षा अधिक नसेल. | मूल्याच्या एक टक्का. |
| (तीन) रु. २,५०,००० पेक्षा अधिक असेल परंतु रु. ५,००,००० पेक्षा अधिक नसेल. | .. २,५०० रुपये अधिक रु. २,५०,००० पेक्षा अधिक असलेल्या रकमेच्या ४ टक्के. |
| (चार) रु. ५,००,००० पेक्षा अधिक असेल परंतु रु. ७,५०,००० पेक्षा अधिक नसेल. | .. १४,००० रुपये अधिक रु. ५,००,००० पेक्षा अधिक असलेल्या रकमेच्या ६ टक्के. |
| (पाच) रु. ७,५०,००० पेक्षा अधिक असेल परंतु रु. १०,००,००० पेक्षा अधिक नसेल. | .. २९,००० रुपये अधिक रु. ७,५०,००० पेक्षा अधिक असलेल्या रकमेच्या ८ टक्के. |
| (सहा) रु. १०,००,००० पेक्षा अधिक असेल | .. ४९,००० रुपये अधिक रु. १०,००,००० पेक्षा अधिक असलेल्या रकमेच्या १० टक्के. |

१९६१ चा महाराष्ट्र २४.

१९६३ चा महाराष्ट्र ४५.

१९७१ चा महाराष्ट्र १५.

[1] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३ (ब) अन्वये खंड (ड) मूळ खंडाऐवजी दाखल करण्यात आला.

*सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३ चे पोटकलम (२) पुढीलप्रमाणे आहे:--

(२) या अधिनिमाच्या कलम ३, खंड (ब) याच्या उप-खंड (एक) व (दोन) अन्वये, अनुक्रमे खंड (ड) च्या उप-खंड (एक) ऐवजी नवीन उप-खंड आणि स्पष्टीकरण दोन ऐवजी नवीन स्पष्टीकरण दाखल करून मुख्य अधिनियमाच्या अनुसूची एकच्या अनुच्छेद २५ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणा या मुख्य अधिनियमात १७ मार्च १९८८ रोजी करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल.

| (१) | (२) |
|---|---|
| (२) निवासी परिवास्तूंच्या बांधकामाकरिता असलेल्या आणि उप-खंड (१) च्या बाबी (अ), (क) किंवा (ड) मध्ये वर्णन केलेल्या जमिनीच्या संबंधात असेल तर. | उप-खंड (१) अन्वये देय असेल तितके शुल्क.] |

**माफी**

१९५७ चा १४. कॉपीराईट अधिनियम, १९५७ खाली केलेले कॉपीराईटचे अभिहस्तांकन.

[1][**स्पष्टीकरण एक**].--या अनुच्छेदाच्या प्रयोजनार्थ,स्थावर मालमत्ता विकण्यासंबंधीच्या विक्रय कराराच्या बाबतीत जेव्हा, कोणत्याही स्थावर मालमत्तेचा कब्जा असा करारनामा करण्यापूर्वी किंवा करतेवेळी किंवा केल्यानंतर, त्यासंबंधीचे अभिहस्तांतरणपत्र न करता हस्तांतरित करण्यात येईल तेव्हा असा विक्रय करारनामा हेच अभिहस्तांतरणपत्र असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार मुद्रांक शुल्क आकारण्यात येईल :

परंतु, कलम ३२-अ च्या तरतुदी ज्याप्रमाणे त्या कलमाखालील अभिहस्तांतरणपत्रास लागू होतात त्याप्रमाणे, पूर्वोक्तानुसार अभिहस्तांतरणपत्र म्हणून मानलेल्या अशा विक्रय करारनाम्यास **योग्य त्या फेरफारांसह** लागू होतील :

परंतु आणखी असे की, अशा विक्रय करारनाम्यानुसार नंतर अभिहस्तांतरणपत्र करण्यात येईल त्या बाबतीत, अभिहस्तांतरणपत्र मानण्यात आलेल्या विक्रय करारनाम्यानुसार आधीच दिलेले व वसूल केलेले कोणतेही शुल्क असल्यास ते, त्या अभिहस्तांतरणपत्रावरील आकारण्याजोग्या एकूण शुल्कापोटी समायोजित केले जाईल.

[2][**स्पष्टीकरण दोन**.--खंड (ड) च्या प्रयोजनांकरिता,--

(**एक**) "युनिट" यात सदनिका, वेश्म, गाळा किंवा वेश्मिका किंवा अन्य कोणत्याही नावाने ओळखण्यात येणारे अन्य कोणतेही युनिट यांचा समावेश होईल;

(**दोन**) जेथे इमारत निवासी आणि अनिवासी या दोन्ही प्रयोजनांकरिता वापरली जाणारी युनिटे मिळून बनलेली असेल तेथे शुल्कामधील सूट, इमारतीमधील निवासी प्रयोजनांकरिता वापरण्यात येणाऱ्या युनिटांच्या किमतीच्या संदर्भात उपलब्ध होईल आणि अनिवासी प्रयोजनांकरिता वापरण्यात येणाऱ्या

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ब) (दोन) अन्वये विद्यमान 'स्पष्टीकरण' याला 'स्पष्टीकरण एक' असा फेर क्रमांक देण्यात आला व स्पष्टीकरण दोन जादा दाखल करण्यात आले.

[2] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३ (१) (ब) (दोन) अन्वये मूळ स्पष्टीकरणाऐवजी हे स्पष्टीकरण दाखल करण्यात आले.

| (१) | (२) |
|---|---|
| युनिटांच्या बाबतीत देय असलेले शुल्क, अशा युनिटांच्या मूल्यावर खंड (ब) आणि (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दराप्रमाणे असेल; | |
| **(तीन)** देय असलेले शुल्क, अशा अभिहस्तांतरणपत्रावर खंड (ब) आणि (क) अन्वये देय असलेल्या शुल्काच्या रकमेपेक्षा जास्त असणार नाही.] | |
| २६. **प्रत किंवा उतारा.**—भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ याच्या कलम ७६ खाली कोणत्याही लोक अधिकाऱ्याने किंवा त्याच्या आदेशावरून खरी प्रत किंवा उतारा म्हणून प्रमाणित केलेली आणि न्यायालय फीसंबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याखाली शुल्क आकारण्यास पात्र नसलेली. | पाच रुपये. |
| **माफी** | |
| (अ) कोणत्याही लोक कार्यालयातील अभिलेखासाठी किंवा सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या लोक अधिकाऱ्याने जी प्रत तयार करणे किंवा सादर करणे कायद्याने स्पष्टपणे आवश्यक केलेले आहे अशा कोणत्याही कागदपत्राची प्रत. | |
| (ब) जन्म, बाप्तिस्मा विधी, नामकरण विधी, समर्पण विधी, विवाह, घटस्फोट, मृत्यू किंवा दफन यासंबंधीच्या कोणत्याही नोंदीची प्रत किंवा तीमधील उतारा. | |
| (क) ज्याची अस्सल प्रत शुल्क आकारण्यास पात्र नसते अशा कोणत्याही संलेखाची प्रत. | |
| २७. **प्रतिलेख किंवा प्रतिलिपी.**--शुल्क आकारण्यास पात्र अशा संलेखाच्या संबंधात योग्य शुल्क भरलेले आहे अशा कोणत्याही संलेखाचा प्रतिलेख किंवा त्याची प्रतिलिपी. | मूळ संलेखावर प्रदेय असलेल्या शुल्काएवढे शुल्क--दहा रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने. |
| २८. **सीमाशुल्क बंधपत्र किंवा उत्पादन शुल्क बंधपत्र.**—**म्हणजेच,** सीमाशुल्क अथवा उत्पादनशुल्क यांच्यापैकी कोणत्याही शुल्कासाठी किंवा त्यांच्यासंबंधात अगर त्याबाबत कपट किंवा चुकवाचुकवी होऊ नये यासाठी अगर त्यासंबंधीच्या कोणत्याही बाबीसाठी किंवा गोष्टीसाठी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींस अनुसरून अथवा सीमाशुल्क किंवा उत्पादनशुल्क विभागाच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या निदेशास अनुसरून दिलेले कोणतेही बंधपत्र— | |
| (अ) रक्कम २,५०० रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा बाबतीत | अशा रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क—पन्नास रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने. |

१८७२ चा १.

| (१) | (२) |
|---|---|
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत .. .. .. | पन्नास रुपये. |
| **कोणत्याही विश्वस्त व्यवस्थेसंबंधीचे घोषणापत्र.**—विश्वस्त-व्यवस्था (अनुच्छेद ६१) पहा. | |
| २९. **मालाच्या बाबतीत सुपूर्दगी आदेश.**— म्हणजे, ज्या संलेखामुळे त्यात नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा तिच्या अभिहस्तांकितींना किंवा त्या संलेखाच्या धारकास, कोणत्याही गोदीत किंवा बंदरात अथवा जेथे भाडे किंवा किराया देऊन माल साठवला आहे किंवा ठेवला आहे अशा कोणत्याही वखारीत अथवा कोणत्याही मालधक्क्यावर पडून असलेला एखादा माल ताब्यात घेण्याचा हक्क मिळतो असा कोणताही संलेख, अशा मालावरील मालकी हक्काची विक्री किंवा हस्तांतरण झाल्यावर अशा मालाच्या मालकाने किंवा त्याच्या-वतीने स्वाक्षरित केलेला असून जेव्हा मालाची किंमत शंभर रुपयांपेक्षा अधिक असेल तेव्हा असा संलेख. | एक रुपया. |
| **हक्कलेख निक्षेप.**—हक्कलेख निक्षेप, तारण निक्षेप किंवा तारण किंवा तारणगहाण यासंबंधीचा करारनामा (अनुच्छेद ६) पहा. | |
| **भागीदारीचे विसर्जन.**—भागीदारी (अनुच्छेद ४७) पहा. | |
| ३०. **घटस्फोट.**—त्यासंबंधीचा संलेख म्हणजे, ज्या कोणत्याही संलेखाद्वारे एखादी व्यक्ती आपल्या विवाहाचा विच्छेद करते असा संलेख. | वीस रुपये. |
| **विधवादेय.**—त्यासंबंधीचा संलेख, संव्यवस्था (अनुच्छेद ५५) पहा. | |
| **प्रतिलिपी.**—प्रतिलेख (अनुच्छेद २७) पहा. | |
| ३१. **विवाह ज्ञापन नोंद.**—मुंबई विवाह नोंदणी अधिनियम, १९५४ चा मुंबई ५. १९५३ खालील नोंदवहीतील. | पाच रुपये. |
| ३२. **मालमत्ता विनिमय.**—त्यासंबंधीचा संलेख .. .. | सर्वाधिक मूल्याच्या मालमत्तेच्या बाजारमूल्यावर (अनुच्छेद २५) च्या, यथास्थिति, खंड (अ), (ब), [1][(क) किंवा (ड)] खाली अभिहस्तांतरण-पत्राच्या बाबतीत बसते तितके शुल्क. |
| **उत्पादनशुल्क बंधपत्र.**—सीमाशुल्क बंधपत्र किंवा उत्पादनशुल्क बंधपत्र (अनुच्छेद २८) पहा. | |

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (क) अन्वये "किंवा (क)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
| --- | --- |
| ३३. **अधिक प्रभार**.—त्यासंबंधीचा संलेख म्हणजे गहाण मालमत्तेवर जादा प्रभार लादणारा कोणताही संलेख,— | |
| (अ) जेव्हा मूळ गहाण हे अनुच्छेद ४०, खंड (अ) मध्ये उल्लेखिलेल्या वर्णनाचे (म्हणजे कब्जासह) असेल तेव्हा ; | अशा संलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या जादा प्रभाराच्या रकमेवर, अनुच्छेद २५ च्या, यथास्थिति, खंड (अ), (ब), [1][ (क) किंवा (ड)] खाली अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसते तितके शुल्क. |
| (ब) जेव्हा असे गहाण हे अनुच्छेद ४०, खंड (ब) मध्ये उल्लेखिलेल्या वर्णनाचे (म्हणजे कब्जाविना) असेल तेव्हा— | |
| (एक) जर जादा प्रभाराचा संलेख निष्पादित करण्याच्या वेळी, अशा संलेखाखाली मालमत्तेचा कब्जा देण्यात आला असेल तर ; | प्रभाराच्या एकूण रकमेबद्दल मूळ गहाण व आधीच ठेवलेला जादा प्रभार धरून अभिहस्तांतरणपत्रावर अनुच्छेद २५ च्या, यथास्थिति, खंड (अ), (ब), [2][ (क) किंवा (ड)] खाली बसणाऱ्या शुल्काइतके शुल्क वजा अशा मूळ गहाणावर व जादा प्रभारावर आधीच भरलेले शुल्क. |
| (दोन) याप्रमाणे कब्जा दिलेला नसेल तर .. .. | अशा संलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या अधिक प्रभाराच्या रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काइतके शुल्क. |
| ३४. **दान**.—त्यासंबंधीचा संलेख–संव्यवस्थापत्र (अनुच्छेद ५५) किंवा मृत्युपत्र किंवा हस्तांतरण (अनुच्छेद ५९) सोडून अन्य. | दान म्हणून दिलेल्या मालमत्तेच्या बाजारमूल्यावर अनुच्छेद २५ च्या, यथास्थिति, खंड (अ), (ब), [3][ (क) किंवा (ड)] खाली अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसते तितके शुल्क. |
| **किराया करारनामा किंवा सेवा करारनामा**.—करारनामा (अनुच्छेद ५) पहा. | |

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ड) अन्वये "किंवा (क)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २ (ड) अन्वये "किंवा (क)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २ (ई) अन्वये "किंवा (क)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **३५. क्षतिपूर्ति बंधपत्र.**— . . . . . . . . | तितक्याच रकमेच्या प्रतिभूति-बंधपत्रावरील (अनुच्छेद ५४) शुल्काइतके शुल्क. |
| **देखरेखनामा**—तडजोडनामा (अनुच्छेद २४) पहा. | |
| **३६. भाडेपट्टा.**—अवर भाडेपट्टा किंवा पोट-भाडेपट्टा व भाड्याने किंवा पोट-भाड्याने देण्यासंबंधीचा कोणताही करारनामा किंवा भाडेपट्ट्याचे कोणतेही नवीकरण यांसुद्धा— | |
| (अ) अशा प्रकारच्या भाडेपट्ट्याद्वारे भाडे निश्चित केले असेल आणि कोणतेही अधिमूल्य भरले किंवा सुपूर्द केले नसेल त्या बाबतीत— | |
| (एक) भाडेपट्टा एक वर्षाहून कमी अवधीकरिता असल्याचे दिसत असेल त्याबाबतीत ; | प्रदेय असणाऱ्या संपूर्ण भाड्याच्या रकमेवर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति खंड (अ), (ब) [१][(क) किंवा (ड)] खाली अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसते तितके शुल्क. |
| (दोन) भाडेपट्टा एक वर्षाहून अधिक पण तीन वर्षाहून अधिक नाही इतक्या अवधीकरिता असल्याचे दिसत असेल त्या बाबतीत ; | सरासरी वार्षिक भाड्याच्या रकमेवर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति खंड (अ), (ब) [१][(क) किंवा (ड)] खाली अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसते तितके शुल्क. |
| (तीन) भाडेपट्टा तीन वर्षाहून अधिक पण दहा वर्षाहून अधिक नाही इतक्या अवधीकरिता असल्याचे दिसत असेल त्या बाबतीत ; | सरासरी वार्षिक भाड्याच्या दुप्पट रकमेवर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति खंड (अ), (ब), [१][(क) किंवा (ड)] खाली अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसते तितके शुल्क. |
| (चार) भाडेपट्टा दहा वर्षाहून अधिक पण तीस वर्षाहून अधिक नाही इतक्या अवधीकरिता असल्याचे दिसत असेल त्याबाबतीत ; | सरासरी वार्षिक भाड्याच्या तिप्पट रकमेवर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति खंड (अ), (ब), [१][(क) किंवा (ड)] खाली अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसते तितके शुल्क. |

[१]सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (फ) अन्वये "किंवा (क)" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
| --- | --- |
| (पाच) भाडेपट्टा तीस वर्षांहून अधिक अवधीकरिता अथवा शाश्वत काळाकरिता असल्याचे दिसत असेल किंवा भाडेपट्टा कोणत्याही निश्चित अवधीकरिता असल्याचे दिसत नसेल त्याबाबतीत ; | सरासरी वार्षिक भाड्याच्या दसपट रकमेवर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति खंड (अ), (ब), [1][ (क) किंवा (ड)] खाली अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसते तितके शुल्क. |
| (ब) भाडेपट्टा हा, नजराणा किंवा अधिमूल्य याबद्दल अथवा दिलेल्या किंवा द्यावयाच्या अग्रिम धनाबद्दल देण्यात आला असेल व कोणतेही भाडे निश्चित केलेले नसेल त्याबाबतीत ; | अशा नजराण्याची किंवा अधिमूल्याची अथवा दिलेली किंवा द्यावयाची अग्रिम धनाची रक्कम किंवा मूल्य यावर, अनुच्छेद २५ च्या यथास्थिति खंड (अ), (ब), [1][ (क) किंवा (ड)] खाली अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसते तितके शुल्क. |
| (क) भाडेपट्टा हा निश्चित केलेल्या भाड्याच्या जोडीला नजराणा किंवा अधिमूल्य याबद्दल दिलेल्या किंवा द्यावयाच्या अग्रिम धनाबद्दल देण्यात आला असेल त्याबाबतीत. | जर कोणताही नजराणा किंवा अधिमूल्य किंवा अग्रीम धन यांचा भरणा केला नसता तर त्या भाडेपट्ट्यावर जे शुल्क प्रदेय झाले असते त्याच्या जोडीला अशा नजराण्याच्या, अधिमूल्याच्या किंवा अग्रिम धनाच्या रकमेवर किंवा अधिमूल्यावर अनुच्छेद २५ च्या यथास्थिति खंड (अ), (ब), [1][ (क) किंवा (ड)] खाली अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसते तितके शुल्क :<br>परंतु, भाडेपट्टा करून देण्यासंबंधीच्या करारनाम्यावर भाडेपट्ट्यास आवश्यक असलेला यथामूल्य मुद्रांक लावलेला असेल व अशा करारास अनुसरून नंतर एखादा भाडेपट्टा निष्पादित करून देण्यात आला असेल तेव्हा अशा कोणत्याही बाबतीत, भाडेपट्ट्यावरील शुल्क दहा रुपयाहून अधिक असणार नाही. |

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (फ) अन्वये "किंवा क" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **स्पष्टीकरण एक.**—आगाऊ दिलेली भाड्याची रक्कम भाड्याच्या एका किंवा अनेक हप्त्यांपोटी वळती करून घेण्यात यावी अशी भाडेपट्ट्यात तरतूद केली असली तरीही अशी आगाऊ दिलेली भाड्याची रक्कम ही या अनुच्छेदाच्या अर्थांतर्गत अधिमूल्य किंवा अग्रिम धन आहे असे मानले जाईल. | |
| **स्पष्टीकरण दोन.**—जेव्हा, सरकारी महसूल, उपकरांपोटी जमीन मालकाने द्यावयाचा हिस्सा, किंवा नगरपालिका पट्टी व कर यांपोटी मालकाने द्यावयाचा हिस्सा यासारखा जो कोणताही आवर्ती आकार कायद्याने पट्टाकाराकडून वसूल करण्याजोगा असेल तो आकार देण्याचे एखाद्या पट्टेदाराने अभिवचन दिले असेल तेव्हा, पट्टेदाराने अशा रीतीने देण्याचे कबूल केलेली रक्कम ही भाड्याचा भाग आहे असे मानले जाईल. | |
| **स्पष्टीकरण तीन.**—तात्काळ व प्रत्यक्ष हस्तांतरण झाल्याशिवाय भाडेपट्ट्यासंबंधीचा करारनामा हा भाडेपट्टा म्हणून आकारणीपात्र असणार नाही. | |
| ३७. **शेअर वाटपपत्र.**—कोणत्याही कंपनीतील किंवा नियोजित कंपनीतील शेअरांच्या वाटणीसंबंधातील, अथवा कोणत्याही कंपनीने किंवा नियोजित कंपनीने उभारावयाच्या कर्जाच्या संबंधातील शेअर वाटपपत्र. | एक रुपया. |
| प्रमाणपत्र किंवा अन्य दस्तऐवज (अनुच्छेद १७) देखील पहा. | |
| **हमीपत्र**.—करारनामा (अनुच्छेद ५) पहा. | |
| ३८. **लायसनपत्र.**—म्हणजे, धनको आपल्या हक्कमागण्या विनिर्दिष्ट अवधीपर्यंत तहकूब ठेवतील व ऋणकोला त्याच्या स्वविवेकानुसार व्यवहार चालविण्यास मुभा देतील, असा ऋणको व त्याचे धनको यांच्या दरम्यान झालेला कोणताही करारनामा. | पन्नास रुपये. |
| ३९. **कंपनीचा संस्थापन समयलेख.**— .. .. | |
| १९५६ चा १. (अ) कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम २६ खालील संस्थापन नियमावली सोबत जोडली असेल तेव्हा ; | शंभर रुपये. |
| (ब) याप्रमाणे ती सोबत जोडली नसेल तेव्हा .. | कंपनीच्या भागभांडवलानुसार अनुच्छेद १० खाली संस्थापन नियमावलीवर बसते तितके शुल्क. |

**माफी**

१९५६ चा १.] नफ्याकरिता स्थापन न केलेल्या व कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम २५ खाली नोंदणी झालेल्या कोणत्याही अधिसंघाचा संस्थापन समयलेख.

| (१) | (२) |
| --- | --- |
| ४०. **गहाणखत.**---हक्कलेख-निक्षेप, हडप किंवा तारण किंवा तारणगहाण यासंबंधीचा करारनामा (अनुच्छेद ६), नौतारण बंधपत्र (अनुच्छेद १४), पिकाचे गहाणखत (अनुच्छेद ४१), नौभार बंधपत्र (अनुच्छेद ५३) किंवा प्रतिभूति बंधपत्र किंवा गहाणखत (अनुच्छेद ५४) सोडून अन्य-- | |
| (अ) जेव्हा अशा गहाणखतात समाविष्ट असलेल्या मालमत्तेचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा कब्जा गहाणकाराने दिलेला असेल किंवा देण्याचे कबूल केले असेल तेव्हा; | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेइतक्या प्रतिफलार्थ केलेल्या अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत अनुच्छेद २५ च्या यथास्थिति खंड (अ), (ब) [1][ (क) किंवा (ड)] खाली बसते तितके शुल्क. |
| (ब) जेव्हा उपरोक्तप्रमाणे कब्जा दिलेला नसेल किंवा देण्याचे कबूल केले नसेल तेव्हा; | अशा गहाणखताद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| **स्पष्टीकरण.**---जेव्हा गहाणकार हा गहाणधारकास गहाण मालमत्तेचे किंवा तिच्या भागाचे भाडे गोळा करण्याकरिता मुखत्यारनामा देतो किंवा त्यांचा भाडेपट्टा देतो तेव्हा त्याने या अनुच्छेदाच्या अर्थांतर्गत कब्जा दिला असेल असे मानले जाईल. | |
| (क) जेव्हा असे गहाणखत म्हणजे एखादी सांपार्श्विक किंवा सहाय्यकारी किंवा अतिरिक्त किंवा बदली प्रतिभूती असेल किंवा उपरोक्त प्रयोजनाकरिता अधिक हमीच्या रूपात असेल तेव्हा, प्रमुख किंवा प्राथमिक प्रतिभूती रीतसर मुद्रांकित असेल तर. | प्रतिभूत केलेल्या रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क, पन्नास रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने. |
| **माफी** | |
| (१) जमीन सुधारणा कर्जे अधिनियम, १८८३ किंवा शेतकरी कर्जे अधिनियम, १८८४ याखाली कर्जाऊ रकमा घेणाऱ्या व्यक्तींनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी अशा उधार रकमांच्या परतफेडीसाठी प्रतिभूती म्हणून करून दिलेले संलेख. | १८८३ चा १९. १८८४ चा १२. |
| (२) विनिमयपत्रासोबत असणारे तारणगहाणपत्र | |
| ४१. **एखाद्या पिकाचे गहाणखत.**---एखाद्या पिकाच्या कोणत्याही गहाणावर दिलेल्या कर्जाची परतफेड प्रतिभूत करण्यासाठी केलेल्या कराराचा पुरावा असणारा कोणताही संलेख यासुद्धा---मग गहाणाच्या वेळी असे पीक अस्तित्वात असो अगर नसो---दर २०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता. | .. एक रुपया. |

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ग) अन्वये "किंवा (क)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| ४२. **लेखप्रमाणकाचा लेख.**—म्हणजे लेखप्रमाणक आपली पदीय कर्तव्ये पार पाडीत असताना त्याने किंवा अन्य कोणतीही व्यक्ती लेखप्रमाणक म्हणून विधित: काम चालवत असताना तिने केलेले प्रतिसाक्षन (अनुच्छेद ४९) सोडून, अन्य कोणताही संलेख, पृष्ठांकन, अधिटिप्पणी, साक्षांकन, प्रमाणपत्र किंवा नोंद. | .. पाच रुपये. |
| ४३. **टिप्पणी किंवा ज्ञापन.**—आपल्या प्रकर्त्याकरिता खालील मालाची खरेदी किंवा विक्री केल्याचे कळवण्यासाठी त्या प्रकर्त्यास दलालाने किंवा अभिकर्त्याने पाठविलेली टिप्पणी किंवा ज्ञापन— | |
| (अ) कापसाबाबत .. .. .. .. | ४,५०० किलोग्रॅमच्या प्रत्येक संव्यवहार-युनिटाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (ब) सोन्याचांदीच्या लगडी किंवा नाणी यांबाबत .. | (अ) चांदीच्या ५० किलोग्रॅमच्या प्रत्येक युनिटाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया.<br>(ब) सोन्याच्या १ किलोग्रॅमच्या प्रत्येक युनिटाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया.<br>(क) १०० सॉव्हरिनच्या प्रत्येक युनिटाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (क) गळित धान्यांबाबत .. .. .. | गळित धान्यांच्या दर १०,००० किलोग्रॅमकरिता एक रुपया. |
| (ड) कोणत्याही प्रकारचे सूत, खनिजेतर तेले किंवा कोणत्याही प्रकारचे मसाले यांबाबत. | राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशाप्रकारे कोणत्याही प्रकारचे सूत, खनिजेतर तेले किंवा कोणत्याही प्रकारचे मसाले यांच्या मूल्याच्या दर १०,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (ई) वीस रुपयांहून अधिक किंमतीच्या इतर कोणत्याही मालाबाबत. | दर १०,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |
| (फ) सरकारी रोखा नसलेल्या, वीस रुपयांहून अधिक मूल्याचा कोणताही शेअर, स्क्रिप, पुंजरोखा, बंधरोखा, ऋणपत्र, ऋणपत्र-रोखा किंवा तत्सम स्वरूपाचा अन्य विक्रेय रोखा याबाबत. | रोख्याच्या यथास्थिति खरेदीच्या किंवा विक्रीच्या वेळच्या मूल्याच्या दर १०,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया. |

| (१) | (२) |
|---|---|
| (ग) सरकारी रोख्याबाबत .. .. .. | त्या रोख्याच्या, यथास्थिति, खरेदीच्या किंवा विक्रीच्या वेळच्या मूल्याच्या दर १०,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया [१][एक हजार रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने]. |

## माफी

(१) अनुच्छेद १९ च्या खंड (१), (२) व (३) मध्ये वर्णन केलेल्या निपटारा याद्यांमध्ये ज्या संबंधात नोंद करणे आवश्यक आहे अशी, आपल्या प्रकर्त्याकरिता सरकारी रोखा किंवा कोणत्याही कायद्याने संस्थापित कंपनीतील किंवा कंपनीचा किंवा इतर निगम-निकायातील किंवा निगमनिकायाचा शेअर, स्क्रिप, पुंजरोखा, बंधरोखा, ऋणपत्र, ऋणपत्ररोखा किंवा तशाच प्रकारचा इतर विक्रेय रोखा यांची खरेदी किंवा विक्री केल्याबद्दल अशा प्रकर्त्यास कळविण्यासाठी दलालाने किंवा अभिकर्त्याने पाठवलेली टिप्पणी किंवा ज्ञापन.

(२) अनुच्छेद २० मध्ये वर्णन केलेल्या निपटारा यादीत ज्या संबंधात नोंद करणे आवश्यक आहे अशी, आपल्या प्रकर्त्याकरिता कापसाची खरेदी किंवा विक्री केल्याबद्दल अशा प्रकर्त्यास कळविण्यासाठी दलालाने किंवा अभिकर्त्याने पाठवलेली टिप्पणी किंवा ज्ञापन.

(३) अनुच्छेद २१ मध्ये वर्णन केलेल्या निपटारा यादीत ज्या संबंधात नोंद करणे आवश्यक आहे अशी, आपल्या प्रकर्त्याकरिता सोन्याचांदीच्या लगडींची किंवा नाण्यांची खरेदी किंवा विक्री केल्याबद्दल अशा प्रकर्त्यास कळविण्यासाठी दलालाने किंवा अभिकर्त्याने पाठविलेली टिप्पणी किंवा ज्ञापन.

(४) अनुच्छेद २२ मध्ये वर्णन केलेल्या निपटारा यादीत ज्या संबधात नोंद करणे आवश्यक आहे अशी, आपल्या प्रकर्त्याकरिता गळित धान्यांची खरेदी किंवा विक्री केल्याबद्दल अशा प्रकर्त्यास कळविण्यासाठी दलालाने किंवा अभिकर्त्याने पाठविलेली टिप्पणी किंवा ज्ञापन.

(५) अनुच्छेद २३ मध्ये वर्णन केलेल्या निपटारा यादीत ज्या संबंधात नोंद करणे आवश्यक आहे अशी, आपल्या प्रकर्त्याकरिता कोणत्याही प्रकारचे सूत, खनिजेतर तेले, किंवा कोणत्याही प्रकारचे मसाले यांची खरेदी किंवा विक्री केल्याबद्दल अशा प्रकर्त्यास कळविण्यासाठी दलालाने किंवा अभिकर्त्याने पाठविलेली टिप्पणी किंवा ज्ञापन.

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३८ (फ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
| --- | --- |
| (६) संलेखात नमूद केलेली रक्कम शंभर रुपयांपेक्षा कमी असेल त्या बाबतीत, वर नमूद केलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात दलालाने किंवा अभिकर्त्याने आपल्या प्रकर्त्यास पाठविलेली टिप्पणी किंवा ज्ञापन. | |
| ४४. **नौकाधिपतीच्या अधिकथनाविषयी अधिटिप्पणी.**—नौकाधिपतीचे अधिकथन (अनुच्छेद ५०) देखील पहा. | पाच रुपये. |
| ४५. **पैसे देण्याचा आदेश.**—भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ च्या अर्थानुसार विनिमयपत्र नसलेला— | |
| (अ) मागणीवरुन नव्हे तर अन्यथा, परंतु दिनांकोत्तर किंवा दर्शनोत्तर जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत प्रदय असेल त्या बाबतीत.— दर १,००० रुपये किंवा त्याचा भाग यासाठी, | पाच रुपये. |
| (ब) दिनांकोत्तर किंवा दर्शनोत्तर एक वर्षापेक्षा जास्त अवधीपर्यंत प्रदेय असेल त्या बाबतीत, जर रक्कम— | |
| (एक) ५०० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर .. | पाच रुपये. |
| (दोन) ५०० रुपयांपेक्षा अधिक असेल, परंतु १,००० रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, | दहा रुपये. |
| (तीन) १,००० रुपयांपेक्षा अधिक असेल तर, त्यानंतरच्या दर १,००० रुपयांसाठी किंवा त्याच्या भागासाठी. | दहा रुपये. |
| ४६. **वाटणी – त्यासंबंधीचा संलेख** .. .. .. | मालमत्तेपैकी अलग काढलेल्या हिश्श्याच्या किंवा हिश्श्यांच्या बाजारमूल्याइतक्या रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| | **टीप.**—मालमत्तेच्या वाटण्या केल्यानंतर उरलेला सर्वात मोठा हिस्सा हा (किंवा जर सारख्याच मूल्याचे दोन किंवा अधिक हिस्से असून ते अन्य हिश्श्यांपैकी कोणताही हिश्श्यांपेक्षा लहान नसतील तर, अशा समान हिश्श्यांपैकी एक हिस्सा हा) ज्यापासून इतर हिस्से अलग काढले आहेत असा हिस्सा असल्याचे मानले जाईल : |

१९८९ चा

| (१) | (२) |
|---|---|
| | परंतु, नेहमी असे की,—<br>(अ) जेव्हा मालमत्तेच्या अलग हिश्श्यांत वाटण्या करण्याबाबतचा एखादा करार समाविष्ट असलेला वाटणी संलेख निष्पादित केलेला असेल व अशा करारास अनुसरून वाटण्या झाल्या असतील तेव्हा, अशा वाटण्या घडवून आणणाऱ्या संलेखावर आकारणीपात्र असलेल्या शुल्कातून पहिल्या संलेखावर दिलेल्या शुल्काची रक्कम कमी केली जाईल, परंतु ते शुल्क पाच रुपयांहून कमी असणार नाही ;<br>(ब) जेव्हा, महसुली जमाबंदी झाल्यानंतर जमीन तीस वर्षांहून जास्त नसणाऱ्या कालावधीकरिता आणि निर्धारणाची पूर्ण रक्कम देऊन धारण केलेली असेल तेव्हा, त्या बाबतीत शुल्काच्या प्रयोजनाकरिता तिचे मूल्य वार्षिक महसुलाच्या पन्नास पटीहून जास्त होणार नाही अशा रीतीने परिगणना करून ठरवले जाईल;<br>(क) जेव्हा कोणत्याही महसूल प्राधिकरणाने किंवा कोणत्याही दिवाणी न्यायालयाने वाटण्या घडवून आणण्याविषयी दिलेला अंतिम आदेश किंवा वाटण्यांचा निदेश देणारा लवादाने दिलेला एखादा निवाडा यावर वाटणी संलेखाकरिता आवश्यक असलेला मुद्रांक लावलेला असेल आणि अशा आदेशास किंवा निवाड्यास अनुसरून नंतर वाटणी संलेख निष्पादित करून देण्यात आला असेल त्या बाबतीत, अशा संलेखावरील शुल्क दहा रुपयांहून अधिक असणार नाही. |

| (१) | (२) |
|---|---|
| ४७. **भागीदारी.--** | |
| (अ) भागीदारीचा संलेख .. .. .. | शंभर रुपये. |
| (ब) भागीदारीचे विसर्जन-- | |
| (एक) जेव्हा कोणतीही स्थावर मालमत्ता, ज्या भागीदाराने आपल्या वाट्याचे अंशदान म्हणून ती भागीदारीत आणली त्याहून अन्य भागीदाराने भागीदारीचे विसर्जन झाले असता आपला हिस्सा म्हणून घेतली असेल तेव्हा; | अशा मालमत्तेच्या बाजारमूल्यावर, अनुच्छेद २५ च्या, यथास्थिति, खंड (अ), (ब), [१][(क) किंवा (ड)] खाली अभिहस्तांतरण-पत्राच्या बाबतीत बसते तेवढे शुल्क, मात्र ते किमान शंभर रुपये असेल. |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत .. .. .. | शंभर रुपये. |
| ४८. **मुखत्यारनामा.--** | |
| प्रतिपत्र सोडून अन्य-- | |
| (अ) जेव्हा एकाच संव्यवहाराच्या संबंधात एका किंवा अधिक दस्तऐवजांची नोंदणी करण्याच्या एकमेव प्रयोजनासाठी किंवा असे एक किंवा अधिक दस्तऐवज निष्पादित केल्याचे कबूल करण्यासाठी केला असेल तेव्हा; | दोन रुपये. |
| १८८२ चा १५. (ब) जेव्हा इलाखा लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२ याखालील दाव्यांत किंवा कार्यवाहींत आवश्यक असेल तेव्हा; | दोन रुपये. |
| (क) जेव्हा त्यामुळे खंड (अ) मध्ये उल्लेखिलेल्या बाबीहून अन्य अशा एकाच संव्यवहारात एकांच किंवा अधिक व्यक्तींस काम चालविण्याचा प्राधिकार मिळत असेल तेव्हा; | पाच रुपये. |
| (ड) जेव्हा त्यामुळे एका व्यक्तीला एकापेक्षा अधिक संव्यवहारांत किंवा सरसहा काम चालविण्याचा प्राधिकार मिळत असेल तेव्हा; | वीस रुपये. |
| (ई) जेव्हा त्यामुळे एकापेक्षा अधिक व्यक्तींना संयुक्तपणे किंवा अलगअलगपणे एका किंवा एकापेक्षा अधिक संव्यवहारांत किंवा सरसहा काम चालविण्याचा प्राधिकार मिळत असेल तेव्हा; | किमान वीस रुपये या मर्यादेच्या अधीनतेने, प्रत्येक प्राधिकृत व्यक्तीकरिता पाच रुपये. |
| (फ) जेव्हा तो प्रतिफलार्थ देण्यात आलेला असून, त्यामुळे कोणतीही स्थावर मालमत्ता विकण्याचा प्राधिकार मिळत असेल तेव्हा; | ज्या मालमत्तेच्या बाजारमूल्यावर अनुच्छेद २५ च्या, यथास्थिति, खंड (अ), (ब), [२][(क) किंवा (ड)] खाली अभिहस्तांतरण-पत्राच्या बाबतीत बसते तितके शुल्क. |

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, कलम २ (ह) अन्वये "किंवा (क)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ (आय) अन्वये "किंवा (क)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| [1][ (ग) जेव्हा कोणतीही स्थावर मालमत्ता, तीवर बांधकाम करण्यासाठी, तिचा विकास करण्यासाठी किंवा तिची विक्री किंवा हस्तांतरण करण्यासाठी (कोणत्याही रीतीने) कोणत्याही नावाने ओळखण्यात येणाऱ्या प्रवर्तकाकडे किंवा विकासाकडे देण्यात येईल तेव्हा. | अनुच्छेद २५ च्या यथास्थिति, खंड (ब) आणि (क) अन्वये अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसवण्याजोगे असले तितके शुल्क. |
| (ह) इतर कोणत्याही बाबतीत .. .. .. | प्रत्येक प्राधिकृत व्यक्तीकरिता पाच रुपये. |

**स्पष्टीकरण एक.**--या अनुच्छेदाच्या प्रयोजनाकरिता एकाच व्यवसाय संस्थेशी संबंधित असलेल्या एकाहून अधिक व्यक्तींना, एकच व्यक्ती म्हणून मानले जाईल.

**स्पष्टीकरण दोन.**--"नोंदणी" या संज्ञेत नोंदणी अधिनियम, १९०८ याखालील नोंदणीसंबंधीची प्रत्येक आनुषंगिक क्रिया समाविष्ट होते. १९०८ चा १६.

**स्पष्टीकरण तीन.**--जेव्हा खंड (फ) खाली मुखत्यारनाम्यावर शुल्क देण्यात आले असेल आणि मुखत्यारनामा निष्पादित करून देणारा आणि ज्याच्या प्रीत्यर्थ मुखत्यारनामा निष्पादित करून देण्यात आला अशी व्यक्ती यांच्या दरम्यान त्या मालमत्तेच्या संबंधात मुखत्यारनाम्यानुसार अभिहस्तांतरणपत्र निष्पादित करण्यात आले असेल तर, अभिहस्तांतरणपत्रावरील शुल्क हे, मालमत्तेच्या बाजारमूल्यातून मुखत्यारनाम्यावर दिलेले शुल्क वजा जाता येणाऱ्या रकमेवर आकारण्यात येईल.

| (१) | (२) |
|---|---|
| ४९. **विनिमयपत्र किंवा वचनचिठ्ठी याबाबतचे प्रतिसाक्षांकन.**--म्हणजे लेखप्रमाणकाने किंवा विधित: लेखप्रमाणक म्हणून काम करणाऱ्या इतर व्यक्तीने विनिमयपत्राचा किंवा वचनचिठ्ठीचा अवमान झाल्याचे साक्षांकित करण्यासाठी केलेले कोणतेही लेखी अधिकथन. | पाच रुपये. |
| ५०. **नौकाधिपतीचे अधिकथन.**--म्हणजे, तोटयाचे समायोजन किंवा हानि सरासरींची परिगणना करण्याच्या दृष्टीने जहाजाच्या सफरीच्या तपशिलासंबंधी नौकाधिपतीने लिहून दिलेले कोणतेही अधिकथन, आणि जहाजावर माल न चढविण्याबद्दल किंवा जहाजातून तो न उतरवण्याबद्दल जहाज भाड्याने घेणाऱ्या किंवा मालप्रेषिती व्यक्तीविरुद्ध त्याने लेखी केलेले अधिकथन, लेखप्रमाणकाने किंवा विधित: लेखप्रमाणक म्हणून काम करणाऱ्या इतर व्यक्तीने साक्षांकित किंवा प्रमाणित केले असेल तेव्हा, असे प्रत्येक अधिकथन. | पाच रुपये. |

नौकाधिपतीच्या अधिकथनाविषयीची अधिटिप्पणी देखील (अनुच्छेद ४४) पहा.

[1] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३ (क) अन्वये मूळ खंड (ग) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| **५१. गहाण मालमत्तेचे प्रत्यंतरणपत्र.--** | |
| (अ) ज्याकरिता मालमत्ता गहाण ठेवली असेल त्या प्रतिफलाची रक्कम २,५०० रुपयांहून अधिक नसेल तर; | प्रत्यंतरणपत्रात लिहिलेल्या अशा प्रतिफलाइतक्या रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत .. .. .. | पन्नास रुपये. |
| **५२. परिमोचनपत्र.**--म्हणजे, ज्या संलेखाद्वारे (ज्याकरिता कलम २४ मध्ये तरतूद केली आहे असे परिमोचनपत्र नव्हे) एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीविरुद्ध किंवा विनिर्दिष्ट मालमत्तेवरील हक्कमागणी सोडून देते असा कोणताही संलेख-- | |
| (अ) जर हक्कमागणीची रक्कम किंवा तिचे मूल्य २,५०० रुपयांहून अधिक नसेल तर; | परिमोचनपत्रात लिहिलेल्या रकमेच्या किंवा मूल्याच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत .. .. | पन्नास रुपये. |
| **५३. नौभार बंधपत्र.**--म्हणजे, जहाजावर चढवलेल्या किंवा चढवावयाच्या मालावरील कर्ज प्रतिभूत करणारा आणि त्या कर्जाची परतफेड नियत बंदरावर माल पोहोचण्यावर अवलंबून ठेवणारा कोणताही संलेख. | प्रतिभूत केलेल्या कर्जाच्या रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| **कोणतीही विश्वस्तव्यवस्था किंवा संव्यवस्था रद्द करणे.**--संव्यवस्था (अनुच्छेद ५५), विश्वस्तव्यवस्था (अनुच्छेद ६१) पहा. | |
| **५४. प्रतिभूति बंधपत्र किंवा गहाणखत.**--एखाद्या पदाचे कार्य रीतसर पार पाडण्याकरिता प्रतिभूती म्हणून, अथवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा इतर मालमत्ता यांचा हिशेब देण्याकरिता निष्पादित केलेले अथवा एखाद्या कराराच्या रीतसर पालनाची हमी म्हणून एखाद्या जामीनदाराने निष्पादित करून दिलेले अथवा न्यायालयाच्या किंवा लोक अधिकाऱ्याच्या आदेशास अनुसरून निष्पादित करून दिलेले, परंतु मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ अन्वये अन्यथा तरतूद न केलेले-- | |
| (एक) जेव्हा प्रतिभूत केलेली रक्कम २,५०० रुपयांहून अधिक नसेल तेव्हा; | प्रतिभूत केलेल्या रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत. .. .. | पन्नास रुपये. |

१९५९ चा मुंबई ६०.

| (१) | (२) |
|---|---|
| माफी. | |
| बंधपत्र किंवा अन्य संलेख जेव्हा — | |
| (अ) धर्मार्थ दवाखान्याला, रुग्णालयाला किंवा सार्वजनिक उपयुक्ततेच्या इतर कोणत्याही उद्दिष्टासाठी देण्यात येणाऱ्या खाजगी अंशदानांपासून होणारी स्थानिक प्राप्ती, दरमहा विनिर्दिष्ट रकमेपेक्षा कमी होणार नाही अशी हमी देण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही व्यक्तीने; | |
| (ब) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ याच्या कलम ११४ खाली राज्य शासनाने केलेल्या नियमाखाली; | |
| (क) जमीन सुधार कर्ज अधिनियम, १८८३ किंवा शेतकरी कर्ज अधिनियम, १८८४ याखाली अग्रिम रकमा घेणाऱ्या व्यक्तींनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी अशा अग्रिम रकमांच्या परतफेडीबद्दलची प्रतिभूती म्हणून; | |
| (ड) एखाद्या पदाचे कार्य रीतसर पार पाडण्याबद्दल किंवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा इतर मालमत्ता यांचा योग्य हिशेब देण्याबद्दल प्रतिभूती म्हणून शासकीय अधिकाऱ्यांनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी, | |
| निष्पादित करून दिलेला असेल तेव्हा. | |
| ५५. **संव्यवस्था—**(अ) त्यासंबंधीचा संलेख — विधवादेय विलेखसुद्धा,— | |
| (एक) अशी संव्यवस्था धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनार्थ करण्यात आली असेल त्या बाबतीत. | संव्यवस्था केलेल्या रकमेच्या किंवा संव्यवस्था केलेल्या मालमत्तेच्या बाजारमूल्याइतक्या रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क. |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत. | संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या किंवा संव्यवस्था केलेल्या मालमत्तेच्या बाजारमूल्याइतक्या प्रतिफलार्थ केलेल्या अभिहस्तांतरणपत्रावर अनुच्छेद २५ च्या, यथास्थिति, खंड (अ), |

Margin notes: (ब) १९७६ चा महा. ३८. (क) १८८३ चा १९. १८८४ चा १२.

| (१) | (२) |
|---|---|
| | (ब), [1][ (क) किंवा (ड)] खाली बसते तितके शुल्क : परंतु जेथे संव्यवस्था करण्याबद्दलच्या करारपत्रावर संव्यवस्था-संलेखासाठी आवश्यक असणारा मुद्रांक लावलेला असून, त्या करारपत्रानुसार नंतर संव्यवस्था संलेख निष्पादित करण्यात आला असेल तेथे, त्या संव्यवहार संलेखावरील शुल्क दहा रुपयांहून अधिक असणार नाही : परंतु आणखी असे की, जेव्हा संव्यवस्था–संलेखात संव्यवस्था रद्द करण्याविषयी कोणतीही तरतूद केलेली असेल तेव्हा, संव्यवस्था केलेल्या मालमत्तेची रक्कम किंवा मूल्य, शुल्काच्या प्रयोजनांसाठी जणू काही अशा कोणत्याही तरतुदी अशा लेखात अंतर्भूत नसाव्या त्याप्रमाणे निर्धारित करण्यात येईल. |

**माफी**

मुसलमानांमधील विवाहाच्या वेळी निष्पादित करून दिलेला—मग तो विवाह होण्यापूर्वी असो वा नंतर असो—मेहेरसंबंधीचा विलेख.

| | |
|---|---|
| **(ब)** संव्यवस्था रद्द करणे— | |
| (एक) वरील खंड अ च्या उपखंड (एक) मध्ये वर्णिलेल्या संव्यवस्थापत्राच्या संबंधात. | रद्द करण्याबद्दलच्या संलेखात नमूद केल्याप्रमाणे संव्यवस्था केलेली रक्कम किंवा संबंधित मालमत्तेचे बाजारमूल्य यांच्याइतक्या रकमेच्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क–परंतु हे शुल्क पन्नास रुपयांहून अधिक असणार नाही. |

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २(ज) अन्वये "किंवा (क)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
| --- | --- |
| (दोन) खंड (अ), उपखंड (दोन) मध्ये वर्णिलेल्या संव्यवस्था-पत्राच्या संबंधात. | संव्यवस्था रद्द करण्याबद्दलच्या संलेखात नमूद केल्याप्रमाणे संव्यवस्था केलेली रक्कम किंवा संबंधित मालमत्तेचे बाजारमूल्य यांच्याइतक्या प्रतिफलार्थ केलेल्या अभिहस्तांतरणपत्रावर अनुच्छेद २५ च्या, यथास्थिति, खंड (अ), (ब), [1][ (क) किंवा (ड)] खाली बसते तेवढे शुल्क — परंतु, हे शुल्क पन्नास रुपयांहून अधिक असणार नाही. |
| **५६. शेअर अधिपत्रे.**—कंपनी अधिनियम, १९५६ खाली धारणकर्त्याकरिता दिलेली, दर पाचशे रुपयांसाठी किंवा त्याच्या भागासाठी. | पाच रुपये. १९५६ चा १. |
| **माफी** | |
| त्या शुल्काबद्दल आपसमेळ रक्कम म्हणून पुढील रक्कम मुद्रांक शुल्क समाहारकाकडे भरल्यावरच केवळ जे अंमलात यावयाचे असे कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम ११४ च्या तरतुदीं-अनुसार कोणत्याही कंपनीने काढलेले शेअर अधिपत्र. १९५६ चा १.<br>ती आपसमेळ रक्कम याप्रमाणे :—<br>(अ) कंपनीच्या संपूर्ण अभिदत्त भांडवलाच्या **दीड टक्का,** किंवा<br>(ब) ज्या कंपनीने उक्त शुल्क किंवा आपसमेळ रक्कम पूर्णपणे चुकती केलेली असेल तिने जर त्यानंतर, आपल्या अभिदत्त भांडवलाच्या जोडीला आणखी शेअर विक्रीस काढले तर अशा जास्तीच्या भांडवलाच्या **दीड टक्का.**<br>**स्क्रिप**—प्रमाणपत्र (अनुच्छेद १७) पहा. | |
| **५७. नौवहन आदेश.**—कोणत्याही जहाजावरून माल वाहून नेण्यासाठी किंवा वाहून नेण्यासंबंधी काढलेला. | एक रुपया. |
| **५८. भाडेपट्ट्याचा प्रत्यर्पण लेख—** | असा भाडेपट्टा जेवढे शुल्क आकारण्यास पात्र असेल तेवढे शुल्क, पन्नास रुपये या कमाल मर्यादेच्या अधीनतेने. |
| **स्पष्टीकरण.**—या अनुच्छेदाच्या प्रयोजनासाठी, भाडेपट्ट्याचे प्रत्यर्पण केवळ मुदतीच्या न संपलेल्या भागापुरते आहे की, मालमत्तेच्या केवळ एका भागापुरते आहे ही गोष्ट महत्त्वाची नाही. | |

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ज) अन्वये "किंवा (क)" या-ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| | (१) | (२) |
|---|---|---|
| | ५९. **हस्तांतरण.**—(प्रतिफलासह किंवा त्याविना)— | |
| १८९९ चा २. | (अ) भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९ याच्या कलम ८ अन्वये तरतूद केलेली ऋणपत्रे खेरीजकरून विक्रेय रोखे असलेल्या ऋणपत्रांचे, मग असे ऋणपत्र शुल्क आकारण्यास पात्र असो वा नसो. | ऋणपत्राच्या प्रतिफल-रकमेच्या दर १०० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता पन्नास पैसे [१][—दहा हजार रुपयांच्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने] |
| | **स्पष्टीकरण**—या खंडाच्या प्रयोजनासाठी "ऋणपत्र" या संज्ञेमध्ये, ऋणपत्र पुंजरोख्याचा (डिबेंचर स्टॉक) समावेश होतो ; | |
| | (ब) बंधपत्र, गहाणखत किंवा विमापत्र याद्वारे प्रतिभूत केलेल्या कोणत्याही हितसंबंधाचे ; | हस्तांतरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे हितसंबंधाच्या रकमेइतक्या किंवा मूल्याइतक्या बंधपत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काएवढे शुल्क—पन्नास रुपयांच्या [२][कमाल मर्यादेच्या] अधीनतेने. |
| १९६३ चा ४५. | (क) महाप्रशासक अधिनियम, १९६३ याच्या कलम २२ खालील कोणत्याही मालमत्तेचे ; | |
| | (ड) एका विश्वस्ताने दुसऱ्या विश्वस्ताकडे किंवा विश्वस्ताने लाभाधिकाऱ्याकडे कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेचे प्रतिफलाविना केलेले. | |
| | **माफी** | |
| | (अ) विनिमयपत्र, धनादेश किंवा वचनचिठ्ठी यांचे ; | |
| | (ब) भरणपत्र, सुपूर्दगी आदेश, मालाचे अधिपत्र किंवा मालावरील हक्कासंबंधीचा इतर वाणिज्यिक दस्तऐवज यांचे ; | |
| | (क) विमापत्राचे ; | |
| | (ड) केंद्र शासनाच्या रोख्यांचे पृष्ठांकनाद्वारे हस्तांतरण. | |
| | ६०. **भाडेपट्ट्याचे हस्तांतरण.**—पोट-भाडेपट्ट्याद्वारे अथवा दिवाणी न्यायालयाने किंवा कोणत्याही महसूल अधिकाऱ्याने काढलेल्या हुकूमनाम्याद्वारे किंवा अंतिम आदेशाद्वारे नव्हे तर, अभिहस्तांकनाद्वारे केलेले. | हस्तांतरणाची विषयवस्तु असणाऱ्या मालमत्तेच्या बाजारमूल्यावर, अनुच्छेद २५ च्या, यथास्थिति, खंड (अ), (ब), [३][(क) किंवा (ड)] खाली अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत बसते तेवढे शुल्क. |

[१] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३८ (ग) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३ (ड) अन्वये "किमान मर्यादेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (के) अन्वये "किंवा (क)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| ६१. **विश्वस्तव्यवस्था.**— | |
| (अ) **त्यासंबंधीची घोषणा**—कोणत्याही मालमत्तेच्या किंवा मालमत्तेसंबंधीच्या विश्वस्त व्यवस्थेची घोषणा मृत्यु-पत्राहून अन्य अशा कोणत्याहीलेखाद्वारे केलेली असताना— | |
| (अ) मालमत्तेची संपत्तिव्यवस्था केलेली असेल तेव्हा,— | |
| (एक) विश्वस्तव्यवस्था ही धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी केलेली असेल त्या बाबतीत ; | संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या किंवा अशा मालमत्तेच्या बाजार-मूल्याइतक्या रकमेच्या बंध-पत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काइतके शुल्क. |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत .. .. | संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या किंवा अशा मालमत्तेच्या बाजार-मूल्याइतक्या रकमेकरिता अनुच्छेद २५ च्या, यथास्थिति, खंड (अ), (ब), [1][(क) किंवा (ड)] खालील अभिहस्तांतरण-पत्रावरील शुल्काइतके शुल्क. |
| (ब) मालमत्तेची संपत्तिव्यवथा केलेली नसेल तेव्हा,— | |
| (एक) विश्वस्तव्यवस्था ही धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी केलेली असेल त्या बाबतीत ; | संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या किंवा अशा मालमत्तेच्या बाजार-मूल्याइतक्या रकमेच्या बंध-पत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काइतके—परंतु पन्नास रुपयां-पेक्षा अधिक नव्हे इतके शुल्क. |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत .. .. | संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या किंवा अशा मालमत्तेच्या बाजार-मूल्याइतक्या रकमेच्या बंध-पत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्का-इतके—परंतु पन्नास रुपयांपेक्षा अधिक नव्हे इतके शुल्क. |
| (ब) **ती रद्द करण**.—कोणत्याही मालमत्तेची किंवा माल-मत्तेसंबंधीची विश्वस्तव्यवस्था मृत्युपत्राहून अन्य कोणत्याही संलेखाद्वारे केलेली असेल तेव्हा ती रद्द करणे. | संव्यवस्था केलेल्या रकमेइतक्या किंवा अशा मालमत्तेच्या बाजार-मूल्याइतक्या रकमच्या बंध-पत्रावरील (अनुच्छेद १३) शुल्काइतके—परंतु पन्नास रुपयां-पेक्षा अधिक नव्हे इतके शुल्क. |

संव्यवस्था (अनुच्छेद ५५) देखील पहा.
**मूल्यांकन**.—मूल्यन (अनुच्छेद ८) पहा.

[1] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ (ल) अन्वये "किंवा (क)" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) |
|---|---|
| ६२. **मालाचे अधिपत्र**.—म्हणजे, जो संलेख नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा किंवा तिच्या अभिहस्तांकितीचा किंवा तो संलेख धारण करणाऱ्या व्यक्तीचा कोणत्याही गोदीत किंवा वखारीत किंवा मालधक्क्यावर पडून असलेल्या एखाद्या मालावरील हक्काचा पुरावा असेल आणि अशा तऱ्हेचा माल ज्या व्यक्तीच्या अभिरक्षेत असेल अशा व्यक्तीने किंवा त्या व्यक्तीच्या-वतीने जो स्वाक्षरित किंवा प्रमाणित केलेला असेल असा कोणताही संलेख. | त्यात एक रुपया.] |

## अनुसूची दोन

## निरसत केलेल्या अधिनियमिती

(कलम ७६ पहा)

| वर्ष | क्रमांक | अधिनियमिती | निरसनाची व्याप्ती |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १८९९ | दोन .. | दुसऱ्या राज्यात घातलेले प्रदेश वगळून पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यास आणि मुंबई राज्याच्या विदर्भ भागास व कच्छ क्षेत्रास लागू असलेला भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९. | भारताचे संविधान याच्या सातव्या अनुसूचीतील यादी एक मधील नोंद ९१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दस्त-ऐवजांशी त्याचा जेथवर संबंध असेल तेथवर खेरीजकरून, संपूर्ण अधिनियम. |
| १८९९ | दोन .. | मुंबई राज्याच्या सौराष्ट्र क्षेत्रास लागू असलेला भारतीय मुद्रांक अधिनियम, १८९९. | भारताचे संविधान याच्या सातव्या अनुसूचीतील यादी एक मधील नोंद ९१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांशी त्याचा जेथवर संबंध असेल तेथवर खेरीजकरून, संपूर्ण अधिनियम. |
| १३३१ फसली | चार .. | हैदराबाद मुद्रांक अधिनियम, १३३१ फसली. | भारताचे संविधान याच्या सातव्या अनुसूचीतील यादी एक मधील नोंद ९१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दस्त-ऐवजांशी त्याचा जेथवर संबंध असेल तेथवर खेरीजकरून, संपूर्ण अधिनियम. |
| १९३२ | दोन .. | मुंबई वित्त अधिनियम, १९३२. | कलमे १५, १६, १७, १८ व १९ असलेले भाग ४ व ५. |
| १९४३ | चौदा | मुंबई मुद्रांक शुल्क वाढविण्याबाबत अधिनियम, १९४३. | संपूर्ण अधिनियम. |

(यथार्थ अनुवाद)

**प. ग. पाटील,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

शामुना--एं-११५३--भासंपरामु--२-९१--३,०३०--पीसी४*.